
साप्ताहिक
# माणूस
११ ऑक्टोबर ७५
चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह. एक रुपया.

हाही अनुभव जगण्यासारखा आहे.
दुःख सोसण्यातही मजा आहे.

# सत्तर दिवस






सत्तर दिवस
मृत्यूशी झुंज
देऊन परतलेले
सोळा साहसी वीर

# सत्तर दिवस




Vengo de un avión que cayó en las montañas Soy uruguayo. Hace 10 días que estamos caminando. Tengo un amigo [illegible] arriba. En el avión quedaron 14 personas heridas. Tenemos que salir rápido de aquí y no sabemos cómo. [illegible] comida. Estamos débiles. [illegible] nos [illegible] buscar arriba? Por favor [illegible] podemos ni caminar. Dónde estamos?
[illegible]

पॅरडोने लिहिलेली ऐतिहासिक चिठ्ठी




ॲन्डीज पर्वतामधील अखेरचा दिवस

सान्ता एलेना पर्वतावर दिसणारा क्रॉस



साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : अठरावा १८

११ ऑक्टोबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤
छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे

एक गद्य महाकाव्य !

# ययाति

**'ययाति' ही वि. स. खांडेकरांची कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हा 'माणूस'ने नाटककार वसंत कानेटकर यांचा एक प्रदीर्घ लेख आवर्जून प्रसिद्ध केला होता. 'माणूस' सुरू होऊन तेव्हा फक्त एक महिना उलटला होता, त्यामुळे बहुसंख्य वाचकांनी त्या वेळी हा लेख वाचला नसण्याची शक्यता आहे. नुकतेच ज्ञानपीठ-पारितोषिक लाभल्याने 'ययाति' पुन्हा एकदा वाचकांसमोर आली आहे. म्हणून हा लेख येथे पुनर्मुद्रित केला आहे.**

'....ही कादंबरी ययातीची कामकथा आहे, देवयानीची संसार-कथा आहे, शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तिगाथा आहे, हे लक्षात घेऊन वाचकांनी ती वाचली तर मला आनंद होईल. कलात्मक रंजन, भावनांचे आवाहन, सामाजिक शिकवण आणि सूक्ष्म किंवा विशाल जीवनदर्शन अशा अनेक चढत्या पातळ्यांवर चांगली कलाकृती एकाच वेळी विहार करू शकते. त्यातल्या पातळीला मी स्पर्श केला आहे, कुठल्या पातळीला स्पर्श करायला मी असमर्थ ठरलो आहे, ते रसिकच सांगू शकतील...'

'ययाति' कादंबरीला लिहिलेल्या 'पार्श्वभूमी'तले खांडेकरांचे उद्गार अनेक अर्थांनी उद्बोधक आहेत. या कादंबरीचा विषय, त्यातील आशय, लेखकाचे संकल्प, त्याच्या निरीक्षणाचा, चिंतनाचा आणि अभ्यासाचा आवाका, त्याची जीवन आणि वाङ्मयमूल्ये, त्याच्या श्रद्धा आणि अश्रद्धा इत्यादी अनेक वस्तुस्थितीवर या उद्गारांनी थोडाफार प्रकाश टाकला जातो. मराठी कादंबरीच्या परिसरातील ययातीचे वेगळेपण आणि आगळेपण या उद्गारांनी ठसठशीतपणे नजरेत भरू लागते आणि कादंबरीकडे पाहण्याचा एक चष्मा तयार होऊ लागतो. ययातीचे रूप न्याहाळण्यासाठी या चष्म्याची गरज आहे असे नाही. चष्म्याविनाही तिची वैशिष्टये सामान्यातल्या सामान्य वाचकालाही सहज प्रतीत होणारी आहेत; पण खुद्द लेखकानेच ययातीच्या बांधणीची कहाणी प्रांजळपणे सांगितली असल्याने 'संकल्प आणि सिद्धी' यातले अंतर जोखून पाहणे रसिकांना सुलभ झाले आहे. ययातीच्या वाचनानंतर मनावर सामग्र्याने होणारा एकच एक परिणाम कोठला असेल, तर त्यातील विषयांच्या भव्यतेचा आणि आशयाच्या सर्वस्पर्शित्वाचा. ययाति ही एक मामुली कादंबरी नव्हे, आधुनिक मराठी कादंबरीच्या परिसरात खांडेकरांच्या लेखणीतून प्रकट झालेले ते एक गद्य महाकाव्य आहे, असे म्हणावेसे वाटते ते यामुळेच.

### महाकाव्याचा आत्मा

'ययातीला' महाकाव्य संबोधताना तंत्रदृष्टया ती संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी सांगितलेल्या महाकाव्याच्या चौकटीत बसू शकेलच असे नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. 'सर्गबन्धो महाकाव्यम्' हा दण्डीचा निकष तिला सुतराम लागत नाही. तथापि जे थोडेफार निकष लागतात त्यामुळेही हा दावा सिद्ध होतो असे मला वाटत नाही. उदाहरणार्थ महाभारतासारख्या इतिहासातून ययातीच्या

मुखपृष्ठ : १. पेद्रो अल्गोर्ता. २. रॉबर्टो कॅनेसा. ३. अल्फ्रेडो डेल्गॅडो. ४. डॅनियल फर्नांडिझ. ५. बॉबी फ्रॅकॉइस. ६. रॉय हार्ले. ७. ज्यो लुइस इन्सार्ते. ८. जेव्हियर मिथॉल. ९. अल्बेरो मॅंगिनो. १०. कार्लिटस पेझ. ११. फर्नांदो पेरॅडो. १२. रॅमन सॅबेला. १३. फिटो स्ट्राऊच. १४. एड्युअर्डो स्ट्राऊच. १५. अॅन्टोनिओ व्हिजिटिन. १६. गुस्ताव्ह झेर्बिनो.

कथाभागाची गुंफण करण्यात आली आहे. वीर-पुरुष आणि राजस्त्रिया यांचे चित्रण त्यात आले आहे. नगर, पर्वत, समुद्र, षड्ऋतु, चंद्र-सूर्यांचे उदयास्त, उद्यानक्रीडा, मधुपान, पुत्रजन्म, राजकारण, युद्ध, प्रवास, सैन्याचे प्रयाण इत्यादिकांच्या सढळ वापराने आणि काव्यमय वर्णनामुळे या कादंबरीच्या मांडणीत महाकाव्याचा थाट उभारला आहे; पण यापैकी एकाही गुणविशेषामुळे महाकाव्याला 'महाकाव्य-पद' प्राप्त होते असे मला वाटत नाही. महाकाव्याचा आत्मा कलाकृतीच्या भव्यतेत आहे, व्यक्तिरेखांच्या उत्कटतेत आणि उग्रतेत आहे, व्यक्ती आणि नियती यांच्या रौद्र संघर्षातून प्रकट होणाऱ्या सनातन शोकांतिकेत आहे; जीवन आणि मृत्यू, सुख आणि दुःख, साधुत्व आणि दुर्जनत्व या द्वंद्वांच्या कविमानसात चाललेल्या मंथनात आहे आणि जीवनावर भाष्य करणाऱ्या कवीच्या चिंतनशील वृत्तीत आहे. हे स्पर्श कलाकृतीत जिथे जिथे जाणवतात तिथे तिथे ती समकालीन मूल्ये आणि वादविवाद यांना ओलांडून पुढे जाते आणि ती महाकाव्याचे रूप धारण करते. हे सर्व स्पर्श कमी-अधिक प्रमाणात आणि उच्च-नीच पातळीवर 'ययाती'मध्ये जाणवतात म्हणूनच तिला महाकाव्याचे अभिधान द्यावेसे वाटते.

## खांडेकरांचे आगळे व्यक्तिमत्त्व

तरल कल्पकता, अभ्यासूवृत्ती, चिंतनशील मनःपिंड, सौंदर्यासक्ती, प्रखर विश्लेषणशक्ती इत्यादी अनेक गुणांच्या समुच्चयामुळे अशा कलाकृतीच्या निर्मितीला खांडेकरांनी हात घालावा यात अलौकिक असे काही नाही. खांडेकरांच्या कादंबरी, कथा-लेखनातील गुणावगुणांबद्दल मतमतांतरे कोणतीही असोत—नजीकच्या भूतकालातच नव्हे तर वर्तमानकाळातही 'खांडेकर' हे एक प्रभावी, प्रेरक आणि संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व आहे याबद्दल दुमत होईल असे वाटत नाही. कोल्हटकर-गडकरी यांच्यासारख्या पूर्वसूरींचे त्यांच्या शैलीवरले आणि रसिकतेवरले संस्कार हा कदाचित् विवाद्य मुद्दा होईल. आगरकर आणि हरिभाऊ आपटे यांच्या प्रेरणेतून उपजलेला आणि (त्यांनीच कबूल केल्याप्रमाणे) वाङमयीन परिस्थितीमुळे स्वीकारावी लागलेली त्यांची आग्रही सामाजिकता, हाही कदाचित मतभेदाचा मुद्दा होईल. निर्भेळ कलाकार म्हणून त्यांच्या थोरवीबद्दलदेखील अनेक बाजू दर्शविता येतील; पण आजच्या आणि कालच्या अनेक श्रेष्ठ कलाकारांना त्यांचे सर्वकष व्यक्तिमत्त्व अनेक अर्थांने प्रेरक झाले आहे ही गोष्ट त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावीच लागेल. टीकाकार आणि कलाकार, तत्त्वज्ञ आणि कवी, संत आणि सौंदर्यवादी या भूमिकांचा त्यांच्या वृत्तीत जो असाधारण संगम झालेला आहे त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात काही एक आगळेच आकर्षण निर्माण झाले आहे. त्यांच्या कल्पकतेची भरारी, त्यांच्या प्रखर विश्लेषणाची धार, मनुष्यमात्राच्या सुखदुःखांबद्दलची त्यांची गाढ आत्मीयता, मिळतील तेथून ज्ञानकण जमा करण्याची त्यांची युयुत्सु वृत्ती, जीर्ण समाजरचनेबद्दलचा त्यांचा कठोर आवेश, नवसमाजरचनेची त्यांची स्वप्ने, साधुत्व-मांगल्यावरील त्यांची गाढ श्रद्धा, आधुनिकतेचे आव्हान स्वीकारण्याची त्यांची हिरीरी, आध्यात्मिकतेकडील त्यांची ओढ इत्यादी अनेक विशेषांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व जितके समृद्ध आणि आकर्षक, तितकेच क्वचित अनाकलनीयदेखील झाले आहे. ते देव मानीत नाहीत; पण आत्मा मानतात—आणि ययातीसारख्या कादंबरीत तर या आत्म्याच्या कल्पनेचे वेदांच्या आणि उपनिषदांच्या आधारे ते विश्लेषण करू पाहतात. गांधीजी आणि विनोबांच्या जीवनप्रणालीचे त्यांना गाढ आकर्षण आहे; पण या थोर विभूतींचा यंत्रविद्वेश आणि त्यांची टोकाची विरक्ती यांना त्यांनी कडाडून विरोध केला आहे. ब्रह्म-मोक्षाच्या आणि पाप-पुण्याच्या कल्पना टाळून मानवधर्मावर नव्या आध्यात्मिक शक्तींचा प्रपंच थाटता येईल अशी त्यांची बळकट श्रद्धा आहे. व्यक्तिजीवनात दारिद्र्यापासून तो प्रकृतीच्या दौर्बल्यापर्यंत त्यांनी अनेक तीव्र दुःखांचे आघात सोसले; पण त्याबद्दल कधीही कुरकुर केली नाही की आपला आशावाद पिचू दिला नाही. व्यक्तिगत आपत्तींच्याकडे बघण्याचा त्यांचा हृद्य दृष्टिकोन ययातीच्या प्रारंभीच्या निवेदनात सहजगत्या प्रकट झाला आहे. यावरून त्यांच्या ऋषितुल्य वृत्तीची साक्ष पटते. या ऋषितुल्य वृत्तीत अनेक विरोधी आणि विविध स्वभावछटांचे मोठे मनोज्ञ मिश्रण झाले आहे. या सर्व स्वभावछटांचा उल्लेख मी केला आहे की, 'ययाति' सारखी कादंबरी हा या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचाच एक स्वाभाविक आविष्कार आहे हे रसिकांच्या ध्यानी यावे. ऋषितुल्य समरसता आणि अलिप्तता, रसिकता आणि विवेचकता यांची ज्या प्रतिभाबलात धारणा होत नाही त्या प्रतिभेला ययातीसारखी कलाकृती निर्माण करणे शक्य होणार नाही. कारण 'ययाती' केवळ कथनकौशल्याने नटलेली, हृदयंगम व्यक्तिरेखांनी सजलेली वा उत्कट-उदात्त प्रसंगांनी गुंफलेली नाट्यपूर्ण कहाणी नव्हे. 'ययाति' हा एक जीवनशोध आहे.

## 'ययाति'—एक जीवनशोध

हा 'जीवनशोध' परिमाणतः सुख आणि दुःख, नीति आणि अनीति, धर्म आणि अधर्म या सनातन द्वंद्वांचा शोध आहे. माणूस जगतो कशासाठी ? प्रीति म्हणजे काय ? मृत्यूने वेढलेल्या टीचभर जीवनात मानवी मूल्यांना अर्थ आहे की नाही ? मनोविकारांना स्वैर सोडून वा त्यांचे संपूर्ण दमन करून जीवनसाफल्य पदरात पडेल की नाही ? कर्तव्याचा अर्थ काय ? संसाराचे अधिष्ठान काय ? यासारखे अनंत कूटप्रश्न या कादंबरीच्या वाचनात ठायी ठायी वाचकाला भेटतात आणि अनेक कूट—गूढ समस्यांचे मनोज्ञ चित्रण आणि विश्लेषण प्रभावी रीतीने ठिकठिकाणी प्रकट होताना रसिकांना आढळते. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी खांडेकरांच्या कादंबऱ्यांना पूर्वी एकदा 'होल्ड ऑल'ची उपमा दिली होती. उपरोधाने नव्हे तर गौरवार्थाने. ही उपमा ययातीला अधिक यथार्थतेने शोभून दिसते. सुटसुटीत आणि आरस्पानी बांधणीच्या कादंबरीत विचारांच्या खोगीरभरतीला स्थान असत नाही हे जितके खरे, तितकेच महाकाव्याच्या पातळीवर जाऊन जीवनदर्शनाला हात घालणाऱ्या लेखकाला या विचारांना स्पर्श केल्याशिवाय भागत नाही हेहि खरे आहे. टॉल्स्टॉयची 'वॉर अँड पीस' ही कादंबरी सुटसुटीत आणि सुबक नाही हे सिद्ध करण्यास साहित्यशास्त्राची मदत घेण्याची गरज नाही; पण 'वॉर अँड पीस'ची महात्मता तिच्यातील सर्वंकश जीवनशोधातच आहे, हे कोण अमान्य करील ? कांचनमृगापासून क्रौंचवधापर्यंत अनेक कादंबऱ्यांतून खांडेकरांच्या लेखनातील एक द्वंद्व रसिक वाचकांपुढे नेहमीच प्रकट झालेले आहे. त्यांच्या प्रस्तावनेतील विश्लेषण जितके सर्वंकष आणि मूलग्राही त्या मानाने त्यांनी उभी केलेली कथावस्तु नेहमी कमी-अधिक प्रमाणात थिटी वाटे. त्यांच्या प्रतिमेतील कलाकार हा त्यांच्या वृत्तीतल्या भाष्यकारापुढे नेहमीच फिका, प्रसंगी दुबळा वाटे. ययातीने हे द्वंद्व सोडवले आहे असे मला वाटते. महाभारतातून उचलेल्या कथावस्तूवर कलाकार खांडेकरांना जरुरीपुरतेच संस्करण करावे लागले आहे; पण भाष्यकार खांडेकरांना त्यांच्या त्या क्षेत्रातल्या बळाशी पुरून उरेल एवढी प्रचंड वस्तु मुळातच गवसली आहे. म्हणूनच भाष्यकार आणि कलाकार खांडेकरांच्या प्रतिभेचा चतुरस्र विलास या कादंबरीत अनेक ठिकाणी प्रत्ययाला येतो.

शुक्राचार्य आणि यति यांसारख्या उग्र, ययाति आणि देवयानी यांसारख्या तामसी आणि शर्मिष्ठा व कच यांसारख्या सात्त्विक वृत्तीच्या स्वभावचित्रांनी सजीव झालेली ही कथा मूलतः ययातीचा स्वतःचा जीवनशोध आहे. नहुषासारख्या पराक्रमी पित्याला मिळा-लेला शाप आणि त्याचे शोकांत जीवन या घटनेपाशी चिमुकल्या ययातीचा जीवनशोध सुरू होतो आणि आडवळणे घेत, तीव्र, उत्कट, भयकारी, मोहक, दाहक, उदात्त अनुभवांचा स्वाद घेत पराकाष्ठेच्या आत्मार्पणाशी आणि पुनर्जन्माशी हा शोध संपतो. हा शोध जितका नाटचपूर्ण आणि विस्मयजनक आहे तितकाच प्रत्येक वळणाशी तो गहन समस्येला हात घालणारा आहे. बालपणापासून लहान–मोठ्या सुखाच्या फुलपाखरामागे धावणारा माणूस कळत-नकळत स्वतःच्या मनोविकारांचा दास बनतो. भोगाची चटक लागलेल्या मनाचे कालांतराने धरबंद सुटतात आणि माणूस शरीरपूजक होतो आणि अखेर भोग–अतृप्ति–दुःख म्हणून जास्त भोग अशा कधीही न थांबणाऱ्या भीषण चक्राचा बळी होतो–हे सत्य ययातीच्या कहाणीतून विविध रीतीने सूचित करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. 'नहुषाची मुले कधीहि सुखी होणार नाहीत !' या अगस्तीच्या शापाने हाय खाऊन वैराग्याच्या गुहेत पळून गेलेला ययातीचा थोरला भाऊ यति आणि ययातीने संन्यास घेऊन पळून जाऊ नये यासाठी त्याला विलासमग्न ठेवण्याची पराकाष्ठा करणारी दुबळी-भोळी राजमाता, कळत-नकळत ययातीच्या बालपणीच त्याच्या विनाशाची बीजे पेरून ठेवतात. मनोविकारांना षड्रिपु मानण्याची आपल्याकडे सनातन परंपरा आहे. योगसाधनातील तर तो एक महत्त्वाचा भाग आहे. दुःखाच्या भयाने सुखापासून दूर पळणारा यति मनोविकारांचे निर्दालन करून सुखाचा शोध लावण्यात अयशस्वी झाल्यास नवल काय ? कडू फळे, काटेरी शय्या, स्त्रीद्वेष, विजनवास यांच्या उग्र आणि खडतर तपश्चर्येतून यतीला अनेक सिद्धी प्राप्त होऊन-देखील बिचाऱ्यावर वेडापिसा होण्याची पाळी आली. या अनुभवाने पोळलेल्या ययातीने दुसरे टोक गाठले. शरीरपूजा, मनोदास्य, भोग–अधिक भोग, धर्म्यअधर्म्य मार्गाने मिळालेला भोग या मार्गांचा आश्रय करूनहि ययाति अखेर दुःखाच्या –न संपणाऱ्या दुःखाच्या गर्तेतच खितपत पडला. मनोविकार हे देव नाहीत आणि शत्रूहि नाहीत. त्यांची पूजा करून चालणार नाही आणि त्यांचे निर्दालन करूनहि भागणार नाही. शरीरधर्म हे कधी कोणाला चुकले नाहीत. त्याच्या आधीन होण्याचे कारण नाही, तसेच त्याबद्दल शरमिंदे होण्याचीहि गरज नाही. सुखाचा शोध हा स्वैराचरण आणि संपूर्ण दमन यांच्या बरोबर मध्यावर आहे! वासना-विकारांच्या उदात्तीकरणात आहे, स्वधर्माची आणि कर्तव्यभावनेची चौकट या मनोविकारांना घालण्यात आहे. यति आणि ययाति यांच्यामधली तपस्या शर्मिष्ठा आणि कच यांच्या जीवनात आविर्भूत झाली म्हणूनच अनंत दुःखे सोसूनहि ही माणसे तृप्त झाली. शरीराचे दमन वा दास्य करणारी माणसे आपआपल्यापरी परतंत्र होतात आणि त्यांचे जीवनहेतु विफल होतात. 'ययाति' कादंबरीची उभारणी या आशयाच्या अधिष्ठानावर करण्यात आलेली आहे.

## आशयाचे अनेक स्तर आणि परिमाणे

मात्र हा आशय एक-दोन वाक्यांत सुटसुटीतपणे सांगता येईल इतका एकेरी आणि एकरंगी नाही. अनेकांच्या जीवनहेतूंचे संघर्ष, निरनिराळ्या पात्रांचे स्वभावविशेष आणि नियतीने केलेली पारध यामुळे कथावस्तूलाच नव्हे तर त्यातील आशयालाही अनेक स्तर आणि परिमाणे निर्माण झाली आहेत. ययातीच्या कहाणीला मनो-विश्लेषणात्मक असा एक सघन अर्थ आहे. पित्याच्या शापाने आणि भावाच्या पलायनाने बाल ययातीच्या मनात विलासप्रियतेबरोबरच एका अनामिक भयाची जोपासना झालेली दिसते. रणांगणावर निधड्या छातीने शत्रूचा समाचार घेणारा ययाति मृत्यूला घाबरतो, वार्धक्याला थरथर कापतो. शर्मिष्ठेच्या उत्कट प्रीतीचा स्पर्श होऊनही शुक्राचार्यांच्या भीतीने देवयानीपुढे शरण जातो. अलकेचा मृत्यु निष्क्रियतेने पाहणारा आणि शर्मिष्ठेला वाऱ्यावर सोडून देणारा ययाति भित्रा आहे, दुष्ट नाही. पुरुपाशी यौवनाची भिक्षा मागणारा आणि मुकुलिकेच्या मिठीत पित्याच्या मृत्यूच्या वेदना विसरणारा ययाति भित्रा आहे, नुसता सुखलोलुप नाही. किंबहुना ययातीची विलाससाधना ही एका भयाण अनामिक भीतीच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आहे. ययातीसारखा शूर योद्धा भीतिग्रस्त असावा हे द्वंद्व जितके विस्मयकारी तितकेच वास्तव आहे. या भीतीपायी– केवळ विलासापोटी नव्हे, ययाति आपल्या जिवलग मित्राच्या वधूवर आणि आपल्या अंगाखांद्यावर एके काळी खेळणाऱ्या त्याच्या पुतणीवर बलात्कार करण्यासहि सिद्ध होतो. हे क्रौर्यदेखील भीतीच्या पोटी उपजणाऱ्या पलायनवादी वृत्तीतून अवतरावे हाहि मानवी मनोधर्माचाच एक चमत्कार आहे; पण या अधः-पतनाला ययातीइतकीच त्याची पत्नी देवयानी हीदेखील कारण झालेली आहे. देवयानी ययातीशी लग्न करते ते राज्ञी होण्याच्या अभिलाषेने. पतीशी ती कधीच समरस होऊ शकली नाही. कचाबद्दलची प्रीती ती विसरू शकत नाही; पण प्रीती हा शब्दच तिला पारखा आहे. कचाबद्दलची तिची प्रीती काय किंवा शुक्राचार्यांबद्दलची तिची भक्ती काय– ही एक प्रकारची आत्मपूजाच आहे. शर्मिष्ठेला दासी म्हणून राबविण्यात आणि ययातीची आपल्या निष्प्रेम संसारात धिंड काढण्यात तिचा अहंकार आणि आत्मपूजाच प्रकट झालेली आहे. आत्मार्पण तिच्या गावीदेखील नाही. तिच्या हातून एकही अधर्म्य कृत्य झाले नसले, तरी अहंकाराच्या दास्यत्वामुळेच ती इतरांच्या आणि म्हणून स्वतःच्याही दुःखाला कारण झाली आहे; पण देवयानी तरी इतकी आत्मकेंद्रित कशी झाली ? इथेच तिच्या स्वभाव-विशेषाइतकाच तिच्या पित्याच्या म्हणजे शुक्राचार्यांच्या वृत्तीचाही संबंध येतो. शुक्राचार्यांच्या तपस्येतील उग्रपणा आणि तामसीपणा त्यांच्या एकुलत्या एक कन्येने न उचलला तरच आश्चर्य. अशी उग्र तामसी माणसे आपल्या प्रियजनांनाहि आपल्या सुखाचे साधन करू लागतात. देवयानी ययातीला वा कचालाच नव्हे तर शुक्राचार्यांनाही आपल्या सुखाचे साधन मानीत होती. शुक्राचार्यांनीही या बाबतीत तिच्या अहंकाराचे लालनपालनच केले.

## प्रेमाचा त्रिकोण

देवयानी-ययाति यांच्या विस्कटलेल्या संसाराचे, त्यांतील परस्परांच्या दुखावलेल्या अहंकाराचे, तज्जन्य सूडबुद्धीचे आणि अखेर त्यातून उपजणाऱ्या प्रलयाचे चित्रण खांडेकरांनी प्रस्तुत कादंबरीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या भागांत केले आहे. पत्निसुखाला आचवलेला ययाति शर्मिष्ठेच्या प्रेमपाशात गुरफटतो आणि या अधर्म्य आणि अनितिमय मानलेल्या प्रेमसंबंधापासूनच ययातीच्या उद्धाराला प्रारंभ होतो.

शर्मिष्ठेची व्यक्तिरेखा ही या कादंबरीत म्हणूनच एक समृद्ध अनुभव घेऊन आकारली आहे असे वाटते. देवयानीच्या अपमानामुळे तिने स्वतःवर ओढवून घेतलेले दास्यत्व, ते दास्यत्व स्वीकारण्यातही तिने दर्शविलेली कर्तव्यबुद्धी, ययातीवरील तिची अबोल प्रीती, तिचे आत्मार्पण, तिचा विजनवास, छळ आणि अखेर पुरूच्या रूपाने तिने उभा केलेला आपल्या सात्त्विकतेचा नवा आदर्श, यामुळे शर्मिष्ठेची व्यक्तिरेखा निःसंशय हृदयंगम झालेली आहे. थोर पुरुषांच्याप्रमाणेच

पृष्ठ ३२ वर

# इस्लामिक संस्कृती परिचय लेखमाला

## लेखांक पाच । उर्दू भाषा

### रझिया वझिफ्दार

भारतातली इस्लामची वाढ उर्दूच्या माध्यमातूनच फार मोठ्या प्रमाणावर झाली. किंबहुना उर्दू आणि भारतीय मुस्लिम परस्परांशी इतके एकसंध झाले की, उर्दू ही मुस्लिम भाषा म्हणूनच ह्या देशात ओळखली जाऊ लागली. १५ व्या / १६ व्या शतकात तर देशात सर्वत्र पर्शियन किंवा तुर्की–अरेबिक भाषांऐवजी उर्दूलाच दरबारी भाषेचा दर्जा मिळाला आणि उर्दू एकदमच फोफावली. मूळच्या स्थानिक ब्रिजभाषेला ही जवळची असल्याने, स्थानिक जनतेला उर्दू जवळची वाटली व तिनेही ती भाषा आत्मसात करून तिच्या वाढीला हातभार लावला. उर्दूने अरेबिक लिपी स्वीकारल्यामुळे मुस्लिमांनाही इतर भारतीय भाषांपेक्षा ती जवळची वाटू लागली. पर्शियन, तुर्की मुस्लिमांनाही त्यामुळेच उर्दू समजू शकली व पर्शियन – छाप उर्दूवर उठवणे त्यांना शक्य झाले. थोडक्यात, राज्यकर्ते व जनता ह्या दोघांनीही सोयीच्या दृष्टीने ही भाषा उचलून धरली. त्यामुळे ही भाषा झपाट्याने सुधारली. पर्शियनबरोबरच्या सलगीने ती समृद्ध झाली. शेकडो वर्षे ह्या देशात अशी ती खळाळत वाहत राहिल्याने व त्यातही राज्ययंत्रणेचा पाठिंबा असल्याने तिने अन्य भारतीय भाषांवरही आपला ठसा उमटवला. एकूणच भारतीय समाजजीवनाशी एकरूप होऊन उर्दूने भारतीयांच्या गेल्या कित्येक शतकांच्या वाटचालीतही महत्त्वाची भूमिका बजावली. आजही प्राय: ती मुस्लिमांची म्हणून ओळखली जात असली तरी उर्दूचे एकूण भारतीय जीवनातले महत्त्व वादातीत आहे !

'उर्दू' ही तीन-चार भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली आहे आणि इस्लामची ती भारताला देणगी आहे ! १८५७ च्या स्वातंत्र्यसमरानंतरच्या राष्ट्रीय चळवळीतून उर्दूने बजावलेली कामगिरी लक्षात घेता हजार वर्षांच्या सहवासानंतर मुस्लिम भारतीय जीवनाशी किती एकरूप झाला होता त्याचेच प्रत्यंतर ५७ नंतरचे उर्दू साहित्य देईल ! 'उर्दू'ला इस्लामची देणगी असे मी म्हटले ते त्यामुळेच !

'उर्दू' हा मुळात 'तुर्की' शब्द आहे आणि त्याचा अगदी शब्दश: अर्थ घ्यायचा तर तो 'सैन्य' वा 'सैनिक मेळावा' (Camp) असा आहे. अनेकदा 'सैनिकी परिभाषा' ह्या अर्थानेही तो वापरला गेला आहे. इ. स. १०२७ मध्ये गझनीच्या महंमदाने पंजाब जिंकून घेतला. त्याच्याबरोबर आलेले अनेक मुस्लिम सैनिक पंजाबातच स्थिरावले. साहजिकच स्थानिक जनतेबरोबरच्या व्यवहारासाठी त्यांना पंजाबी आत्मसात करावी लागली; परंतु ह्या प्रक्रियेतून त्यांच्या मातृभाषेतलेही अनेक शब्द तिथे रूढावले. त्यातूनच पंजाबी, ब्रिजभाषा आणि मुस्लिम शिपायांची मातृभाषा ह्यांच्या मिश्रणातून एक अगदीच वेगळी भाषा निर्माण झाली. सैनिकांनी तयार केलेली, सैनिकांची अशी ही 'उर्दू!' तिच्या जन्माचा हा त्रोटक इतिहास आणि जन्मस्थान अर्थातच पंजाब आणि लाहोर ! उर्दूसंबंधी असा एक समज आहे की, 'उर्दू'चे मूळ स्थान दिल्ली ! परंतु हे चुकीचं आहे. वर सांगितल्याप्रमाणे गझनीच्या सैनिकांनी पंजाबात 'उर्दू' बोली सुरू केल्यानंतर सुमारे १५० वर्षांनंतर कुतुबबुद्दीन ऐबकने प्रथमच मुस्लिम शासन दिल्लीत प्रस्थापले ! साहजिकच दिल्ली नव्हे तर लाहोर हेच उर्दूचे उगमस्थान मानले पाहिजे. लाहोरहून दिल्लीला आल्यानंतर उर्दू अधिक फोफावली यात मात्र वाद नाही. तथापी इ. स. १८३५ पर्यंत तिला संपूर्ण दरबारी भाषेचा मान मात्र मिळाला नाही. पर्शियन हीच दरबारी भाषा राहिली व साहजिकच पर्शियनचा अधिकाधिक प्रभाव उर्दूवर पडत राहिला !

१३२७ मध्ये महंमद तुघलकांनी आपली राजधानी दौलताबादला हलवली आणि दक्षिणेकडे उर्दूला वाव मिळाला. १३४८ च्या सुमारास अलाउद्दीन हसन बहामनीने महंमद तुघलकाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. बहामनी घराण्याची सत्ता दिल्लीच्या विरोधात दक्षिणेत उभी केली. ही सत्ता अर्थातच मुस्लिम होती व उत्तरेतून आलेले अनेक मुसलमान सैनिक बहामनी राज्यात होते. ओघानेच बहामनी राज्यात दिल्लीपेक्षाही आधी उर्दूला मानाचे स्थान मिळाले. इथे उर्दू फोफावली ती मात्र मराठी–तेलगूच्या सान्निध्यात. ह्या तिन्ही भाषांचा ओघानेच परस्परांवर परिणाम झाला. साहजिकच इथली उर्दू दिल्ली-उर्दूपेक्षा काहीशी वेगळी राहिली. 'दख्खनी उर्दू' म्हणूनच ती ओळखली जाऊ लागली. मात्र दरबारी दर्जा मिळाल्यामुळे तिची वाढ लौकर झाली. लिपीही अरेबिकच राहिल्याने दिल्ली उर्दूशी तिची जवळीकच राहिली व काही काळातच उर्दूच्या ह्या दोन उपशाखांमध्ये फारसा फरक असा राहिला नाही.

उर्दूच्या वाढीला आणखी हातभार लागला तो इस्लामिक धर्ममार्तंडांचा ! धर्माच्या प्रसारासाठी त्यांना पर्शियन किंवा तुर्की भाषेचा वापर करून चालण्यासारखे नव्हते. बोली भाषेच्या माध्यमातूनच जनतेपर्यंत जाणे त्यांना भाग होते. साहजिकच धर्मप्रसारासाठी उर्दूचाच आधार त्यांनी घेतला. मूळातले असे काही धार्मिक शब्दप्रयोग त्यांनी अरेबिक वा पर्शियन भाषेतून उर्दूमध्ये आणले. ह्या दृष्टीने विचार करता सुरुवातीचे साहित्य प्राय: धार्मिकच का होते हे

सहज ध्यानात यावे. जवळजवळ १५९० पर्यंत उर्दू साहित्य हे धार्मिकच राहिले. त्यानंतरच केवळ उर्दू साहित्यात नवनवीन दालने खुलत गेली. १५९० च्या पूर्वीच्या काळात निजामी, अशराफ, फिरोझ आदी काही थोडीशी नावे सोडली तर बाकी बहुतेक साहित्य-निर्मिती ख्वाजा बन्देह नवाज, शाह मिरान्जी आदी धर्मपंडितांचीच होती. शाह मिरान्जींनी सुफी तत्त्वज्ञानावर आधारित खुष नामाह व खुष ह्या दोन काव्यरचनाही केलेल्या आहेत. शेख बुरहानुद्दीन ह्यांचेही खूप साहित्य प्रकाशित आहे.

महंमद कुली कुतुब शाह ह्यांनी उर्दू साहित्यात नवीन दालन उघडले असे मानायला हरकत नाही. गझल, कसीदा, मसनवी, मरसिया वगैरे नवे काव्यप्रकार उर्दूत त्यांनी सुरू केले. हिंदू चाली-रीती, हिंदू सण, हिंदू विवाह वगैरेंची, वर्णने देखील त्यांनी उर्दूत केली. ह्याच काळातला आणखी प्रतिभासंपन्न उर्दू कवी म्हणजे गुजराथेतले शाह महंमद वलीयुल्लाह. उर्दू साहित्याचा बाबा–इ–रिख्ताह ( पितामह ) म्हणूनच ते ओळखले जातात. सहज साध्या, ओघवत्या उर्दूत त्यांनी त्या वेळचे समाज–जीवन शब्दबद्ध केलेले आहे.


औरंगझेबाच्या दक्षिण–विजयानंतर, उत्तर–दक्षिण दळणवळण मोठ्या प्रमाणात सुरू झाले. उर्दू भाषाही त्याला अपवाद राहिली नाही. दक्षिणेत विजय संपादून परत गेलेल्या मुघल सैनिकांनी आपल्या-बरोबर दखनी उर्दूतल्या रचनाही दिल्लीला नेल्या. काही जुन्या उर्दू साहित्यिकांनी दिल्ली–उर्दूत मोलाची कामगिरी बजावली ह्यात वाद नाही. पण दखनी उर्दूच्या दिल्लीला पोचलेल्या साहित्याने, उर्दूभाषेत खूपच बदल घडवून आणला. दखनी उर्दू रचनेचे दिल्लीत जोरदार स्वागत तर झालेच. वलीच्या 'दीवाना'नी लोकांना अक्षरशः वेडे केले. त्याच्या अनेक नकलाही दिल्लीकर उर्दू शौकिनांनी केल्या.

एवढे असले, तरी राजदरबारची भाषा अद्यापही पर्शियनच होती. साहजिकच, पर्शियन साहित्य अधिकाधिक खुलतच होते. अधिकाधिक सुंदर होत होते. ह्याचा तार्किक परिणाम ओघानेच उर्दूवरही होत होता व 'उर्दू' बोलीभाषा राहूनही, तिच्यात अधिकाधिक पर्शियन वाक्प्रचारांचा, म्हणींचा, शब्दांचा शिरकाव होत होता. मीरझा, रफी, सौदा, मीर–तकी–मीर आदींच्या काळात गझल, कसीदाह आदी काव्यप्रकार उच्चावस्थेला पोचले; पण पर्शियनच्या आधारे ! मजहर, सौज, यकीन, हिदायत आदी त्या काळातले गाजलेले साहित्यिक तर मूलतः पर्शियनच होते. साहजिकच त्यांच्या उर्दू साहित्यावर ब्रिज, पंजाबी आदींपेक्षा पर्शियनचाच पगडा अधिक होता. नंतरच्या, नासिर, गालिब, जाफर आदी गाजलेल्या कवींनीही हीच परंपरा काहीशी पुढे चालवली. गालिबच्या गाजलेल्या काव्यरचना म्हणूनच एक तर फारशीत तरी आहेत किंवा जवळजवळ फारशीसदृश तरी !

उर्दूच्या ह्यानंतरच्या वाटचालीत, महत्त्वाचा वाटा आहे तो लखनौच्या नबाबांचा ! उर्दू काव्याचे काही नियम तयार होऊन, त्याला उच्च दर्जा प्राप्त करून देण्यात लखनऊचा हातभार फार लागला. शेख नासिख ह्यांनी हे काव्य पूर्णत्वाला नेण्यासाठी फार परिश्रम घेतले. त्यांच्याचमुळे, लखनवी मरसिया स्वतःच्या अशा वेगळ्या वैशिष्ट्यांनी गाजली. मीर अनिस, मिरझा दबीर ह्या साहित्यिकांनीही उर्दूत त्या काळी मोलाची भर घातली.

इ. स. १८०० साली कलकत्यात ईस्ट इंडिया कंपनीने फोर्ट विल्यम कॉलेज सुरू केले आणि तिथून उर्दू साहित्याला एक नवीन दिशा मिळाली. डॉ. जॉन गिलख्रीस्तच्या आधिपत्याखाली, इंग्रजांना भारतीय भाषा शिकण्यासाठी तिथे स्वतंत्र विभाग खोलण्यात आले. विशेषतः पर्शियन व संस्कृत ह्या भाषांवर फार मोठा भर देण्यात आला. ह्या दोन्ही भाषांमधल्या रचना इंग्लिशमध्ये भाषांतरित करण्यात आल्या; तर कित्येक नव्या उत्तमोत्तम कृती प्रकाशात आल्या. शेर अली अफसोस, निहालचंद लाहोरी, अली हुसैनी वगैरेंनी ह्या काळात उर्दू आणि फारसी साहित्यात फार मोठी भर घातली. विशेष म्हणजे त्या काळापर्यंत फारसे प्राधान्य न मिळालेल्या गद्य–रचनेचा पाया ह्या काळात ह्या साहित्यिकांनी घातला. इंग्लिशशी ओळख झाल्याने, त्याचीही नकळत छाप ह्या साहित्यिकांच्या कला-कृतीवर पडली व उर्दूत नव्या विचारसरणीचा प्रवेश झाला. हा नवा प्रभाव १९ व्या शतकाच्या सुरुवातीला वाढताच राहिला. १८२५ मध्ये 'दिल्ली कॉलेज' प्रस्थापित झालं. ह्या कॉलेजनेही, कलकत्ता कॉलेजप्रमाणेच, उर्दूला नव्या मोडवर ठामपणे उभे केले. अशा तऱ्हेने उर्दूच्या ब्रिटिशपूर्व काळातला हा त्रोटक इतिहास पाहिला तर एक गोष्ट सहज लक्षात येईल. देशात मुसलमान सर्वत्र पसरले व तसे ते पसरत असताना, त्यांनी सर्वत्र आपल्याबरोबर खडी बोलीही नेली. ह्या भाषेचा तिथल्या तिथल्या भाषांशी संबंध येऊन प्रत्येक ठिकाणी काहीशी वेगळी, पण दिल्ली उर्दूशी अगदी जवळचे नाते सांगणारी भाषा अस्तित्वात आली. अरेबिक लिपी मात्र सगळ्या देशभरच वापरण्यात आली. साहजिकच, मुस्लिम अंमलात उर्दू हीच भाषा देशभर सर्वत्र 'समान भाषा' वा 'Link Language' म्हणून अस्तित्वात आली.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरानंतर, उर्दू साहित्याने नवे वळण घेतले ते राष्ट्रीय साहित्याचे. १८५७ नंतरच प्रामुख्याने स्थानिक राजवटी पूर्णपणे निकालात निघाल्या आणि ब्रिटिश अंमल ह्या देशात सुरू झाला. पाश्चात्य विचारसरणी, शास्त्रीय विकास ह्यांच्याशी त्यामुळे आपोआपच भारतीयांचा घनिष्ठ संबंध आला. त्याची छाप सर्वच भारतीय भाषांवर उमटणे साहजिक होतेच; पण प्रगत विचारां-बरोबरच, आणखीही एका विचाराने भारतीयांना ग्रासले होते. ब्रिटिश राजवट ही परकी राजवट होती. ह्या राजवटीविरुद्ध झगडून आपले स्वातंत्र्य पुनः प्रस्थापित करण्याचा विचारही भारतीयांमध्ये मूळ धरू लागला होता. ह्या विचाराची झाकही साहित्यावर उमटणे नैसर्गिकच होते व तशी ती सर्वत्र भारतीय साहित्यावर उमटलीही ! 'उर्दू' ह्या प्रवाहापासून अलग राहाणे शक्यच नव्हते. त्या वेळी तर, देशात



सर्वत्र बोलली–समजली जाणारी तीच एकमेव भाषा होती ! ह्या प्रवाहात मिसळून भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही उर्दू सहभागी झाली; अग्रभागी राहिली. स्वातंत्र्याची महती गाणारे, देशभक्तिपर साहित्य ह्याच काळात निर्माण व्हायला सुरुवात झाली. आझाद ह्यांचे सुधारणावादी, ख्वाजा हालींचे आत्मसंशोधनात्मक, सूरजहाँ आबादीची देशभक्ती, अकबर इलाहाबादीचे व्यंगात्मक वगैरे लिखाण ह्या दृष्टीने उर्दूची नवी वाटचाल दर्शविणारे ठरावे.

१८५७ नंतर इंग्लिशचा प्रभाव पडून 'उर्दू' गद्यप्रकारालाही चांगलेच प्रोत्साहन मिळाले आणि इंग्लिश व इतर पाश्चात्य भाषांमधले स्वातंत्र्याचे वारे, उर्दू व अन्य भाषांमधूनही वाहू लागले. सर सय्यद अहमद खान ह्यांच्या कामगिरीचा ह्या दृष्टीने आवर्जून उल्लेख करावा लागेल. 'तहजीबुल अखलाख' ह्या आपल्या प्रकाशनाद्वारे त्यांनी स्वातंत्र्यस्तोत्रे गायिली. आपल्या जनतेला स्वातंत्र्याचे बाळकडू पाजले. 'उर्दू' भाषिकांना स्वातंत्र्यलढ्यात विनीचे सैनिक बनवून टाकले.

पहिले महायुद्ध, ॲनी बेझंट–लो. टिळक ह्यांची स्थानिक स्वराज्य चळवळ, जालियनवाला बाग प्रकरण ह्या घडामोडींमुळे १९२० च्या दरम्यान राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय वातावरणात एक नवीनच खळबळ उडाली. रशियन क्रांतीमुळेही वेगळे वारे देशातल्या साहित्याची कवाडे खोलून आत घुसले व साहित्याने पुन्हा एकदा नवीन वळण घेतले. स्वातंत्र्य, देशप्रेम ह्याबरोबरच समाजवादाचा कडवा विचारही 'उर्दू'वर आपला प्रभाव पाडू लागला. समाजाची घडणही काळच्या तटबंद्या मोडून काढून झपाट्याने बदलू लागली. डॉ. महंमद इक्बाल, हसरत मोहानी, फाजी बदायुनी, जिगर मुरादाबादी, पंडित ब्रिजनारायण चिक्सबत वगैरेंच्या रचनांतूनही ह्या नव्या विचारसरणीची छाप सहज आढळून येते. काव्याबरोबरच कथा–कादंबरी ह्या गद्यप्रकारातूनही ह्या नव्या लाटेचा प्रभाव जाणवतो. नव्या समाजजीवनाचे, देशातल्या स्वातंत्र्यआंदोलनाचे प्रतिबिंब ह्या कादंबऱ्यांतून, कथांतून चित्रित केल्याचे आपल्याला आढळून येईल. प्रेमचंद ह्यांच्या 'कफन', 'अंगारा' ह्या कादंबऱ्या ह्या दृष्टीने उल्लेखनीय ठराव्यात. त्याचप्रमाणे ह्या काळातले अली अब्बास हुसैनी, कृष्णचंद्र, इसमत चुगताई, राजेंद्रसिंह बेदी, बलवंतसिंह, नाझिम कासिमी, सादत हसन आदींचे लिखाणही ह्या दृष्टिकोणातून अभ्यसनीय ठरावे.

स्वातंत्र्योत्तर काळात सुरुवातीचे काही गैरसमज वगळता 'उर्दू' राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झाली आणि तिने आपली प्रगती साधली. स्वतंत्र भारताचे प्रश्न, भारताचे 'सेक्युलर' स्वरूप ह्यांच्याशी इमान राखून ह्या प्रश्नांना–आवाहनांना 'उर्दू' नेहमीच्या राष्ट्रीय बाण्याने सामोरी गेली. मीर, सौदा, यकीन, सोझ आदींच्या काव्यरचना आणि ख्वाजा अहमद अब्बास, कृष्णचंद्र, इसमत, चुगताई आदींचे लिखाण ह्या दृष्टीने अतिशय बोलके आहे. शेवटी कुठल्याही भाषेतले साहित्य म्हणजे समाजाचा आरसा असला पाहिजे. बदलत्या समाजाच्या चालीरीती, त्यांच्या इच्छा-आकांक्षा इत्यादींचे प्रतिबिंब साहित्यात उमटले पाहिजे. त्याचप्रमाणे त्या समाजाला मार्गदर्शनही साहित्याने दिले पाहिजे. भारतातल्या आपल्या हजारांहून अधिक वर्षांच्या अस्तित्वात उर्दू भाषा आणि उर्दू साहित्य ह्या प्रमाणांना जागले आहे असे मला वाटते.

उर्दूची ह्या देशातली वाटचाल ही अशी आहे. निच्यात वाढ, सुधारणा होता होता ती शक्तिशाली झाली. तितकीच ती निरनिराळे बदल सामावूनही घेऊ शकली. 'उर्दू'च्या ह्या इतिहासात काश्मिरी ब्राह्मण, उत्तर भारतीय कायस्थ, पंजाबी-शीख, मुंबईकर पारशी, कलकत्त्याचे ख्रिस्ती आणि देशभर विखुरलेला मुस्लिम समाज–अशा सर्वांचा आपापल्या परीने हातभार लागलेला आहे. अशा तऱ्हेने एका परीने 'उर्दू' ही ह्या देशात एक समान भाषा म्हणून नांदली. विविधतेने नटलेल्या वेगवेगळ्या भाषांच्या, आचार-विचारांच्या लोकांना 'उर्दू'च्या माध्यमातून एकत्र येता आले. भले मग ह्या भाषेला कुणी खडी बोली म्हणो वा हिंदुस्थानी ! मुळात ती दिल्ली-उर्दूच आहे ! !

अलीकडच्या इतिहासात म्हणजे १८५७ नंतर उर्दूवर १८५७ चे स्वातंत्र्यसमर, पहिले महायुद्ध व नंतर स्वातंत्र्यसंपादन ह्या तीन घटनांचा खूप परिणाम झाला आहे हे मान्य; पण त्याआधी म्हणजे हजार वर्षांच्या मुस्लिम राजवटीत उर्दूने भारतावर छाप पाडली होती हेही मान्य केलेच पाहिजे. मुस्लिम राज्यकर्ते भारतात विखुरले व जिथे जिथे ते गेले तिथे तिथे त्यांनी आपल्याबरोबर 'उर्दू' नेली. राजभाषा म्हणून ती प्रत्येक ठिकाणी रुजली. जिथे इस्लामी राजवट आली नाही तिथेही तिचा प्रादुर्भाव 'दिल्लीश्वरांची भाषा' म्हणून काही प्रमाणात का होईना, पण अटळ होता ! अशा तऱ्हेने समान राजशासन व समान भाषा संपूर्ण भारताला इस्लामी राजवटीच्या काळातच प्रथम मिळाली. किंबहुना इस्लामी राजवटीच्या काळातच भारत प्रथमच 'एक राष्ट्र' म्हणून जन्माला आले हे नाकारण्यात हशील नाही. इस्लामपूर्वकाळात भारत हा एक देश असा कधीच नव्हता. छोट्या छोट्या राज्यांत विखुरलेला, वेगवेगळ्या चालीरीती, भाषा-संस्कृती आचरणाऱ्या समाजांचा हा एक प्रदेश होता. इस्लामिक राजवटीखाली हा संपूर्ण प्रदेश 'एक राष्ट्र' म्हणून एका शासनाखाली, एका झेंड्याखाली उभा राहिला. भारत राष्ट्र वा 'हिंदुस्थान देश' ही कल्पना खऱ्या अर्थाने ह्याच काळात मूर्त स्वरूपात उभी राहिली. देशाच्या ह्या एकजिनसी बांधणीत इस्लामचा आणि उर्दू भाषेचा वाटा मोठा आहे. इस्लाम आणि उर्दू ह्यांनी ह्या देशाची जी


दुर्दैवी बिहारचे वेधक दर्शन

# पूर्णिया

अनिल अवचट

आवृत्ती दुसरी

किंमत सहा रुपये

ही एकजिनसी बांधणी केली त्याचाच फायदा पुढे राष्ट्रीय चळवळीच्या उभारणीला झाला हे एक ऐतिहासिक सत्य आहे !

'उर्दू' ही एक अशी शक्ती आहे. भारतीय जीवनाशी एकरूप झालेली ! तिच्यावरील सान्या बन्या-वाईट प्रसंगी तिच्या पाठीशी राहिलेली !! १८५७ नंतर देशभक्ती, देशाभिमान तिने देशाला शिकवला. पहिल्या महायुद्धानंतर समाजवादाला 'अपनावून' तिने नवी वाटचाल सुरू केली. १९४७ नंतर फाळणीच्या धक्क्यातून स्थिरावल्यानंतर ती समाजजीवनाशी पुन्हा एकरूप झाली ! आजही उर्दू ही देशातली एक समर्थ शक्ती आहे. देशातल्या चारी कोपऱ्यांत ती बोलली–लिहिली–वाचली तर जातेच; पण एका संस्कृतीचा–हिंदू-मुस्लिम ह्यांच्या हजार वर्षांच्या मिश्र व प्रगत संस्कृतीचा ठेवाही तिच्याच द्वारे देशाला आजही मिळत आहे ! देशाला एकजिनसी बनवणारी, 'भारत-राष्ट्रा'ची कल्पना साकार करणारी, सर्व भाषिकांना, धर्मीयांना सारखीच जवळची वाटणारी 'उर्दू' म्हणूनच आजही महत्त्वाची भूमिका ह्या राष्ट्राच्या राजकीय–आर्थिक–साहित्यिक आघाडींवर बजावत आहे ! आपला प्रभाव टिकवून आहे !!

□ □

## ईद्–उल–फित्र : ७ ऑक्टोबर, १९७५

शब्दशः 'ईद' म्हणजे पुनःपुन्हा येणारा प्रसंग ! इस्लामिक आकृति-बंधात नियमितपणे दरवर्षी साजरा केला जाणारा आनंदोत्सव !

इस्लाममधे असे दोन आनंदोत्सव सांगितले गेले आहेत. पहिला ईद-उल्-फित्र आणि दुसरा ईद-उल्-अदाह (बक्री ईद). मुस्लिम हे दोन्ही आनंदोत्सव मोठ्या उत्साहाने प्रतिवर्षी साजरे करतो.

ईद्-उल्-फित्र रमझानच्या अखेरीस आणि शव्वालच्या ( हिजरी वर्षातला दहावा महिना ) पहिल्या दिवशी साजरा केला जातो. ह्या आनंदोत्सवापूर्वी रमझानच्या संपूर्ण महिनाभर मुस्लिम रोझे ( उपास ) ठेवतो, तर बक्री ईद ( ईद-उल्-अदाह ) चा सण झिल हाजच्या ( १२ वा महिना ) दहाव्या दिवशी म्हणजेच हाजच्या यात्रेच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. इस्लामिक धर्मगुरु इब्राहिम ह्याच्यासाठी इस्माईल ह्यानं केलेल्या त्यागाचं स्मारक म्हणून हा सण साजरा केला जातो.

७ तारखेला यंदाची ईद्-उल्-फित्र देशभर साजरी केली जाईल. ह्या आधी महिनाभर प्रत्येक मुस्लिमानं सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत रोझे ( उपास ) ठेवावेत अशी अपेक्षा असते. दिवसभरात रमझानच्या संपूर्ण महिनाभर मुस्लिमानं काही खाऊ-पिऊ नये ( धान्याचा कण वा पाण्याचा थेंब देखील ! ) असा संकेत आहे ! अशा तऱ्हेनं संपूर्ण महिनाभर रोझे ठेवल्यानंतर, अल्लाहचं स्मरण म्हणून, ईद्-उल्-फित्रचा सोहळा सारे मुस्लिम साजरा करतात. त्याचप्रमाणे अल्लाहच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचाही हा समारोह आहे. रमझानच्या महिन्यातच (हिजरी वर्षाचा नववा महिना) अल्लाहनं महंमदांना 'कुराण' सांगितलं असं समजलं जातं. रमझानच्या सत्तावीस तारखेस पवित्र कुराण महंमदांना प्रवचित करणं अल्लाहनं संपवलं ! रमझानमध्ये कुराणासारखा पवित्र ठेवा दिल्याबद्दल व त्याचप्रमाणे संपूर्ण रमझानभर रोझे ठेवून आत्मिक समाधान मिळवून दिल्याबद्दल अल्लाह प्रती कृतज्ञता मुसलमान ह्या दिवशी व्यक्त करतात.

इस्लाममध्ये, उपासांना अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. इस्लामची जी मूलभूत मार्गदर्शक अशी पाच सूत्रं सांगितली गेली आहेत, त्यातलं एक 'उपास' हेही सूत्र आहे. सहनशीलता, वक्तशीरपणा, आदब, सामाजिक शिस्त आणि एकता वगैरे गुण तर ह्या उपवासांमुळे मुसलमानांत येतातच; पण उपासामुळे, आपल्या असंख्य दारिद्र्य-पीडित बांधवांचीही त्याला आठवण होते. ह्या महिन्यात व विशेषतः ईदच्या दिवशी सुस्थापित मुसलमानांनी आपल्या दारिद्र्य-पीडित बांधवांसाठी 'फित्र' ( दान ) द्यावं अशी अपेक्षा इस्लाममध्ये आहे. हे दानही त्यानं उत्पन्नाच्या विशिष्ट हिश्श्यात दिलं पाहिजे व दानातून विश्वस्त निधी उभा राहून त्याचा फायदा खऱ्याखुऱ्या गरजू दारिद्र्यपीडितांना झाला पाहिजे अशी इस्लामची शिकवण आहे.

त्याचप्रमाणे ईद्-उल्-फित्रच्या दिवशी ईद-प्रार्थनेसाठी, नमाजासाठी सगळे मुसलमान एकत्र जमतात. एकत्र नमाज पढतात, प्रार्थना करतात. आपापलं अलगत्व विसरून सारा मुस्लिम समाज एकत्र येतो आणि 'अल्लाह' चरणी लीन होऊन जातो. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, लहान-मोठा वगैरे सारे भेद तिथे गळून पडतात व एकसंध समाज तिथे उभा राहतो. ह्यातून मिळणारी शिकवणही अत्यंत महत्त्वाची आहे.

अशा तऱ्हेनं, मुसलमानाची आत्मिक, आध्यात्मिक, सामाजिक अशी सर्वांगीण उत्क्रांती साधणारी ईद आणि त्या ईदचं हे आगळं वैशिष्ट्य ! ते समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वांना म्हणूनच ह्या खुषीच्या घडीला 'ईद मुबारक !' ¤

# सोलकढी

## □ वि. स. खांडेकर एक की दोन ?

काही काही वस्तू आणि व्यक्ती आपल्याला जोडीनेच ठाऊक असतात. उदाहरणार्थ: टिळक–आगरकर; शिंदे–होळकर; जाड्या–रड्या; चंद्र–सूर्य; कांदे–बटाटे; इतिहास–भूगोल; सुई–दोरा इत्यादी–वगैरे. फडके–खांडेकर ही अशीच एक जोडी. त्यांची नावे एकदमच ऐकली; अनेक वेळा एकदमच घेतली; एकदमच बाजूला सारली; एकदमच



स्मरली–आणि विस्मरलीसुद्धा. त्यामुळे आज एकट्या खांडेकरांबद्दल लिहायचे म्हणजे चांगलीच हातचलाखी करावी लागणार.

शाळेतल्या पाठ्यपुस्तकात खांडेकरांचे 'ते' एक छायाचित्र कायम पाहायला मिळायचे. विवेकानंद जसे नेहमी छातीवर हात आडवे दुमडून असतात तसे त्या छायाचित्रातले वि. स. खांडेकर आपला उजवा पंजा थोडा हनुवटीखाली आणि थोडा गालावर पसरून असायचे. छान दिसायचे. त्यामुळे ज्याला लेखक व्हायचे आहे त्याने हाताचा न्यास खांडेकरांसारखा ठेवला पाहिजे; हात तसा ठेवला म्हणजे लिहायला पटापटा सुचत असले पाहिजे, असे मला वाटायचे. अजून वाटते. खांडेकरांच्या स्टाइलने मी हात ठेवून बघतो. काही उपयोग होत नाही. एकूण खांडेकरांच्या स्टाइलने खुद्द खांडेकरांनी हात ठेवला तरच उपयोग होत असावा, असे दिसते. असो. खांडेकरांचे हे छायाचित्र मनावर इतके ठसले होते की पुढे खांडेकरांना प्रत्यक्ष पाहिले तेव्हा धक्काच बसला. प्रत्यक्षातले खांडेकर किती वेगळे होते ! मला तरी ते भिंगुळवाणे दिसले. भाजी कितीही खारट झाली तरी जरासुद्धा तक्रार न करणाऱ्या निमूटनुस्त्या माणसांचा जो वर्ग असतो त्यातले वाटले मला खांडेकर.

तरी खांडेकरांचे हवे तेवढे झिंदाबाद झाले. खांडेकरांनी मुबलक लिहिले. रा. ज. देशमुखांसारख्या धंदादिल प्रकाशकाने ते प्रकाशित केले. खांडेकरांच्या कथा–कादंबऱ्यांचे अनेक भारतीय भाषांत अनुवाद झाले आहेत. त्यांना अनेक सन्मान–पारितोषिके मिळाली आहेत. त्या सर्वांच्यावर ज्ञानपीठ–पारितोषिकाने कळस चढवला आहे. आम्ही भाऊसाहेब खांडेकरांचे हार्दिक अभिनंदन करतो. आमच्याआधी ना. सी. फडक्यांसुद्धा समस्त साहित्यिक–मंडळींनी आणि साक्षात महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांनी खांडेकरांचे अभिनंदन केले आहे, ते वाचकांनी ठाऊक करून घेतले असेलच.

या सकलसार्वत्रिक अभिनंदनाच्या निमित्ताने खांडेकरांचे जे मूल्यमापन साहित्यिक–मंडळींनी केले ते मला तरी अश्रुतपूर्व वाटले. खांडेकर एवढे ग्रेट असतील याची मला कल्पना नव्हती. आत्तापर्यंत माझी अशी समजूत होती की खांडेकरांचे सगळेच साहित्य भाबडेभुबडे आहे; जीवनाकडे पाहायची त्यांची दृष्टी फार सोपी आहे; फडक्यांचे कलावादी म्हटले जाणारे साहित्य जितके मचूळ आहे तितकेच खांडेकरांचे जीवनवादी म्हटले जाणारे साहित्य उथळ आहे; खांडेकरांची कृत्रिम, अलंकारभोंगळ एककल्ली शैली, विराट आणि भेदक आशय पेलायला सर्वथा असमर्थ आहे; काही साक्षेपी वाचकांनी आणि समीक्षकांनी मला असेही वजबजावले होते की खांडेकर म्हणजे कुणी बा. सी. मर्ढेकर अथवा गंगाधर गाडगीळ अथवा श्री. ना. पेंडसे अथवा दुर्गा भागवत अथवा जी. ए. कुलकर्णी नव्हे !

माझा अगदी गोंधळ उडाला आहे. ज्ञानपीठ–पारितोषिक खांडेकरांना मिळण्यापूर्वी त्यांच्याबद्दल जे बोलले जायचे ते खरे, की आता पारितोषिक मिळाल्यानंतर बोलले जाते आहे ते खरे, असा बिकट प्रश्न पडून मी बावचळून गेलो आहे. ( त्या मानाने खांडेकरांचे छायाचित्र आणि प्रत्यक्षातले खांडेकर यांच्यात तसे पुष्कळच साम्य होते, असे म्हणावेसे वाटते. )

अर्थात हे सगळे मी वि. स. खांडेकर एकच आहेत असे पक्के गृहीत धरून बोलतो आहे. वि. स. खांडेकर दोन ( किंवा अधिक ) असले तर मला असे बोलता येणार नाही. मग मला वेगळे बोलावे लागेल : मी वेगळे बोलेन. □

## □ ख्रिस्तिन कीलरचा रंगराव

कोणत्याही क्षेत्रातल्या मौलिक कामगिरीने राष्ट्रीय जीवन समृद्ध करणाऱ्या व्यक्तीचा खुद्द आपले सरकारच गौरव करते. सरकारी मूल्यमापनानुसार, पद्मश्री-पद्मभूषण-पद्मविभूषण-भारतरत्न यांच्यापैकी एखादी पदवी देऊन हा गौरव करायचा प्रघात सरकारने पाडला आहे. ( महाराष्ट्राच्या डोक्यात अशी एक खानदानी खुबी आहे की ज्यांना या पदव्या मिळाल्या त्यांच्यापेक्षा ज्यांना त्या मिळाल्या नाहीत त्यांची नावे महाराष्ट्र लक्षात ठेवतो. असो.) सरकारने ही एक गोष्ट फार चांगली केली आहे, असे मला निखालसपणे सांगावेसे वाटते. सरकारने एखादी

गोष्ट वाईट केली तर तसे म्हणायचे धैर्य मला नसेल कदाचित; पण सरकारने एखादी गोष्ट चांगली केली तर, कोणाचाही कसलाही मुलाहिजा न ठेवता, माझ्या चिमुकल्या जिवावर उदार होऊन, तसे म्हणायचे धैर्य मजकडे आहे.

गुणवंतांचा असा गौरव करायची ही कल्पना आपण ब्रिटिशांपासून घेतली, असे जाणकार म्हणतात. मला असे वाटते की प्रत्येक देशाला अशी कल्पना सहज स्फुरत असेल : आपल्यालाही तशीच स्फुरली; पण ते असो. अखेर जाणकारांचे मत ते जाणकारांचे मत : त्याला मोठी किंमत द्यायला हवी. ब्रिटनमध्ये, राजा/ राणीच्या वाढदिवशी पदव्यांची अशी खैरात केली जाते.

या वर्षी राणीने ज्यांचा सन्मान केला त्यात जॅक प्रोफ्युमोसुद्धा आहेत. 'प्रोफ्युमो' हे नाव ओळखीचे नाही वाटत ? कोठे तरी वाचलेले–ऐकलेले नाही आठवत ? अहो, जॅक प्रोफ्युमो म्हणजे ख्रिस्तिन कीलरचा रंगराव. आता, ख्रिस्तिन कीलर कोण, असे मात्र विचारू नका : जनरल नॉलेजच्या परीक्षेत नापास व्हाल. पस्तिशी गाठलेल्या हिरवट वाचकाला ख्रिस्तिन कीलर विसरायची मुभा नाही. ख्रिस्तिन कीलर ही ब्रिटनमधली एक गुलवक्षी गणिका. कुणा खचाण्यापुचाण्यांची नाही, तर खासेराव-खुशालरावांची मर्जी राखणारी मदनमंजिरी. जॅक प्रोफ्युमो तेव्हाच्या टोरी मंत्रिमंडळात युद्धमंत्री होते. पंतप्रधान होते हॅरॉल्ड मॅक्‌मिलन. प्रोफ्युमोसाहेब अधूनमधून कीलरच्या कलाधामात जायचे. मंत्रिपदाचे ओझे उतरवून रंग खेळायचे. १९६३ साली हे प्रकरण वर्तमानपत्रात फुटले. तेव्हा पब्लिकलोकांनी जाम ठंठगाणा केला. उच्चपदस्थ इसमाने आपली तहान अशी पाणपोईवर जाऊन तृप्त करावी हे त्यांना बरे वाटले नाही. शिवाय तृप्तीच्या मिटक्यांबरोबर, आपल्याला ठाऊक असलेल्या माहितीवर आधारलेल्या गप्पासुद्धा स्वारीने मारल्या असाव्यात, असा अंदाज त्यांनी केला. तसा काही पुरावासुद्धा सापडला म्हणतात. परिणामी मॅक्‌मिलन-मंत्रिमंडळ कोसळले. जॅक प्रोफ्युमो बागकामात मन रमवू लागले. ख्रिस्तिन कीलरला उसंत मिळेनाशी झाली.

ही झाली १९६३ सालची गोष्ट. त्याला आता तब्बल बारा वर्षे उलटली की. जॅक प्रोफ्युमोला मी विसरून गेलो होतो; आणखी साठसत्तर वर्षांनी ख्रिस्तिन कीलरलासुद्धा विसरून गेलोच असतो. इतक्यात या वर्षीच्या सन्मानितांमध्ये जॅक प्रोफ्युमोचे नाव दिसले. कुतूहल चाळवले गेले. म्हणून चौकशी केली. कळले ते असे की लंडनच्या ईस्ट एण्ड विभागातल्या गरिबांसाठी अनेक वर्षे केलेल्या निरलस आणि निरपेक्ष कल्याण-कार्यासाठी प्रोफ्युमोसाहेबाचा हा गौरव करण्यात आला आहे. व्हिव्हा ब्रिटानिका.

जॅक प्रोफ्युमोच्या कहाणीचे तात्पर्य सोपे आहे : ते तुम्ही शोधा.

ख्रिस्तिन कीलरच्या कहाणीचे तात्पर्य सोपे नाही : ते मी शोधतो.

—अनंतराव

---


# पॅपिलॉन योजना

**अंदाजे मूल्य**

**पॅपिलॉन**
रवींद्र गुर्जर / रुपये पंचवीस

**हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा**
अशोक परळीकर / रुपये पंधरा

**देवाघरचा पाऊस**
रवींद्र पिंगे / रुपये पंधरा

**संचित (सप्तक ?)**
सुमती देवस्थळे / रुपये वीस

**सिनेकलावंतांची व्यक्तिचित्रे (?)**

*योजनेचे स्वरूप*

या योजनेत दरमहा एक पुस्तक याप्रमाणे एकूण पाच पुस्तके प्रकाशित होतील. आज नोंदणीशुल्क दहा रुपये भरून पॅपिलॉन पुस्तकयोजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मात्र यातील प्रत्येक पुस्तक दरमहा फक्त पाच रुपयात मिळू शकेल.

*इतर माहिती*

पूर्वसूचना मिळाल्यावर ग्राहकाने विशिष्ट मुदतीत पाच रुपये भरून आपले पुस्तक कार्यालयातून घेऊन जावे किंवा ५ रुपये + टपाल–पाठवणीखर्च इतक्या रकमेची त्याला व्ही. पी. केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यावी.

पैसे शक्यतो मनीऑर्डरने पाठवावेत. चेक असल्यास वटणावळ २ रुपये अधिक पाठवावी. चेक, ड्राफ्ट, म. ऑर्डर राजहंस प्रकाशन या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

**सुमारे ७५ ते १०० रुपयांची ५ पुस्तके फक्त ३५ रुपयांत.**

# फ्रॉम रशिया विथ लव्ह

कुणी तरी तिच्यामागं उभं होतं. तिनं वळून पाहिलं. तिच्या पाठीशी एक बाई उभी होती. थंडीनं ती कुडकुडत होती. तिचे ओठ निळसर होत आले होते. तिथल्या यातना तिच्याच्यानं सहन होत नव्हत्या. तिथं साऱ्यांचं अस्तित्व गोठल्यासारखं होतं. साऱ्या संवेदनाच बधिर व्हाव्यात इतकं क्रूर वातावरण. तिच्यासारख्याच आणखी किती तरी बंदिस्त बाया कारागृहात टाकलेल्या. भविष्याविषयी सचिंत. ती दबल्या आवाजात म्हणाली–

– तुला हे सारं वर्णन करता येईल ?

'हे सारं' म्हणजे...भीती. यातना, क्लेश, भविष्याची अनिश्चितता.

निर्धारानं ती म्हणाली–हो मी लिहीन.

अन् त्या बाईच्या ओठावर तिच्या म्हणण्यानं स्मित झळकलं.

१९३० सुमाराची ही गोष्ट. स्टॅलिन सर्वेसर्वा होता. त्याचं गुप्त पोलिसखातं नुसत्या संशयानंसुद्धा कुणालाही तुरुंगात डांबायचं. 'हो! मी लिहीन' म्हणणारी ॲना अख्मातोव्हा सतरा महिने कारागृहात होती अन् ते सारं भोगलेलं दुःख, यातना तिनं शब्दांत बांधल्या.

We used to meet there, more lifeless than the dead. तिथल्या दुःखाला ती म्हणते–ते दुःख इतकं भयंकर होतं की त्यापुढे गिरिवर शरण होते, महानद्या अवरुद्ध होत्या. तिथले अत्याचार इतके क्रूर की त्यांच्यातल्याच एखाद्या स्त्रीला बाजूला काढलं जायचं. तिला उघडं पाडून तिचा अमानुष छळ केला जायचा. त्यानंतर ती उठायची. कण्हायची अन् हळूहळू एकटीच डोळ्यांत अश्रू घेऊन चालत राहायची. कुठे असेल ती आता ? तिला सूर्यप्रकाश पाहता आला की नाही ? मोकळ्या हवेत श्वास घेता आला की नाही ?

तिच्या कवितांत असहायता, अगतिकता भविष्याविषयी उदासीनता शब्दाशब्दांत भिनलेली आहे.

आधी ती प्रेमगीतं लिहायची. भावनात चिंब तिचे शब्द असायचे; पण काळ बदलला. तिच्याच एका कवितेत ती म्हणते–कठोर काळानं मला नदीसारखं वळवलं. मी अजाणताच बदलले अन् नदीसारखी दुसरी वळणं घेत, दुसऱ्या भागातून वाहात राहिले. आता मला माझे काठच माहीत नाहीत. तिनं भोगलेल्या भयंकर, क्रूर दिवसांचा चेहराच तिच्या शब्दांतून स्पष्ट होतो. तिच्या कवितांच्या ओळींमधे सुटलेल्या मोकळ्या जागांत (In between the lines) कुणाचे हुंदके, कुणाचं कण्हणं, कुणाचे उसासे दडलेले असतात. कुणाचे दबक्या आवाजातले बोलणे दडलेले असते.

शांत डॉन अधिकच शांत होऊन वाहते
पिंगट चंद्र घरात डोकावतो
आत जाऊन बघतो वाकड्या टोपीसहीत
पिंगट चंद्राला सावली दिसते
ही बाई आजारी आहे
ही बाई एकटी आहे
नवरा थडग्यात, मुलगा कारागृही
– माझ्यासाठी फक्त प्रार्थना करा.

कारागृहातील यातना इतक्या भयंकर की एका कवितेत ती म्हणते–

नाही. नाही.
ही मी नाही
त्या यातना झेलणारं
कुणी दुसरंच आहे
माझ्याच्यानं हे सोसवलं नसतं–
एक विशाल तारा
माझ्या डोळ्यात सरळ डोळा भिडवून
द्रुत विनाशाची भीती दाखवतोय्.

मृत्यूच्या सावलीत उजाडणारा प्रत्येक दिवस शापित असा वाटायचा. इतके मृत्यू पाहिले की मृत्यूची भीतीच नाहीशी झाली. ती म्हणते–

तू केव्हा तरी येणारच ना–
तर आताच का नाही ?
मी तुझी वाट बघत्येय–
आता फार कठीण जातं आहे
तू यावास म्हणून मी
सारे दीप मालवून टाकलेत
दारं सताड उघडी ठेवलीत
किती सहज अन् आश्चर्यपूर्ण
तुला आवडेल ते रूप घे

पुढची एक कविता–

मी पाहिलंय्
चेहरे पडतात कसे
पापण्यांच्या आत भीती डोकावते कशी
गालावर यातना कोरते कशी
ओबडधोबड दगडी आकार
कुरळे, राखाडी, काळे केस
रुपेरी होतात रात्रीत कसे
शरणागत ओठावर विरतं हसू
कोरड्या हसण्यात भीतीच थरथरते.
मी माझ्या एकटीसाठी
प्रार्थना करीत नाही




तर त्या प्रत्येकासाठी जे माझ्या सोबत
उभे होते थरकापित क्रूर थंडीत,
जुलैच्या राठ उन्हात
आंधळ्या लाल भिंतीशी...

अशी ही अॅन्ना अख्मातोव्हा. लग्न केलं एका कवीशीच. त्या दोघांनी मिळून रशियात एक काव्याची चळवळ सुरू केली. त्यांचा ग्रुप अक्मीस्ट म्हणवला जायचा. निकोलाई ग्युमिलीव्ह तिच्या नवऱ्याचं नाव. अॅन्टी बोल्शेविक चळवळीत भाग घेऊन क्रांतीला सुरुंग लावायचा प्रयत्न केला असा त्याच्यावर आरोप लावून त्याला जिवंत गोळ्या घालण्यात आल्या. तिला एक मुलगा होता. त्याचं जवळजवळ सगळं आयुष्यच एक तर कारागृहात गेलं किंवा यातनाशिबिरात.

मुलासाठी हिचं मन वेडंपिसं व्हायचं. बऱ्याचशा कविता तिच्या पुत्रवियोगाच्या आहेत.

You and I are a mountain of qrief
You and I will never meet
Only try at midnight to send me
a qreeting through a star.

तिच्या कवितांतून ज्यांना एकही शब्द बोलता आला नाही अशा कित्येक असहाय व्यक्तींचा आवाज उमटला. त्यांच्यासाठी ती मरणाची भीती बाजूला सारून उच्चरवात म्हणाली,

I will howl by the kremlin towers !

तिच्या कवितांबद्दल एका समीक्षकाचं मत होतं–' ती अनाथांची, विधवांची कवयित्री होती. वियोग, हरण अन् दुरावा ह्या भावनांवर तिची कविता पोसली गेली. '

१९४६ मध्ये मात्र परिस्थिती पालटली. राज्यसत्तेचा अंकुश कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात आंधळ्या डोळ्यांनी थैमान घालू लागला. तिच्या कविता ज्या मासिकांतून प्रसिद्ध व्हायच्या ती मासिकं बंद पाडण्यात आली. तिच्या कवितांना समष्टीचा कस लावण्यात येऊ लागला–ती कविता नुसती व्यक्तिवादी आहे. निराशा आणि एकलेपणाचं धूसर दुःख ती कवितांतून व्यक्त करते आणि ही भावना सोविएत साहित्यात परकी आहे. त्या काळात कलावंत, लेखक, बुद्धिजीवी–साऱ्यांच्याच निष्ठा सत्तेच्या दुर्बिणीतून तपासल्या जाऊ लागल्या. अॅना अख्मातोव्हाला लेखकसंघातून अर्धचंद्र देण्यात आला.

पुढच्या काही वर्षांत ती चूप झाली. झ्डानोव्ह, स्टॅलिनचा सांस्कृतिक क्षेत्रावर निर्बंध ठेवणारा कारभारी म्हणाला–She is a whore and a nun in whom fornication is mingled with prayer.

१९५० मध्ये स्थित्यंतर झालं. स्टॅलिन जाऊन कुश्चेव्हनं जागा घेतली होती. कलेवरची सत्तेची बंधनं शिथिल होत होती. तिच्या कविता परत रशियन मासिकांतून प्रसिद्ध व्हायला लागल्या.

१९६५ साली तिला ऑक्सफर्डनं ऑनररी डॉक्टरेट दिली.

रशियानंही उशिरा का होईना तिच्या कवितांचं पुनर्मूल्यांकन केलं. तिनं गेल्या पन्नास वर्षांत लिहिलेली प्रत्येक कविता पुनर्मुद्रित करण्यात आली. तिच्या त्या संग्रहाचं सार्थ नाव ' काळाची पावलं. ' (March of the Time) त्या कवितांना दोन काळजाला भिडणारी विशेषणं लावण्यात आलीत. इमानदार (Honest) आणि सुंदर (Beautiful.) तिला रशियन लेखकसंघाचं प्रेसिडेंट करण्यात आलं.

उणंपुरं ७७ वर्षांचं संमिश्र आयुष्य जगून १९६६ च्या मार्चमध्ये तिनं ह्या जगाचा निरोप घेतला. काही दिवसांपूर्वी तिनं लिहिलं होतं–Secret of Secrets is within me again.

–झिरो-झिरो-सेव्हन


**मोफत ! मोफत ! मोफत !**

## पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
पोष्ट : कतरीसराय ( गया )




# स्पेन

## हुकुमशाही अभेद्य नसते

आपण सारा विरोध मोडून काढला आहे; आपल्या सत्तेला आता धोका नाही, असे साऱ्याच हुकुमशहांना वाटत असते; पण दडपशाही व जुलूम सहनशक्तीच्या पलीकडे गेला की असंतोष तीव्र स्वरूप धारण करतो आणि त्याच्या उद्रेकात हुकुमशहाची अभेद्य मानली गेलेली राजवट नष्ट होते. दीड वर्षापूर्वी पोर्तुगालमध्ये असेच घडले आणि स्पेनमधील जनरल फ्रँकोची राजवट त्याच मार्गाने जाणार असे दिसत आहे. आपल्या राजवटीविरुद्ध गनिमी लढा संघटित करणाऱ्या पाच दहशतवाद्यांना लष्करी कोर्टामार्फत मृत्यूची शिक्षा देऊन त्यांना गोळ्या घालून ठार केले की विरोधकांना दहशत बसेल हा फ्रँको यांचा आडाखा चुकला. या घटनेची केवळ स्पेनमध्येच नव्हे तर साऱ्या युरोपभर तीव्र प्रतिक्रिया उठली, पॅरिस व लंडनमध्ये निदर्शकांनी स्पेन वकिलाती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हॉलंडमध्ये वकिलातीच्या इमारतीचा एक मजला आगीत बेचिराख झाला. तुर्कस्तानात स्पॅनिश वकिलातीपुढे बाँबस्फोट झाला. पश्चिम युरोपातील नऊ देशांनी माद्रिदमधील आपल्या वकिलांना परत बोलावले. पश्चिम जर्मनीने तर स्पेनशी राजकीय संबंध स्थगित केले. खुद्द स्पेनमध्ये भूमिगत कामगारसंघटनांनी बास्क विभागात दोन दिवसांचा सार्वत्रिक संप केला. तो ९० टक्के यशस्वी झाला.

सरकारविरुद्ध वाढत्या विरोधाला दडपून टाकण्यासाठी फ्रँको यांच्या सरकारने ऑगस्टमध्ये एक हुकूम काढला. 'सरकारी अधिकारी किंवा नोकर यांना ठार करण्यात भाग घेणारास मृत्यूची शिक्षा देण्यात येईल' असा हा हुकूम होता. त्यानुसार पोलिसांना ठार केल्याच्या आरोपावरून अकरा दहशतवाद्यांवर लष्करी कोर्टात खटले भरण्यात आले. त्यांपैकी पाच जणांना कोर्टाने मृत्यूची सजा दिली व २७ सप्टेंबरला त्यांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. लष्करी कोर्टापुढच्या या खटल्यात आरोपींना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली नाही. या आरोपींची शिक्षा कमी करावी असे आवाहन पोपने व युरोपातील काही राष्ट्रांनी जनरल फ्रँको यांना केले होते; पण फ्रँको यांनी ते मानले तर नाहीच उलट आणखी काही दहशतवाद्यांना अशीच शिक्षा देण्यात येईल असे जाहीर केले.

ठार करण्यात आलेल्या पाच दहशतवाद्यांमध्ये दोघे बास्क विभागातील आहेत. याच विभागातील आणखी बारा दहशतवाद्यांवर लष्करी कोर्टात खटले भरण्यात येणार आहेत. त्यात या गटाचा ३० वर्षांचा तरुण नेता एटा जोस इग्नॅसिओ मुगिका अरेग्वी आहे. दहशतवादविरोधी कायद्याच्या तरतुदीनुसार असे खटले त्वरित निकालात काढले जातात. आरोपींना आपली बाजू मांडण्याची संधीच नसल्याने सुनावणी लौकर संपते. शिक्षेविरुद्ध अपील करण्यासही मनाई आहे. फ्रँकोची राजवट म्हणेल तेच सत्य व तोच न्याय!

बास्क व कॅटलान प्रांतांचा फ्रँकोच्या सत्तेस प्रथमपासूनच कडवा विरोध आहे. यादवी युद्धात बास्क राष्ट्रवादी जनरल फ्रँकोच्या सेनेविरुद्ध अगदी शेवटपर्यंत लढले व नंतर परदेशात पळून जाऊन तेथून त्यांनी आपले आंदोलन चालू ठेवले. पॅरिसमध्ये त्यांनी आपले प्रतिसरकार स्थापले. कॅटलॉन लोकांचे आंदोलन सतराव्या शतकापासूनचे आहे. कधी तीव्र तर कधी सौम्य स्वरूपात त्यांनी लढा चालू ठेवला. आपल्या प्रांतास स्वायत्तता मिळावी ही त्यांची मागणी मान्यही झाली होती; पण जनरल फ्रँकोच्या हाती सत्ता येताच ही स्वायत्तता काढून घेण्यात आली. दोन्ही विभागांतील आंदोलनांविरुद्ध दडपशाहीचे धोरण अवलंबण्यात आले; पण आंदोलन शमले नाही. गनिमी लढ्याच्या स्वरूपात ते चालूच आहे.

या दोन प्रादेशिक आंदोलनांप्रमाणेच जनरल फ्रँको यांना कम्युनिस्ट-विरोधास तोंड द्यावे लागत आहे. स्पेनमध्ये कम्युनिस्ट पक्षाला बंदी असली तरी अलीकडच्या काही वर्षांत त्यांचे बळ वाढत आहे. कामगारसंघटना, वृत्तपत्रे एवढेच नव्हे तर काही कॅथॉलिक संघटनात त्यांनी पाय रोवले आहेत. बेकायदा पक्ष असला तरी भूमिगत कार्य करून त्यांनी आपली संघटना सुव्यवस्थित ठेवली आहे. राजकीय पक्षांमध्ये तो सर्वांत संघटित पक्ष आहे. जनरल फ्रँको सध्या ८२ वर्षांचे आहेत. त्यांच्याविरुद्ध असंतोष वाढत आहेच; पण प्रकृतीच्या दृष्टीनेसुद्धा ते यापुढे किती काळ देशाची निर्णायक सूत्रे आपल्या हाती ठेवू शकतील याची शंका आहे. त्यांच्या निधनानंतरच्या अस्थिर परिस्थितीत आपल्याला सत्ता हाती घेण्यास अनुकूल संधी लाभेल असे कम्युनिस्टांना वाटते.

आपल्या सत्तेस आव्हान देणाऱ्या या तिन्ही विरोधी शक्तींविरुद्ध लढण्यासाठी जनरल फ्रँको यांच्या आशीर्वादाने एक उजव्या गटाची संघटना उभारण्यात आली आहे. तिचे नाव 'पेट्रिऑटिक अँटी-फॅसिस्ट रेव्होल्यूशनरी फ्रंट' तिच्या नावात 'अँटी फॅसिस्ट' शब्द असला तरी प्रत्यक्षात फॅसिस्ट पद्धतीचीच ती संघटना आहे.

जनरल फ्रँकोच्या धोरणांना पश्चिम युरोपातील राष्ट्रांचा पूर्वीपासून विरोध आहे. त्याच्या राजवटीला त्यांनी मान्यता दिली असली तरी फ्रँको यांना त्यांनी आपला मित्र कधीच मानलेले नाही. पश्चिम युरोपची सामुदायिक बाजारपेठ आणि उत्तर अटलांटिक करारसंघटनेत ( नाटो ) स्पेनला प्रवेश देण्याचे त्यांनी नाकारले आहे. उलट पोर्तुगाल नाटोत फार काळ राहण्याचा संभव नसल्याने स्पेनला नाटोत सामील करून घ्यावे असा अमेरिकेचा प्रयत्न आहे.

स्पेनमधील घटनांबद्दल अमेरिकेने निषेधाचा अगर नापसंतीचा एकही शब्द काढला नाही. 'हा त्या देशाचा अंतर्गत प्रश्न आहे.' अशी प्रतिक्रिया परराष्ट्रखात्याने व्यक्त केली. स्वतःला लोकशाहीवादी राष्ट्रांचे अग्रणी म्हणविणारे हे राष्ट्र; पण लोकशाहीपेक्षा जागतिक राजकारणातील आपल्या हितसंबंधांना ते अधिक महत्त्व देते हे अनेक वेळा दिसून आले आहे. पाकचे लष्करी हुकुमशहा याह्याखानांना अमेरिकेने पाठिंबा दिला होता. आज फ्रँकोबद्दलच्या त्यांच्या प्रेमामागेही राजकीय व लष्करी हितसंबंध आहेत. स्पेनमध्ये अमेरिकेला लष्करी तळ देण्याच्या कराराबाबत अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री किसिंजर स्पेनच्या परराष्ट्रमंत्र्याशी लौकरच वाटाघाटी करणार आहेत. अमेरिकेच्या सुरक्षिततेचे दृष्टीने हे तळ असणे किसिंजर यांना आवश्यक वाटते. पोर्तुगालमधील अस्थिर परिस्थिती आणि नाटो करारसंघटनेच्या दक्षिण फळीचा वाढता कमकुवतपणा लक्षात घेता स्पेनमधील आपले लष्करी तळ अमेरिकेस टिकवावयाचे आहेत म्हणून फ्रँको राजवटीच्या हुकुमशाही धोरणाविरुद्ध निषेधाचा किंवा नापसंतीचा एक शब्दहि उच्चारून तिला दुखवावयाचे नाही असे अमेरिकेचे धोरण आहे.

फ्रँको राजवटीने चालविलेली दडपशाही म्हणजे हुकुमशाहीची शेवटची धडपड आहे. छत्तीस वर्षांपूर्वी तेथे लोकशाही मार्गाने निवडणुकात विजय मिळवून अधिकारावर आलेल्या रिपब्लिकन सरकारने जमीनसुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला तेव्हा जमीनदारवर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी जनरल फ्रँको यांनी या सरकार विरुद्ध यादवी युद्ध सुरू केले. हिटलर व मुसोलिनी या हुकुमशहांनी त्या वेळी फ्रँको यांना लष्करी मदत केली. रिपब्लिकन सरकारच्या बाजूने लढण्यासाठी कम्युनिस्टांनी आंतरराष्ट्रीय फौज उभारली. या यादवी युद्धात अखेर फ्रँकोची सरशी झाली तरी लोकशाहीवाद्यांनी गनिमी लढा चालूच ठेवला. त्याला आता पुनः जोर चढला असून फ्रँको यांची राजवट आता फार काळ टिकणार नाही असा पाश्चात्य निरीक्षकांचा अंदाज आहे. □

# पोर्तुगाल

## समाजवाद्यांपुढील आव्हान

वा. दा. रानडे

पोर्तुगालमध्ये ॲडमिरल जोस पिन्हेरो डी अझेव्हेडो यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट विरोधकांचा प्रभाव असलेले सरकार अधिकारावर आले आहे. कम्युनिस्टांचा प्रभाव असलेल्या पूर्वीच्या गॉनसाल्व्हिस यांच्या सरकारमधून समाजवादी व पॉप्युलर डेमोक्रॅटस् बाहेर पडले तेव्हा पोर्तुगाल आता कम्युनिस्ट पद्धतीच्या हुकूमशाहीकडे झुकणार काय असे वाटू लागले होते. 'माणूस'च्या २६ जुलै १९७५ च्या अंकातील लेखात हीच भीती मी व्यक्त केली होती; पण नव्या सरकारमध्ये चौदा मंत्र्यांपैकी फक्त एक मंत्री कम्युनिस्ट असून त्यालाही सार्वजनिक बांधकाम खात्यासारखे गौण खाते देण्यात आले आहे. समाजवाद्यांना चार व डावीकडे कल असलेल्या पॉप्युलर डेमोक्रॅटस् पक्षाला दोन जागा मिळाल्या आहेत. बाकीच्या सात जागांपैकी चार लष्करी अधिकाऱ्यांना व तीन तंत्रज्ञांना मिळाल्या आहेत; पण सातही लोक बिगर कम्युनिस्ट डाव्या गटापैकी आहेत. आर्थिक धोरण ठरविण्याची सत्ता असलेली महत्त्वाची खाती समाजवाद्यांना मिळाली आहेत. घटनासमितीच्या निवडणुकीत समाजवाद्यांना सर्वांत जास्त म्हणजे ३८ टक्के व त्या खालोखाल २४ टक्के मते पॉप्युलर डेमोक्रॅटिक पक्षास मिळाली होती. कम्युनिस्टांना फक्त १५ टक्के मतदारांनी पाठिंबा दर्शविला होता. लोकमताचा हा कौल लक्षात घेता वास्तविक समाजवादी व पॉप्युलर डेमोक्रॅटस् यांना बहुसंख्य जागा मिळायला हव्या होत्या; पण पोर्तुगालमधील क्रांती लष्करी अधिकाऱ्यांनी घडवून आणली. तेव्हा मंत्रिमंडळात त्यांनाही स्थान असलेच पाहिजे. त्यांना समाजवाद्यांइतक्याच चार जागा देण्यात आल्या आहेत. राजकीय पक्ष किंवा लष्करी व बिनलष्करी अधिकारी यांच्यापैकी कोणाचेच बहुमत होऊन सरकार त्यांच्या नियंत्रणाखाली जाऊ नये अशी दक्षता घेण्यात आली आहे.

पोर्तुगाल आता लोकशाहीच्या दिशेने पावले टाकील अशी आशादायक परिस्थिती नव्या सरकारच्या स्थापनेने निर्माण झाली असल्याची पाश्चात्य निरीक्षकांची प्रतिक्रिया आहे; पण नव्या सरकारच्या स्वरूपावद्दल एवढ्यातच अंदाज बांधणे धाडसाचे होईल. राजकीय व आर्थिक दृष्ट्या या सरकारला कितपत स्थैर्य लाभते यावर त्याचे भवितव्य अवलंबून राहील. कम्युनिस्टांनी मंत्रिमंडळात एक जागा स्वीकारली असली तरी त्यांची भूमिका समाजवाद्यांशी सहकार्याची नाही. या पक्षाने आपली भूमिका स्पष्ट करताना एका पत्रकात म्हटले आहे की, उजव्या गटाच्या हाती सत्ता जाऊ नये म्हणून समाजवाद्यांचे प्रभुत्व असलेल्या सरकारमध्ये सामील होण्याचे आम्ही मान्य केले. पोर्तुगालमध्ये रशियाने (सोव्हिएट) पद्धतीचे राज्य स्थापन करणे हे आमचे उद्दिष्ट असून त्यात कोणताही बदल झालेला नाही. नव्या सरकारने क्रांतीचा वेग कमी करण्याचे धोरण अनुसरले तर त्याविरुद्ध आम्ही झगडू.

प्रत्येक देशास आपल्या विशिष्ट परिस्थितीस अनुरूप असा समाजवादाचा मार्ग अनुसरण्याची मोकळीक असली पाहिजे हे धोरण रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या काँग्रेसमध्ये मान्य करण्यात आले; पण प्रत्यक्षात आपल्या मार्गापेक्षा निराळा मार्ग अनुसरलेला रशियन नेत्यांना पटत नाही एवढेच नव्हे तर तो अनुसरला जाऊ नये असे त्यांचे प्रयत्न असतात. युगोस्लाव्हियाच्या टिटोशी याच कारणामुळे रशियांचा संघर्ष आला; पण त्यास यशस्वीपणे तोंड देऊन टिटो आपली स्वतंत्र भूमिका टिकवू शकले. चेकोस्लोव्हाकियामध्ये डयूबकेक यांनी असाच प्रयत्न केला; पण रशिया वॉर्सा करार राष्ट्रांच्या फौजांनी लष्करी हस्तक्षेप करून त्यांचे सरकार उलथून पाडले व आपल्याला अनुकूल राजवट तेथे स्थापन केली. पोर्तुगालमध्ये समाजवादी नेते लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणू पहात आहेत. हा मार्ग अनुसरताना क्रांतीचा वेग मंदावणे शक्य आहे. कारण लोकशाहीचा मार्ग हा लांब पल्ल्याचा मार्ग आहे. क्रांतीचा वेग मंदावणे आणि क्रांतीच्या मार्गापासून दूर म्हणजे पुन: भांडवलशाहीकडे जाणे या दोन निराळ्या गोष्टी आहेत; पण त्यांची गल्लत करून समाजवाद्यांच्या भूमिकेचा विपर्यास करण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट करीत आहेत. आपल्या भूमिकेपेक्षा निराळा मार्ग कोणी अनुसरला तर त्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण न करता आपल्या साचेबंदपद्धतीने हा मार्ग प्रतिगामी, सुधारणावादी असल्याची टीका कम्युनिस्ट करीत असतात. पोर्तुगालमधील समाजवाद्यांबद्दल त्यांचे हेच धोरण आहे. इटलीतील कम्युनिस्टांना पोर्तुगीज कम्युनिस्टांचा हा पवित्रा मान्य नाही. पोर्तुगालमधील क्रांती यशस्वी होण्यासाठी कम्युनिस्ट, समाजवादी आणि सर्व डाव्या गटांची संयुक्त आघाडी हवी अशी त्यांची भूमिका आहे आणि तीच योग्य आहे. पोर्तुगीज कम्युनिस्ट आपल्या साचेबंद भूमिकेने समाजवादी चळवळीची हानी करीत आहेत.

पण याबद्दल केवळ पोर्तुगीज कम्युनिस्टांना दोष देणे बरोबर होणार नाही. रशिया पुन: डाव्या एकांगी भूमिकेकडे झुकणार काय अशी शंका अलीकडच्या काही घटनांवरून पाश्चात्य निरीक्षकांना येऊ लागली आहे. पश्चिम युरोपातील काही देशांत कम्युनिस्टांनी सत्ता हाती घेण्यास अनुकूल परिस्थिती आहे तिचा फायदा घेतला पाहिजे असे रशियन कम्युनिस्ट पक्षातील जहाल गटास वाटते. आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी कम्युनिस्टांनी जरूर तर बळाचा अवलंब करावा असे मत 'प्रावदा'तील एक लेखात प्रतिपादण्यात आले. इतर पक्षांशी सहकार्याच्या धोरणाचा त्यात निषेध केलेला होता. इटालियन कम्युनिस्टांनी या भूमिकेबद्दल नापसंती दर्शविली; पण रशियन कम्युनिस्ट पक्षाचे नेते ब्रेझनेव्ह यांनी त्यास अनुकूलता दर्शविल्याची बातमी आहे. रशिया पुन: थंड्या युद्धाकडे झुकणार काय अशी शंका त्यामुळेच पाश्चात्य निरीक्षकांना येऊ लागली आहे प्रावदातील लेख प्रसिद्ध झाला त्या वेळी पोर्तुगालमध्ये कम्युनिस्टांचा प्रभाव असलेले गोनसाल्व्हिस यांचे सरकार अधिकारावर होते; पण आता तेथील परिस्थिती बदलली असली तरी नवे सरकार फारसे स्थिर न राहता काही लष्करी गटांच्या पाठिंब्याने सत्ता हाती घेण्यास तेथे अनुकूल परिस्थिती निर्माण होईल असे कम्युनिस्टांना वाटते. इटलीमध्ये कम्युनिस्टांचे बळ वाढत असल्याचे काही महिन्यांपूर्वी झालेल्या स्थानिक निवडणुकांवरून दिसून आले. अनेक शहरांचा कारभार त्यांच्या हाती आला आहे. आणखी दीड–दोन वर्षांनी होणाऱ्या पार्लमेंटच्या निवडणुकात आपण सत्ता हाती घेऊ, निदान सत्तेत भागीदार होण्याइतके यश निश्चित मिळवू असा विश्वास त्या पक्षास वाटतो. स्पेनमध्ये फ्रँको आणि युगोस्लाव्हियात टिटो हे दोन्ही नेते वृद्ध झाले असून त्यांच्या निधनानंतरच्या अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन आपणास अनुकूल राजवटी तेथे अधिकारावर आणता येतील असे रशियन नेत्यांचे आडाखे असल्याचा पाश्चात्य निरीक्षकांचा अंदाज आहे.

या अंदाजांप्रमाणे प्रत्यक्षात घडो किंवा न घडो पोर्तुगालमध्ये सध्या लोकशाही मार्गाने समाजवाद आणण्याची संधी समाजवाद्यांना मिळत आहे. लोकशाहीतील स्वातंत्र्याचा फायदा घेऊन उजवे प्रतिगामी फॅसिस्ट प्रवृत्तीचे गट तेथे पुन: प्रबळ होत नाहीत ना याकडेहि जागरूकतेने लक्ष देणे आवश्यक आहे. आर्थिक प्रश्न समाजवादी कितपत यशस्वीपणे सोडवू शकतात, परिस्थितीने त्यांना दिलेले आव्हान ते कितपत समर्थपणे पेलू शकतात यावर त्यांचे यश अवलंबून आहे. □

# ॥ हिम्मत ॥
# ॥ हिम्मत ॥

शांताराम पारपिल्लेवार

त्यांना बरेच दिवसांपासून भेटायचं राहूनच गेलं होतं. खरं म्हणजे भेटायलाच पाहिजे होतं; पण काही ना काही अडचणीमुळं त्यांची भेट झाली नाही. न भेटल्यामुळं माझं मलाच गिल्टी वाटत राहिलं.

तशी त्यांची-माझी गेल्या दोन वर्षांतली ओळख. कधी रस्त्यात गाठभेट झालीच तर हलो...हलो व्हायचं. हात वर जायचे. तेही मनमोकळं हसून आनंद जाहीर करायचे अन् चालायला लागायचे. संबंध जवळचे नसले तरी अशा ह्या स्थितीत मी जाऊन त्यांना धीरानं घ्यायला सांगणं माझं कर्तव्य होतं. अन् नेमकं तेवढंच करता आलं नव्हतं.

हे आणखी स्पष्ट केलेलं बरं. त्यासाठी ओळख झाली कशी हे सांगावंच लागेल.

मी हर्द्याला बदलून आल्यानंतर सौभाग्यवतीनं इथल्या महिलामंडळात जायला सुरुवात केली. हिंदी भाषी प्रदेशात मराठी बोलणारी माणसं लवकर जवळ येतात. एका सायंकाळी मी कामाहून घरी पोचलो. ड्रॉइंगरूममधे सौभाग्यवती आणि एक बाई बसल्या होत्या. मला पहाताच त्या उभ्या झाल्या. आमच्या सौ.नं आमचा परिचय दिला. हे माझे मिस्टर......अन् ह्या मिसेस टेंबुर्णीकर. सौ.च्या तोंडातले मिस्टर अन् मिसेस् हे शब्द मला खटकलेच; पण महिलामंडळात ओळखपाळख अशाच प्रकारे होत असावी. ते काही असो. मिसेस् टेंबुर्णीकरांचं व्यक्तिमत्त्व मोठं आकर्षक होतं. बाई गोरीपान अन् सडपातळ होती. काळेभोर विपुल केस. रेखीव चेहरा. मॅचिंग कपडे. बाई पहिल्याच भेटीत सावध वाटली. मी हसत 'बसा बसा' म्हणालो न् घरात निघून गेलो. एक-दोनदा बाजारात बाईंची भेट झाली. त्यांनी नमस्कार केला. गोड हसल्या. पुढे एकदा त्यांचे मिस्टर अन् मुलगा सोबत होता. त्यांना मी नमस्कार केला. त्यांनी मिस्टरांची ओळख करून दिली. 'कधी घरी या ना!' मिस्टरांनी आग्रहाने विनवलं. तीनेक वर्षांचा त्यांचा मुलगा मोठा गोड होता. पुढं मी अन् सौभाग्यवती त्यांच्या घरी गेलो. मिस्टर टेंबुर्णीकर इथल्याच मल्टीपर्पज हायस्कूलमधे लेक्चरर होते. ते मूळचे ग्वाल्हेरचे. नाटकात त्यांना रस होता. भेटी झाल्या की आमच्या नाटकासंबंधी बराच वेळ गोष्टी चालत. तेंडूलकरांच्या नाटकासंबंधी मात्र त्यांचे दुराग्रह होते. हळूहळू मी ते मिटवले. नवीन नाटकं त्यांनी वाचली नव्हती. एकदा त्यांच्याकडे 'शांतता' मुद्दाम नेलं. पुढच्या भेटीत विचारलं, 'कसं वाटलं?'

'बापरे! काय पॉवरफुल ड्रामा आहे नाही? खरंच नवीन नाटकं इतकी चांगली असतात मला कल्पना नव्हती. आपण बसवू या एखादं!'

'एकच अडचण आहे! बेणारेचं काम अवघड आहे.'

'त्यात काय आहे? आमची ही करेल की!'

मी त्यांच्या तोंडाकडे पाहातच राहिलो. किती सहज बोलले ते. अन् त्यांनी म्हणता बरोबर वाटलं किती फिटिंग रोल आहे मिसेस टेंबुर्णीकराकरिता; पण ते नाटक बसलंच नाही. कारण मिसेस टेंबुर्णीकरांनी 'मी बाई नाही करणार असलं काम!' म्हणून आमच्या नाटक बसवायच्या कल्पनेलाच मूठमाती देऊन टाकली.

मग तीनेक महिने टेंबुर्णीकर-दांपत्य दिसलं नाही. शाळांना सुट्टया असल्यामुळे ते ग्वाल्हेरला गेल्याचं कळलं. शाळा उन्हाळचानंतर पूर्ववत सुरू झाल्या अन् एक दिवस दोघंही आमच्याकडे आले एक अभिनव कल्पना घेऊन.

मिसेस टेंबुर्णीकर म्हणाल्या, 'आमच्या महिलामंडळात एक मेळावा करायचं ठरवलंय्. शाळेत पालकांना बोलावतात तसंच.'

'म्हणजे?' मी आश्चर्यानं विचारलं.

'अगदी अभिनव मेळावा. आम्ही बाया नेहमीच भेटतो. मराठी माणसं फार बदनाम आहेत ह्या भागात. ती म्हणे कोणात मिक्स होत नाहीत. कॉन्झर्व्हेटिव्ह असतात. मला पटत नाही.'

'का पटू नये? अग खराय् की!' मिस्टर टेंबुर्णीकर म्हणाले.

'तुम्हाला पटतं?'—नेमकं माझ्याकडे बोट दाखवीत त्या म्हणाल्या.

'माझ्यापुरतं म्हणाल तर माझं काय? माझी कॉस्मापॉलिटन् कंपनी आहे आणि रेल्वेच्या सर्व्हिसमधे आम्हाला अलिप्त राहून चालत नाही. आम्ही बारा गावचं पाणी प्यालेलो. किती तरी माणसं पाहायला मिळतात.'

'तेच! नेमकं तेच मला म्हणायचंय्. तुमच्या टेंपरॅमेंटची माणसं आम्हाला आमच्या मंडळात यायला हवी आहेत.'

बोंबला! आता महिलामंडळात आम्ही पुरुष काय करणार?

माझी चलबिचल त्यांच्या ध्यानात आली असावी. त्या पुढे म्हणाल्या, 'घाबरू नका.' त्यांनी एकदा चोरनजरेनं आमच्या सौभाग्यवतीकडे पाहून घेतलं. जणु त्यांना सुचवायचं होतं-बाई ग! नवरा तुझाच. त्याला कुणी स्मगल करणार नाही हं! त्यांच्या ओठावर खटयाळ हसू होतं. त्यांनी पुढे सुरुवात केली,

'महिलामंडळात प्रत्येत बाईनं आपल्या नवऱ्याला आणायचं. ओळख करून द्यायची. त्याच्यासंबंधी, त्याच्या आवडीनिवडी, हॉबीजसंबंधी बोलायचं.'

'नवऱ्यासंबंधी बोलायचं? माय गॉड! कोणती बाई नवऱ्यासंबंधी चांगले उद्गार काढणार आहे?'-मी

'मी काढीन् की!'—आतापर्यंत प्रेक्षकाची भूमिका घेणारी आमची सौभाग्यवती वदती झाली.

मला वाटलं—आता ही काय बोलणार? खवचट वगैरे! पण नाही. तिच्या डोळ्यांत वेगळेच भाव होते. ती म्हणाली,—'खरं म्हणजे आयुष्यात आपण इतके दंग असतो की एक दुसऱ्यासंबंधी त्रयस्थ होऊन वेगळा विचार करायला उसंतच मिळत नाही. ह्या कार्यक्रमानं ती संधी आपल्याला मिळणार आहे.'

मी चक्क टाळ्या वाजवल्या. आपल्याला. डायलॉग आवडला. म्हटलं—'ए डायलॉग वर्थ थावजंड किसेस.'

मिस्टर अन् मिसेस् टेंबुर्णीकर खळाळून हसलेत.

'हब्बीज् मीट—असं सोहळ्याचं नाव ठेवणार आहोत आम्ही. चक्क निमंत्रणपत्रिका इंग्रजीत छापायचं ठरवलं.'—मिसेस् टेंबुर्णीकर म्हणाल्या.

'कानाला वरं वाटत नाही हे नाव. हं!' एवढ्या उदात्त सोहळ्याचं एवढं हलकं नाव?' मी म्हणालो.

'त्यात काय? असंही असावं ना हलकफुलकं नाव! अन् नावात काय?—

'हो! हो! प्रयोजन हे महत्त्वाचं. नाममहात्म्य वगैरे उगाच. नाही का?' मिस्टर टेंबुर्णीकर म्हणालेत.

जाताना 'हब्बीज मीट'चा दिवस ठरला. कार्यक्रम कसा होणार हे ठरलं.

पण दुर्दैव! तो सोहळा व्हायचाच नव्हता मी चार दिवस दौऱ्यावर होतो. परत आलो तर सौभाग्यवतीनं सांगितलं,—' मिसेस् टेंबुर्णीकर' पुढे मात्र बोलेना.

'काय झालं?'

'परवा जळून ...'

'आता कशा आहेत?'

'इस्पितळात पाहायला गेले होते. चेहरा, हात, पोट सारं भाजून विद्रूप झालं होतं. इथं उपचार होण्यासारखा नव्हता. ऐकलं त्यांना भोपाळला हलवलं.'

'पण झालं कसं हे?'

कधीकधी नियतीच्या क्रूर अन् कठोर वागणुकीचं आश्चर्य वाटतं. एवढं सुंदर व्यक्तिमत्त्व जिवंत जाळलं जावं? अन् का? त्यांचा असा कोणता गुन्हा होता? सगळ्याच गोष्टींची संगती लावता येत नाही, तशीच सगळ्या प्रश्नांची उत्तरंही मिळत नाहीत.

मिस्टर टेंबुर्णीकरांना म्हणून भेटायलाच पाहिजे होतं; पण कधी मी दौऱ्यावर तर कधी कळायचं, ते ग्वाल्हेरला गेलेत. अजून आलेच नाहीत.

त्या दुर्दैवी घटनेनंतर तब्बल तीन महिन्यांनी एकदा ते बाजारात भेटले. मी त्यांचे हात हातात घेतले. त्यांचीही बोटं जळली होती. बोटांवर कोडासारखे पांढरे व्रण दिसत होते. काय बोलावं मलाच कळेना. मी फक्त विचारलं, 'केव्हा आलात?'

'एक आठवडा होत आलाय्!'

'पण हे असं एकाएकीच झालं कसं?'

खरं तर ही प्रश्नांची सरबती कित्येकांनी माझ्या आधी केली असणार अन् त्यांचं उत्तरही त्यांनी गद्गद् होऊन दिलं असणार मी प्रश्न विचारून चूक केली हे जाणवलं. पुनः जखमेवरची खपली काढल्यासारखं होणार. पुनः रक्त...ते उत्तर द्यायच्या आधीच मी म्हणालो, —'जरा धीरानं घ्या. तुम्ही स्वतः समजूतदार आहात. मुलं कुठं आजोळी ठेवलीत का?'

'नाही. सोबत आहेत माझ्या.'

आईविना मुलांची उपेक्षा झालेली किती तरी उदाहरणं मला माहिती होती. टेंबुर्णीकर तसं काही करणार नाहीत. मुलांवर खूप जीव आहे त्यांचा.

'मग काय आईला वगैरे बोलावलंत तुम्ही?'

'नाही ... न...'

'...' मी काही विचारू पाहात होतो. माझ्या डोळ्यांतले प्रश्न त्यांनी हेरले असावेत. म्हणाले...

'मी दुसरं लग्न केलंय ...'

मी स्वतःला कसं तरी सावरलं. असं काही झालं असणार ह्याची अल्पांशानं सुद्धा कल्पना नव्हती. माझं आश्चर्य शक्यतोवर झाकायचा प्रयत्न करीत थोडं खोटं स्मित उगाळीत म्हटलं,

'कधी? घरी या ना!'

'अजून पुरता मी सावरलो नाही... कुठंच जावंसं नाही ... आठवणी ...'

आवाजात त्याच्या कंप जाणवला पण ही वस्तुस्थिती की अभिनय कळेना. मी त्यांना पाठीवर थोपटल्यासारखं केलं. माझ्या थपथपण्यामागे त्यांना हिम्मत द्यावी हा उद्देश होता ... अन् चालायला लागलो.

पण माझ्याकडून खरंच हिमतीची त्यांना आवश्यकता होती का?

□ □

---


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**


---

पेरॅडो आणि कॅनेसा चिलीमधे पोचल्याची वार्ता हा हा म्हणता सर्वांना समजली. सॅन फर्नांदोच्या पोलिसठाण्यावर पेरॅडोची चिठ्ठी पोचली होती. तिथून चार-पाच पोलिस लॉस मेटनीजमधे दाखल झाले. तोपर्यंत शेकडो वार्ताहरही दोघांची मुलाखत घेण्यासाठी धावत–पळत आले. नेमकी त्याच दरम्यान तीन हेलिकॉप्टर्सही नदीजवळ उतरली. एस्. ए. आर्. च्या अधिकाऱ्यांनी दोन साहसी वीरांना वरेच प्रश्न विचारले. त्याप्रमाणे जय्यद तयारी करून राहिलेल्या चौदा जणांच्या सुटकेसाठी हेलिकॉप्टर्स न्यायची होती. पेरॅडोच्या मार्गदर्शनाखाली प्रतिकूल हवेची तमा न बाळगता सर्वजण फेअरचाइल्डच्या रोखानं निघालं. अखेर ते दिसलंच. तिकडे चौदा जणांनी सुटकेची आशाच सोडली होती. रेडिओवरून जेव्हा त्यांना हेलिकॉप्टर्सबद्दल समजलं तेव्हा प्रथम त्यांचा विश्वासच बसेना. कपडे साफसूफ करून आणि केस विंचरून ते निघण्याच्या तयारीत राहिले.....

## मूळ लेखक : पियर्स पॉल रीड
## अनुवाद : रवींद्र गुर्जर
## लेखांक : अकरा

**: १ :**

दुपारी एक वाजल्यानंतरच त्यांना, ईशान्येकडील पर्वतशिखरांवर दोन हेलिकॉप्टर्स दिसू शकली. त्यांचा आवाज अपेक्षेहून अगदी वेगळा ऐकू येत होता. बाहेरील मुलं जोरजोरात ओरडून खुणा करू लागली; त्यामुळे फेअरचाइल्डमधली मुलं देखील धावतच बाहेर आली.

पण त्यांच्या खुणा हेलिकॉप्टरमधल्या लोकांना समजत नसाव्यात असं त्यांना वाटल्यामुळे ते वैतागले. दोन्ही विमानं गोल घिरट्या घालत होती; पण त्यांना निश्चित दिशा मिळत नव्हती. तीन वेळा तोच प्रकार झाल्यावर मात्र हेलिकॉप्टर्स त्यांच्या दिशेला येऊन, बऱ्याच खालून फेऱ्या घालू लागली आणि त्यांना पेरॅडो एकदाचा



दिसला. बाकीचे लोक फोटो घेत होते. वैमानिकाला खाली उतरता येत नसावं. वारा इतका जोरात वाहत होता, की मशीन नादुरुस्त होऊन ते आदळण्याचा संभव होता. धूरही सर्व दिशांना पसरत असल्यामुळे वारा निश्चित कुणीकडे वाहतोय हेही समजेना. साधारण पंधरा मिनिटांनी, पहिलं हेलिकॉप्टर बर्फाच्या जमिनीला जवळजवळ स्पर्श करू शकलं. दोन गाठोडी बाहेर टाकण्यात आली. काही क्षणांनंतरच दोघा जणांनी जमिनीवर उड्या टाकल्या.

पहिला होता सेर्जियो आणि दुसरा वैद्यकीय परिचारक. हेलिकॉप्टरच्या पंखांपासून सुरक्षित असल्याचं पाहून सेर्जिओ बाहू पसरून मुलांच्या दिशेनं पुढे झाला. अनेक जण त्याच्या गळ्यात पडले. तो सोहळा अवर्णनीय होता.

गेसिया बर्फावर उतरायला तयार नव्हता. एक तर उतार आणि दुसरं म्हणजे हेलिकॉप्टरचं वजन बर्फाला पेललं नसतं. म्हणून तो जमिनीला समांतर फिरत होता. ते खाली आलं की मुलं त्यात चढायचा प्रयत्न करू लागली. फर्नांडिझ प्रथम अयशस्वी झाला. पेरॅडोनं हात घट्ट पकडून त्याला वर खेचलं. मॅंगिनो त्याचसाठी बर्फावर धावाधाव करीत होता. तोही अखेर हेलिकॉप्टरच्या बोर्डवर चढला.

तोपर्यंत आणखी दोन जणांनी जमीन गाठली. ल्युसेरो आणि व्हिलेगॅस. शिवाय सोबत सामानही.

दोन्ही हेलिकॉप्टर्सच्या फेऱ्या चालू असताना सेर्जियोनं मुलांच्या गराड्यातून सुटका करून घेतली. त्यानं पेझ कोण म्हणून विचारलं. कार्लिटस पुढे झाला. सेर्जियोनं त्याला वडिलांची दोन पत्रं दिली. ' एक तुझं आणि एक सगळ्या मुलांना लिहिलेलं, ' तो म्हणाला.

कार्लिटसनं दोन्ही उघडली. दुसरं पत्र वाचायला सुरुवात केली. ' बक-अप, आत्मविश्वास असाच कायम टिकवा ! नाताळची भेट म्हणून मी हेलिकॉप्टरच पाठवलं आहे. ' नंतर त्याला लिहिलेलं पत्र तो वाचू लागला. ' तुझी खात्री असेलच की आम्ही तुझी सुरक्षितता जाणून होतो. ईश्वरापेक्षाही अधिक आतुरतेनं मी तुझी वाट पाहत आहे. ममा चिलीला येतेच आहे. —पपा, तुझा वय झालेला बाप. '

कार्किटसनं दोन्ही पत्रं खिशात टाकली. नंतर तो, अल्गोर्ता आणि एड्युअर्डो दुसऱ्या हेलिकॉप्टरमधे योग्य प्रकारे चढली. मागून इन्शार्ते गेला. मॅसाच्या विमानात, अशा रीतीनं, चार जणांच्या जागा भरल्या. म्हणून त्यानं उंच उड्डाण केलं. आता खाली उरले डेलॅगडो, सॅबेला, फ्रॅंकॉइस, व्हिजिंटिन, मिथॉल, झेर्बिनो, हार्ले आणि फिटो. त्याखेरीज चार नव्यानं आलेली पाहुणेमंडळी.

' नव्या ' उतारूंना प्रवासाची धास्तीच वाटू लागली. त्यापेक्षा फेअरचाइल्ड परवडलं, असंही त्यांना वाटलं. परतीचा प्रवास होताच तसा धोक्याचा. हेलिकॉप्टर थडथडत असताना फर्नांडिझ पेरॅडोजवळ गेला. त्यानं विचारलं, ' काही गडबड तर नाही ना ?'

मुळीच नाही !' पेरॅडो ओरडला; पण फर्नांडिझच्या लक्षात आलं की तो सुद्धा तेवढाच घाबरला होता. मॅंगिनोनं भीतीमुळे नेहमीचीच प्रार्थना सुरू केली.

वैमानिकांपुढे प्रश्न असा होता की, विरळ हवेमुळे इंजिनांच्या भरवशावर विमान उंच नेणं कितपत योग्य ? त्यांचं कौशल्य त्यातच दिसणार होतं–पणाला लागणार होतं; पण अखेर त्यांना यश आलंच आणि पर्वत ओलांडून ते पलीकडच्या बाजूस जाऊ शकले. आल्या मार्गानं लॅास मेटनीजकडे जायचं होतं.

पंधरा मिनिटांत ते अल्फा कॅंपवर पोचले. सभोवार पसरलेली हिरवळ पाहून, सुटका झालेली सहा मुलं आनंदानं बेभान होऊन नाच करू लागली. पानाफुलांचा मंद वास. अचानक दृश्यात किती बदल झाला होता. एकमेकांना मिठ्या मारून ते दारुड्यासारखे गवतावर गडबडा लोळू लागले. मऊ रेशमाच्या गादीवर असलं सुख कोठून मिळणार ? काही जण भान विसरून, लहान मुलासारखं वागडत होते.

आनंदाची पहिली लाट ओसरल्यावर त्यांच्या लक्षात आलं की ते अॅंडीज पर्वतामध्ये एक्काहत्तर दिवस अडकून पडले तरीही वाचले होतेच. शिवाय हेलिकॉप्टरच्या जीवघेण्या प्रवासातूनही सुखरूप, सुरक्षित जागी पोचले. नंतर त्यांना भुकेची आठवण झाली. मग मात्र ते गरम कॉफी, चॉकलेट आणि चीजवर तुटून पडले. त्यांच्यासाठी सारी तजवीज आधीच करून ठेवली होती. वैद्यकीय तपासणीत असं निष्पन्न झालं की उपासमारीमुळे किंवा जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे त्यांच्यावर अनिष्ट परिणाम झाला असला तरीही गंभीर आजार कोणालाच नव्हता.

अशा रीतीनं आठ जण माणसांत येऊन पडले. आता राहिलेल्या लोकांसाठी हेलिकॉप्टर्स परत गेली तरी हरकत नव्हती; पण गेसिया कर्नल मॉरेलना म्हणाला, ' तिथल्या कोणालाही मृत्यूचा धोका नाही; पण हवा मात्र अत्यंत प्रतिकूल आहे. या वेळी पुन्हा तिकडे जाणं हिताचं नाही.' मॉरेल यांनी त्याला मान्यता दिली. दुसऱ्या दिवशी राहिलेल्या मुलांना घेऊन यायचं ठरलं. पहिल्या आठ जणांना त्या दुपारी सॅन फर्नांदोकडे रवाना करण्यात आलं.

## : २ :

सॅन फर्नांदोच्या मुख्य कार्यालयाला रेडिओवरून नवा निर्णय कळविण्यात आला. शिवाय वाचलेल्या सोळा जणांची संपूर्ण यादी. येणारे सर्व संदेश काळजीपूर्वक टाइप करून घ्यायची जबाबदारी कार्लस पेझ व्हिलॅरो यांनी पत्करली; पण सोळा जणांची नावं पाहण्याचं धाडस त्यांना होईना. आपल्या मुलाचं नाव त्यात नसेल तर ? एकूण चाळीस मुलं होती. म्हणजे चोवीस मृत्युमुखी पडली. त्यांच्या ताब्यात नावांचा कागद आल्यावर तो त्यांनी दुसऱ्या कागदानं झाकून ठेवला.

त्याच वेळी मॉंटेव्हिडिओहून ट्रंक-कॉल आला.

' काही बातमी मिळाली का ?' तिकडून विचारणा झाली.

' होय, ' पेझ म्हणाले. ' वाचलेल्या मुलांची यादी तयार आहे; पण आत्ता ती नावं सांगता येणार नाहीत. कारण कमांडरची तशी परवानगी नाही. ते हेलिकॉप्टरबरोबर गेलेत. '

पण तेवढ्यात सॅन फर्नांदोच्या मेयरनं त्यांना ' मुलांची नावं वाचायला हरकत नाही ' असं सांगितलं. फोन चालूच होता. धडधडत्या अंतःकरणानं त्यांनी पहिलं नाव वाचलं. ' रॉबर्टो कॅनेसा. ' मग फोनवरून ते सांगितलं. भराभर नावं बघायलाही ते धजत नव्हते. ' फर्नांदो पेरॅडो. ' ' ज्यो लुईस इन्शार्ते '...अशा क्रमाक्रमानं ते एका नावापाशी थबकले. ' कार्लिटस पेझ. ' या वेळी त्यांच्या

घशात हुंदका दाटून आला. डोळ्यांतल्या अश्रूंमुळे पुढचं दिसेना.

लगेच ती नावं युरुग्वेमधे रेडिओवरून प्रसृत करण्यात आली. संबंधित घरांमधून ती ऐकताना वातावरण किती गंभीर आणि ताणलेलं असेल याची कल्पनाच केलेली बरी. एकेका नावाबरोबर आशा-निराशेचे खेळ चालू होते. सोळा नावांनंतर यादी थांबली.

पर्वतामधे राहिलेल्या आठजणांना आणण्यासाठी तयारी चालली होती. तेवढ्यात हार्ले आणि निकोलिशचे वडील सँटियागोहून सॅन फर्नांदोत दाखल झाले. त्यांना कोण कोण जिवंत राहिलं हे अद्याप समजलं नव्हतं. कार्यालयाबाहेर जमा झालेल्या गर्दीमधून वाट काढत ते दोघं आत शिरले. पेझ तिथे होतेच.

तेवढ्यात चिली एअरफोर्सची तीन हेलिकॉप्टर्स पाहून जमाव आरडाओरडा करू लागला. थोड्याच वेळात ती धावपट्टीवर उतरली. त्यांचं इंजिन थांबण्यापूर्वी दारातून पेझना कार्लिटस दिसला. धावत जाऊन ते मुलाच्या जवळ जाणार इतक्यात एकानं त्यांना अडवलं. विमानाचे पंख अद्याप फिरत होते. मग कार्लिटसच त्यांच्या दिशेनं धावत सुटला. मागून आला पेरॅडो. पेझ व्हिलॅरोंनी एका वेळी दोन्ही मुलांना आलिंगन दिलं.

शब्दांना स्थानच नव्हतं. दहा आठवड्यांनंतर त्यांना आपला मुलगा पुन्हा दृष्टीस पडला होता. ते रडत होते. तसंच त्या कॅम्पवरचे तीनशे सैनिकही सद्‌गदित झाले, हे विशेष. मुलाला वडलांचे बळकट बाहू पुन्हा प्राप्त झाल्यावर घरी गेल्याचं समाधान मिळालं होतं. या आनंदात दुःखाची झालर म्हणजे त्यांच्यामागे निकोलिशचे वडील भयव्याकुळ होऊन अपेक्षेनं त्याच्याकडे बघत होते.

त्यानं मान खाली घातली. कोणत्या शब्दांत त्यांना मुलाच्या मृत्यूची वार्ता सांगायची ! तो वज्राघातच होता; पण त्यानं पुन्हा वर पाहिलं. तेव्हा ते डॅनियल फर्नांडिसबद्दल बोलताना दिसले. त्या दोघांच्या चेहऱ्यांवरील भाव पाहून त्याच्या लक्षात सर्व काही आलं. ¤

## : ३ :

सॅन फर्नांदोमधील सेंट जॉन हॉस्पिटलमधे वाचलेल्या सोळाजणांना ठेवण्यात येणार होतं. तशी सूचना कर्नलसाहेबांनी सकाळी सहा वाजताच फोन करून दिली होती. डॉक्टरांचा ताफा जय्यत तयार होता. मुलांची स्थिती कशी असणार याचा त्यांना काहीच अंदाज नव्हता. फक्त एवढंच माहीत होतं की ती बर्फमय अँडीजमधे अडकून पडली होती. थोडेथोडके नाहीत तर सत्तर दिवस आणि त्यांना खायला अगदी थोडं होतं किंवा अजिबात नव्हतं.

साडेनऊ वाजता पहिली आठ मुलं तिथे अँब्युलन्समधून दाखल झाली. पेरॅडोखेरीज सर्वांना चाकांच्या खुर्च्यांवरून नेण्यात आलं. त्यानं मात्र चालतच जायचं ठरवलं. बघ्या लोकांची तिथेही गर्दी होतीच. खास त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या विभागाच्या दारात पोचल्यावर त्याला एका पोलिसानं अडवलं.

'सॉरी,' तो म्हणाला, 'ही जागा बचावलेल्या मुलांसाठी राखलेली आहे. तुम्हाला आत जाता येणार नाही !'

'पण मीही त्यातलाच एक आहे !' पेरॅडो म्हणाला.

पोलिसानं चकित होऊन त्याच्याकडे पाहिलं. एक वाढलेली दाढी आणि विस्कटलेले केस सोडले तर पेरॅडो उंच आणि धडधाकट दिसत होता. नंतर तो आत गेला. स्नान उरकल्याशिवाय बिछान्यावर पडायला आणि तपासणीलाही त्यानं नकार दिला. नर्सेस आणि डॉक्टर्सनाही खूप आश्चर्य वाटलं; पण त्यांनी पेरॅडोला अडवलं मात्र नाही. रुग्णांबद्दल त्यांच्या वेगळ्याच कल्पना होत्या.

पेरॅडो दीड तास आंघोळ करत होता. त्याला शांपू देण्यात आला. नंतर हॉस्पिटलनं पुरवलेले पांढरे स्वच्छ कपडे त्यानं चढवले. हे झाल्यावर त्याची तपासणी करण्यात आली. त्याच्यात काहीच दोष किंवा आजार आढळला नाही.

अर्थात त्याचं वजन इतरांसारखंच खूप घटलं होतं—जवळजवळ छप्पन्न पौंड ! आठजणांमधे साधारण तीस ते एकशेआठ पौंड इतकं वजन कमी झालेलं होतं. इन्शार्ते सगळ्यात बारीक झाला होता; पण यावरून त्यांची प्रकृती मुळात किती दणकट असली पाहिजे ! पेरॅडो आणि इन्शार्तेचं वजन मुळात अडीचशे पौंडांच्या वर होतं. रग्बी खेळाला अशाच लोकांची गरज असते. छोट्या पेझचं वजनसुद्धा एकशेएक्कावन्न पौंड भरलं. हे पाहून डॉक्टर चकितच झाले.

काहीजणांच्या विशिष्ट तक्रारी होत्या, त्यावर इलाज करण्यात आले. फ्रॅक्चर, सूज, आग, ताप इ०. डॉक्टरांना एका गोष्टीचं कुतूहल होतं. इन्शार्तेला तपासता तपासता त्यांनी विचारलं, 'तुम्ही शेवटी शेवटी काय खात होता ?'

'माणसाचं मांस !' कोचनं उत्तर दिलं.

डॉक्टरांनी अवाक्षरही न काढता पुढचे उपचार सुरू ठेवले. चेहऱ्यावर यत्किंचितही आश्चर्य न दर्शविता.

फर्नांडेझ आणि मँगिनोनंसुद्धा सांगून टाकलं, इतके दिवस काय खाल्लं ते. पुन्हा डॉक्टर शांतच राहिले. वार्ताहरांना हॉस्पिटलमधे प्रवेश नव्हता; पण त्या नियमातही बदल केला गेला नाही. ज्यांना आत्यंतिक गरज होती त्यांना ग्लूकोजची किंवा तसलीच इंजेक्शन्स देण्यात आली. बाकीच्यांना मुद्दाम तयार केलेले पातळ किंवा पचायला हलके अन्नपदार्थ खायला दिले. याखेरीज त्यांना इतर काहीही मिळणार नव्हतं.

प्रत्येक मुलाची खोली स्वतंत्र होती; पण एकमेकांत त्यांची अदलाबदल चालूच होती. शेवटी नर्सला सांगून आणखी काही पोट भरण्याजोगे पदार्थ मागायचं एकमतानं ठरलं. त्यांची विनंती सशील नाकारण्यात आली. गरजेतून निषेधाची भाषा निर्माण होते. आठी मुलांनी एकमुखानं डॉक्टरविरुद्ध तक्रार केली : 'आम्हाला इथेही उपाशी मारायचा त्यांचा बेत आहे.' जास्त खाण्याचे तोटे समजावून देता देता, डॉक्टरांना अखेर माघार घ्यावी लागली.

सर्वांना पूर्ण जेवण देण्यात आलं.

चिंतनीय शारीरिक अवस्था एकाचीही नव्हती, हे स्पष्ट झालं होतं. म्हणून त्यांच्या 'दिमागी हालती'ची तपासणी सुरू झाली. मानसिक दृष्ट्या ते खचले होतेच. जवळ कोणी तरी असावं आणि एकसारखं बोलत बसावं असं त्यांना वाटत होतं—विशेषतः कार्लिटसला.

यात म्हटलं तर तसं विशेष नव्हतं; पण सत्तर दिवसांत जे नरमांस

खावं लागलं, त्या घृणास्पद गोष्टीचा प्रत्येकावर कितपत परिणाम झाला होता, हे वरकरणी कळायला मार्ग नव्हता. म्हणून आतमध्ये एकालाही सोडायला परवानगी नव्हती. अगदी कार्लिटस आणि कॅनेसाच्या आईला सुद्धा. त्या दोघी नुकत्याच आल्या होत्या.

अपवाद फक्त एकाच व्यक्तीचा होता. फादर अँड्रेस रोजास. गावातील चर्चचा प्रमुख. त्यानं हा 'नाताळचा चमत्कार' ऐकला (याच नावानं मुलांच्या शोधाला ओळखलं जाऊ लागलं.) आणि दुपारी हेलिकॉप्टर्सही उतरल्याचं समजलं. लगेच हॉस्पिटलमध्ये जाऊन शक्य ती सर्व मदत करावी असं त्याला वाटलं. मधल्या अधिकाऱ्यांनी थोडी अडवणूक केली; पण फादरला आत जायला परवानगी मिळाली.

त्याचं वय अवघं सव्वीस होतं. गेल्या वर्षीच तो चर्चचा प्रमुख झाला होता. त्याला खाजगी रस्त्यानं हळूच नेण्यात आलं. पहिली खोली लागली कोच इन्शार्तेची. धर्मगुरू आल्याचं कळताच कोच घडाघडा बोलू लागला. त्याचं मन त्याला खात होतं.

'कोणी कल्पनाही केली नसेल, असं आम्ही वागलो. दर रविवारी मी नेमानं चर्चमधे जात असे; पण अडकून पडल्यावर ईश्वर आमच्याजवळच आहे अशी जाणीव झाली. आता ईश्वरानं मला सामर्थ्य आणि इच्छाशक्ति द्यावी. पुन्हा पूर्वीसारखं व्हायला नको. जीवन म्हणजे प्रेम आणि प्रत्येकावर ते केलंच पाहिजे हे मी संकटात असताना शिकलो. माणसाचा आत्मा ही त्याची खास ठेव आहे. आपल्या साथीदारांना स्वतःचं शरीर देणं यासारखं......'

कोच नरमांसाविषयी बोलत होता, हे फादरनं ओळखलं. त्यानं सांगितलं की त्या परिस्थितीत नाइलाजास्तव तसं वागावं लागलं होतं, त्यामुळे पाप लागण्याचा प्रश्नच नव्हता. 'मी थोड्या वेळानं पुन्हा येईन!' तो म्हणाला.

'मग त्या वेळी मी कन्फेशन देईन!' कोच म्हणाला.

'तू आधीच ते दिलेलं आहेस,' फादर म्हणाला, 'मघाचच्या संभाषणात.'

मँगिनोकडे तीच गोष्ट घडली. फादरनं त्यालाही शांत केलं. आता प्रत्येकाला नरमांस खाण्याचा पश्चात्ताप होत होता. त्यांनी स्वतःला दोष देणं स्वाभाविक होतं.

फक्त इन्शार्तेनं विचारलेल्या एका प्रश्नाचं उत्तर त्याला देता आलं नाही. 'बाकीचे इतकेजण मेले, तर मी का आणि कसा जिवंत राहिलो? ईश्वराचा या निवडीमागे काय हेतू होता? त्यात तथ्य कोणते?' त्यावर फादर म्हणाला, 'ईश्वराची इच्छा बऱ्याच वेळा मानवी बुद्धीला आकलन होत नाही. जगात सगळीकडे त्या एका गोष्टीचं गूढच आहे, हे मान्य केलंच पाहिजे!'

फादरला हॉस्पिटलमध्ये प्रवेश देऊन डॉक्टरांनी महत्त्वपूर्ण उपचार साधला होता. रोमन कॅथॉलिक चर्चकडून त्यांच्या 'कृती'बद्दल क्षमा मिळणं आवश्यकच होतं. आत्यंतिक अडचणीचे वेळी नाइलाज म्हणून केलेल्या गोष्टींचा दोष लागत नाही, असा तरुण फादरचा विश्वास होता. त्यामुळे मुलांना थोडा तरी दिलासा मिळाला.

काही मुलांना आपण वावगं वागलो असं वाटतच नव्हतं. ती मुलं फादरशी विशेष बोललीच नाहीत. तशी त्यांची मनःस्थितीच नव्हती. ◻

## : ४ :

मुलांचे पालक उतावीळपणे त्यांच्या भेटीची वाट पाहत होते. त्यांना फार काळ थोपवणं अशक्य होतं. त्यांची मुलं मृत्युमुखात जाऊन परत आली होती.

पेरॅडोची विवाहित बहीण ग्रेशिएल थांबू शकली नाही. भावाला भेटायचंच असा निर्धार करून, पोलिसांशी ती भांडू लागली. जवळच्या खोलीतून पेरॅडो ओरडला, 'ग्रेशिएला, मी इथं आहे!' पोलिसाला ढकलून ती तिकडे धावली. भावाला पाहिल्याबरोबर तिला अश्रू आवरेनात. भाऊ पुन्हा दिसला हा आनंद आणि त्याची झालेली दशा पाहून तिचा मनावरचा ताबा सुटला.

मागून तिचा नवरा जुआन हाही आला आणि थकलेले, वाकलेले सेलेर पेरॅडो. त्यांची जीवनातली आशाच नष्ट झाली होती. त्यांचा मुलगा, पत्नी आणि मुलगी सुसान हे सगळे अपघतात सापडले होते. उलटसुलट बातम्या येतच होत्या. फक्त नँदो जिवंत होता हे सत्य त्यांना नुकतंच समजलं होतं. त्यामुळे आनंद व्यक्त करावा का दुःख हे त्यांना कळेना; पण मुलाला पाहून त्यांनी त्याला एकदम कवटाळलं. दुःखाचे विचार पुसले गेले. साश्रु नयनांनी ते आवडत्या मुलाला पाहू लागले.

शेजारच्या खोलीत कॅनेसा बिछान्यावर पडला होता. त्याच्या कानांवर आता पालकांचे आवाज पडत होते. अचानक दारात त्याचं लक्ष गेलं. लॉरी सुरॅको–त्याची भावी पत्नी–तिथे उभी होती. त्याला धक्काच बसला. ती माँटेव्हिडिओमधेच भेटणार अशी त्याची कल्पना होती म्हणून ती इथे भेटेल हे अपेक्षित नव्हतं.–ती त्याच्याकडे धावली आणि त्याला आलिंगन दिलं. तेव्हा तो हळूच बाजूला झाला. मागोमाग मेका कॅनेसा आली. 'मेरी ख्रिस्मस, रॉबर्टो,' असं म्हणतच तिनं खोलीत प्रवेश केला. तिच्या मुलाचा चेहेरा दाढीमुळे प्रौढ दिसत होता. डॉ. सुरॅकोसुद्धा अश्रू आवरू शकले नाहीत. रॉबर्टोलाही मग आवरेना; पण त्याची प्रकृती ढासळेल या भीतीनं तिघंजण बाहेर निघून जाऊ लागले. रॉबर्टोनं त्यांना जाऊ दिलं नाही. एव्हाना त्यांनी मित्रांचं मांस खाल्लं ही बातमी पसरली होती, त्यामुळे जवळ कोणी तरी सतत असावं असं त्याला तीव्रतेनं वाटत होतं. डॉक्टरांवर त्या गोष्टीचा बराच परिणाम झाला होता; परंतु दोन बायकांना रॉबर्टो दिसला यातच इतकं समाधान, इतका हर्ष झाला होता की त्यांचं दुर्दैवी वस्तुस्थितीकडे लक्षच गेलं नव्हतं. वडलांना मात्र पुढील संकटाची चाहूल लागली होती.

प्रत्येक खोलीत कमीजास्त फरकानं असेच प्रसंग घडत होते. कितीही प्रयत्न केला तरी मन काबूत ठेवणं, त्या वेळी कोणालाच शक्य नव्हतं. एका प्रचंड संकटातून सोळाजण केवळ चमत्कार घडूनच जिवंत परतले होते. जगण्यासाठी त्यांना कोणकोणत्या धोक्यांना तोंड द्यावं लागलं आणि काय खावं लागलं असेल याची कोणालाच कल्पना नव्हती. प्रथम ती वार्ता ऐकताना पालकांना जबरदस्त धक्का बसणं अपरिहार्य होतं. मुलांनाही हे अपेक्षित होतं. अँडीजमधे प्रत्येक मुलानं या गोष्टीवर खूप विचार केला होता.

अपवाद फक्त अल्गोर्ताचा होता. तो एकटाच त्याच्या खोलीत पडला होता. फादरशी बोलायलाही त्यानं नकार दिला. त्याचे वडील

आणि त्याच्या मैत्रिणीची आई त्याला भेटून गेली होती. दुसऱ्या दिवशी ती मैत्रीण परत आली. तिच्यावरचं जुनं प्रेम पुन्हा उफाळून आलं. खटकणारी गोष्ट एकच राहिली, ती म्हणजे त्यांचं मानवी-मांसभक्षण. 'दुसरा काहीच इलाज नसताना आम्ही करणार तरी काय ?' असा विचार अल्गोर्ताच्या मनात आला.

कोच इन्शार्ते त्याच्या काकांना म्हणाला, 'कार्लस, कार्लस, माझ्या अणुरेणूत ईश्वर भरलेला आहे.' बस्स् ! फक्त एवढंच.

त्यावर काकानं शेरा मारला, 'होय, तुम्ही अँडीजमधून वाचावं अशीच ख्रिस्ताची इच्छा होती आणि आता तो कायम तुझ्या हृदयात राहील !' ¤

## : ५ :

पर्वतामधे राहिलेले आठजण हेलिकॉप्टर्स दिसेनाशी होईपर्यंत तिकडे बघत बसले. नंतर झेर्बिनो ल्युसेरोंकडे वळला आणि त्यानं त्यांच्या 'घरी'—फेअरचाइल्डमधे—येण्याचं निमंत्रण दिलं. विमानं परत यायला बराच अवधी लागणार होता. आत शिरताना ल्युसेरोंना मानवी सांगाडे दिसले. त्यांनी विचारलं, 'गिधाडांनी ही प्रेतं खाल्ली का ?'

'नाही,' झेर्बिनो शांतपणे म्हणाला. 'आम्हीच खाल्ली !'

ल्युसेरो काहीच बोलले नाहीत किंवा त्यांनी आश्चर्यही व्यक्त केलं नाही; पण जेव्हा छतावर त्यांना चरबीचे तुकडे दिसले तेव्हा ते क्षणभर थबकले. मग आत शिरले. झेर्बिनोनं ते कसे राहत होते, इतके दिवस त्यांनी कसा टिकाव धरला याची संपूर्ण हकिकत सांगितली. हिमवादळात आठजण कसे गाडले गेले, अपघातानंतर काही जणांची झालेली दयनीय स्थिती, सदैव पोटात पडलेली आग इ. इ. ल्युसेरो मन:पूर्वक ऐकत होते; पण त्यांना आतली दुर्गंधी सहन होत नव्हती. झेर्बिनोला तर दुर्गंधीची जाणीवच नव्हती. दोघंही लवकरच बाहेर मोकळ्या हवेत आले.

तोपर्यंत बाकीच्या मुलांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना खाद्य-पदार्थ देण्यात आले होते. सँडविचेस, बीफ, ब्रेड आणि नंतर संत्रं आणि मोसंबीचा रस. ही अप्रतिम मेजवानीच होती. मुलांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. ती बोटांनी जमेल तितकं लोणी फस्त करीत होती.

हेलिकॉप्टर्सना उतरता यावं म्हणून बर्फात त्यातल्या त्यात सपाट भाग तयार करण्याचं चार पाहुण्यांनी ठरवलं. विमानाच्या दरवाजा-जवळची भिंत त्यांनी 'पाडून' टाकली. सामानाच्या जागेतील प्लॅस्टिकची स्लॅब त्यांनी जमिनीवर पसरली. जेणेकरून फार उतार राहिला नाही. बर्फाचे उंचवटे त्यांनी कार्डबोर्डनं खरडून टाकले.

आजूबाजूच्या प्रदेशाचे त्यांनी कित्येक फोटोही काढून घेतले. ते पाहून मुलं अस्वस्थ झाली. 'त्यांची गरज आहे का ?' असं त्यांनी विचारलंच. त्या फोटोंना प्रसिद्धी मिळणार नाही, फक्त रेकॉर्डपुरते घ्यायला हवेत असं सांगितल्यावर मुलांचं समाधान झालं. शिवाय सुटका करणाऱ्या त्या चार जणांवर रागावणंही शक्यच नव्हतं.

एकानं झेर्बिनोला सिगारेट दिली. पूर्वी ठरल्याप्रमाणे गंभीर चेहेरा ठेवून त्यानं नम्रपणे ती घेण्याचं नाकारलं. 'नो थँक्स्. माझ्याकडे आहे.' आणि त्यानं युरुग्वेमधील सिगारेट-पाकिटातून अखेरची एक काढून पेटवली.

दुपारी चार वाजता सर्वांच्या लक्षात आलं की आता काही रात्री हेलिकॉप्टर्स येत नाहीत. आठ मुलांना, आणखी एक रात्र तिथेच काढावी लागणार या कल्पनेनं अंगावर शहारे आले. बाकीच्या चार जणांनी त्यांना शांत करायचा शक्यतो प्रयत्न केला. त्यांनी स्टोव्ह पेटवून तीन प्रकारचं सूप बनवलं. चिकन, ओनियन आणि स्कँडी-नेव्हियन. त्यांचा यथेच्छ समाचार घेतल्यावर कॉफी करण्यात आली.

तोपर्यंत सूर्य दिसेनासा झाला. थंडी खाली उतरू लागली. मुलांना त्याची सवय झाली होती. नव्या चारांकडेही बचावाची जय्यत तयारी होती. ती एकच रात्र मुलांनी धीर सोडू नये म्हणून त्यांनी गाणी गायला सुरुवात केली; पण थंडीचा कडाका एकदम वाढला आणि सगळे झोपायच्या तयारीला लागले. मुलं आतच पडली; पण चार-जणांनी विमानात झोपण्याऐवजी बाहेर एक तंबू ठोकला. आत येणारा कुबट वास त्यांना असह्य झाला होता; पण मुलांना दुखवू नये म्हणून एकानं फेअरचाइल्डमधे त्यांच्याजवळ निजायचं ठरवलं. झोप कोणा-लाच लागली नाही किंवा तसा प्रयत्नही कोणी केला नाही. नाही म्हटलं तरी सुटकेची शाश्वती होतीच. एका रात्रीचाच काय तो प्रश्न होता. सत्तर दिवसांतल्या अनेक आठवणी ते काढत बसले.

मुलांना धास्ती एकाच गोष्टीची होती. इतके दिवस जे खावं लागलं त्यानंतर लोकांची प्रतिक्रिया काय होणार ? सेर्जियो त्यांना म्हणाला, 'लोक समजून घेतील अशी मात्र खात्री आहे. सगळी परिस्थिती लक्षात घेतल्यावर त्यांना क्षमा करावीच लागेल !'

मध्यरात्र उलटल्यावर सेर्जियोला एकोणपन्नासावं वर्ष लागलं. तोच विमानात राहिला होता. आठ मुलांनी 'हॅपी बर्थ डे टू यू' म्हटलं.

सकाळी—न झोपताच—उठून ते बाहेर आले. सर्वांना नाश्त्याची आठवण झाली. पदार्थांचा साठा तंबूत होता. त्यातले तिघं जागे झाल्याची चिन्हं नव्हती. दरीमध्ये— 'आम्हाला नाश्ता हवा, आम्हाला नाश्ता हवा.' अशा आरोळ्या घुमू लागल्या. काही क्षणातच ल्युसेरो आणि व्हिलेगॅस डोळे चोळत तंबूबाहेर आले.

'तुम्हाला काय काय हवंय् ?' ल्युसेरोंनी ओरडून विचारलं.

'काल कॉफी घेतली होती, आज आम्हाला चहा पाहिजे !'

'चहा ? ठीक आहे.'

दहा मिनिटांच्या आत चहा-बिस्किटांचा नाश्ता उरकला. हेलि-कॉप्टर्स खाली उतरतीलच असा भरवसा नव्हता. म्हणून त्यात कसं चढायचं हे ल्युसेरोंनी आठ मुलांना समजावून सांगितलं.

मुलं निघण्याची तयारी करू लागली. कपडे ठाकठीक करून त्यांनी केस पुन्हा एकदा विंचरले. झेर्बिनोनं एक सूटकेस बाहेर आणली. त्यात मृत मुलांचे सगळे पैसे आणि कागदपत्रं होती.

'तुला सूटकेस घेऊन विमानात चढता येणार नाही.' सेर्जियो म्हणाला.


'मला ती घेतलीच पाहिजे !' असं म्हणून त्यात काय होतं हे झेर्बिनोनं सांगितलं.

दहा वाजता त्यांना घरघर ऐकू येऊ लागली. थोड्याच वेळात तीन हेलिकॉप्टर्स डोक्यावरून घिरट्या घालताना दिसली. त्या दिवशी हवा प्रतिकूल नव्हती, तरीसुद्धा ती एकदम खाली उतरली नाहीत. त्यांच्या खिडक्यांमधून फोटो आणि फिल्म घेण्याचं काम चालूच होतं. मुलं अधीर झाली असल्यानं जोरजोरात हातवारे करू

पृष्ठ ३४ वर

# सुसाट गोळीच्या वेगाने....

शाम फरांदे



ड्रमच्या तालावर पावले टाकीत सैनिक चाललेहेत. ध्वजारोहणानंतर सैनिकांनी सलामी दिलीय्. हजारो सैनिक हिरव्या गणवेशातले. राष्ट्राध्यक्षांचं भाषण. आज पंधरा ऑगस्ट. स्वातंत्र्यदिन.

बाजीरावाच्या नावाचा उद्घोष चाललाय्. महादू आनंदलाय्. त्याला भरून आलंय. त्याच्या आठवणीनं ऊर भरून आलाय. बाजीरावचा हिरव्या गणवेशातला चेहरा पुन्हा पुन्हा त्याच्या डोळ्यांसमोर येतोय. अण्णा पुसेगावकरांनी महादूला आणलंय दिल्लीला स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने. बाजीरावला मरणोत्तर परमवीरचक्र मिळालंय. महादू ते स्वीकारण्यासाठी आलाय. बाजीरावचं नाव पुकारलं जातं. अण्णा महादूला स्टेजकडे नेतात. महादूच्या जिवाची उलघाल होते.

परमवीरचक्र महादूला बहाल केलं जातं.

बाजीरावच्या नावाचा जयघोष होतो.

महादू परमवीरचक्राकडे पहातो.

लाडक्या ' बाजी 'चा चेहरा दिसतो त्याला त्याच्यात.

महादूला भडभडून येतं.

' प्वॉर जिवानिशी गेलं पर पदरात काय पडलं– योक बिल्ला ! '

महादूच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात. डोकं गरगरू लागतं. जमीन दुभंगून जातेय की काय असं वाटतं. डोळ्यांसमोर अंधारी येते. महादू चाळीस वर्षांपूर्वीच्या आयुष्याकडे पाहू लागतो. साऱ्या गोष्टी कशा डोळ्यांसमोरून झराझर धावताहेत.

गोरा सायेब, त्याची बायको, तीन मुलं.

महादू त्याच्याकडे काम करायचा.

गोऱ्या सायबाच्या कृपेनं त्याला काही कमी नसायचं.

गोरा सायेब सारं काही पुरवायचा. पैसाअडका, कपडालत्ता, अन्नधान्य... सारं... सारं.गोऱ्या सायबाच्या राज्यात चंगळ असायची.

महादूनं खूप सुख भोगलंय त्या काळी.

सदा चांभारानं एके दिवशी बातमी आणलीन्.

गोरा सायेब जाणार आहे म्हणून... महादूला खूप वाईट वाटलंय. गोऱ्या सायबानं जाऊ नये म्हणून महादू त्याच्या पाया पडला; पण गोऱ्या सायबानं त्याचं काही ऐकलं नाही. तो हट्टाला पेटलेला. तो म्हटला त्याला वरची ' आडर ' हाये म्हून.

सदा चांबारान त्याला परोपरीनं समजावून सांगितलं.

' गोरा सायेब ग्येला तर वाईट वाटून घिवू नगस ' म्हणून–

त्यानं सांगितलं गांदीबाबांचं राज्यं येनार हाये–

गांदीबाबा गोरगरिबांचा कैवारी हाये.

आपल्या सर्व्यास्नी सुकाचे दिस यनार हायेत– वगैरे वगैरे.

' रामाचं राज्य यनार ! यनार ! '

सदा चांबार रोजच सांगायचा महादूला.

गोरा ' सायेब ' गेला.

' गांदीबाबांचं ' राज्य आलं.

गोरा साहेब होता तवर महादूची नोकरी होती. गोरा सायेब गेला अन् महादू बेकार झाला. पोटापाण्याची आबाळ झाली.

मग धरणावर कामाला जाऊ लागला.

खडी फोडू लागला.

घाम गाळू लागला.

दिवसभर काम करायचा तेव्हा कुठं दोन-चार दिडक्या हातावर पडायच्या.

बायको पण कामाला लागली.

भांडीधुणी करायची. चार पैसे कमवायची.

कसाबसा संसाराचा गाडा ओढायचे.

त्यात महादूला तीन पोरं. जिकिरीनं चाललेलं सारं.

गांधींचा वध झाला.

जाळपोळ-लूटालूट झाली. हजारोंच्या संसारांची धूळधाण झाली.

सदा चांबार म्हणाला,

' गोरगरिबांचा कैवारी गेला.

आता आमाला कोनच न्हाय् !'

महादूनं मान हलवली. त्यानं मनात विचार केला. गोरा सायेब गेला तेव्हाच त्याचा कैवारी गेला. आता गांदीबाबा गेले. होता तो आधार गेला.

सदा चांबारानं गाडगीळभटजींच्या घरच्या गव्हाच्या चार गोण्या लुटून आणल्या. रात्री महादूला सांगितलं.

' गांदीबाबा ग्येला पर जाताना आमाला यवडा तरी आसरा दिला. आज राती परत धाड हाये तवा तू पण ये ! त्यवडाच चार दिसाचा आदार. '

महादूनं शेंडेभटजीच्या घरची ज्वारीची चार पोती पळवली.

चार दिवस मजेत गेले.

चार दिवस तृप्तीचे ढेकर दिले.

परत ये रे माझ्या मागल्या.

परत घरात उपासतापास.

महादू वैतागला. त्याला वाईट वाटू लागलं.

दुसऱ्याच्या घरी लूट केली की परमेश्वर अशी शिक्षा देतो. ज्यांच्या घरचं सगळं काही लुटलं गेलं असेल त्यांची काय अवस्था असेल ? त्यांची पोरंबाळं काय खात असतील ?

महादू कळवळला.

आपणच चुकलोय पण– तो पोटाकडे पहातो. खपाटीला गेलेलं पोट. पोटासाठी सारं.

भिका मागून, कर्ज काढून चाललंय सारं. गळ्यापर्यंत बुडालाय कर्जात. पोरं मोठी होताहेत. कामधंदा नाहीय. धरणावरचं काम सुटलंय. महादू जेरीस आलाय. बायको हाडकलीय. त्याचीपण गालफडं आत बसलीयत.

डोळे आढ्याकडे लावून बसलेला असायचा.

एके दिवशी मारवाडी आलाय ओरडत.

दोन दिवसांच्या आत पैसे दिले नाहीत तर जप्ती आणणार म्हणे घरावर. अन् एके दिवशी जप्ती आलीय. महादू अन् त्याची पोरं निराधार झालीयत. रहायचं कुठं ? खायचं काय ? गोरा सायेब कुठंय ?

' का गेलास तू सायबा आमच्या गळ्याला तात लावून ?'

' गांदीबाबा कुठंयत ?'

कोण आहे गरिबांचा कैवारी ?

गावाबाहेर झोपडी बांधलीय. झोपडीत पडून असतो.

कुणी काम दिलं तरंच पोटाला मिळतं नाही तर उपाशी रहातो. पोरं फार कालवा करतात.

महादूच्या लहानपणी असं नव्हतंच. त्यानं खूप खाल्लय-पि‌ल्यं. खूप सुख भोगलंय पण पोरांच्या नशिबी हा भोग आलाय...

बायकोची तब्येत बरी नसते. बायको पण फार चांगली.

ती पण गेलीय एके दिवशी महादूला सोडून.

आता काय करायचं ? काय करायचं ?

त्यानं धरणं धरलं मरीआईपुढं–

माय ! ह्याच्यातून सोडव म्हटला.

गरिबाला कुठली वाट सापडायची ? सापडली तर काटेच फार ! जखमा दुथडचा भरून वहात असतात. खपल्यांची भाषा नसते. मरमर मरायचं, कष्ट उपसायचे, उपाशी रहायचं अन् एके दिवशी मरून जायचं. इथं प्रेतांचा हिशोबपण नसतो. मला तर म्युनिसिपालिटीची धन.

गोरा सायेब बरा होता–

गांदीबाबा पण बरे होते–

चार दिस् सुखानं रहायला मिळालं.

' लई चांगलं दिस. '

...सायबाकडनं कामावरनं यायचा घराकडे. बायको उभी असायची दारात. बायकोच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहिलं की याला गुदगुल्या व्हायच्या. रात्र कशी पसार व्हायची कुणास ठाऊक. तांबडं फुटायच्या आत बायको न्याहारीचं करून त्याला घालायची. लुसलुसणारं हिरवंगार गवत. प्रवासाला निघालेला उगवतीच्या सूर्याचा लालभडक गोळा. डोंगराच्या कुशीत गारठणारे कोवळे ऊन साथीला असायचे. तो शीळ फुंकायचा. शिळेला कोकिळांची प्रत्युत्तरं मिळायची.

' सायब फार मायाळू. मडमीण पण. कधी अंतर दिलं न्हाई ' तो आठवायचा सारं...

पोर मोठ्ठी झाली. झोपडीच्या आधारानं काळोख चाचपीत. बाजीराव शिकला सात ' यत्ते 'पर्यंत. अण्णा पुसेगावकराचे उपकार. अण्णानं पोर शिकवला. महादूला खूप आनंद झाला. वाटलं पोराना गोडधड खाऊं घालावं पण...

बाजीराव निघून गेलाय् अकस्मात.

मिलिटरीत भरती झालाय्.

महिन्याच्या महिन्याला मनीऑर्डरी करू लागलाय्.

महादू आनंदी झालाय्, सुखी झालाय्.

पोरानं पांग फेडले. चांगले दिवस दाखवले. पण...

एके दिवशी...

युद्ध सुरू झालंय्. भारत-चीन.

बाजीराव आघाडीवर होता.

बाजीरावनं एकट्यानं शंभर माणसं मारली. पराक्रमाची शर्थ केली.

शत्रूबरोबर झुंजत झुंजत मेला.

महादू वेडापिसा झाला.

माझा बाजी ऽऽ माझा बाजी ऽऽ ओरडत फिरू लागला.

बाजीरावाचे गुण आठवायचे, बाजीरावाचा पराक्रम आठवायचा. बाजीरावाचं लोभस रूप आठवायचं अन् धाय् मोकलून रडायचं हा छंदच जडला त्याला...

लोक म्हणायचे महादू वेडा झाला–
पण महादू वेडा झाला नव्हताच.
त्याच्या कानावर लोकांचं बोलणं यायचं.
लोकांना काय कळणार गरिबांचं दुःख ! गरिबांची दुःखं गरीब असतात. त्यांनी शोक करायचा नसतो, मुकाट्यानं आतल्या आत दाबायचा असतो.
श्रीमंतांच्या दुःखाचा बॅंडबाजा वाजवला जातो.
त्यांचे फोटो छापले जातात पेपरात. प्रेतयात्रा निघतात. भाषणं होतात. पुष्पवृष्टी होते.
महादूचं दुःख ! महादूवर पहाड कोसळलाय्...
गाव गोळा झालं. नानापरीनं समजावून सांगितलं
'तुझा पोरगा देशासाठी गेलाय्.'
'तुझा पोरगा आमच्यासाठी गेलाय्.'
'आमचं स्वातंत्र्य टिकविण्यासाठी गेलाय्.'
या देशातल्या प्रत्येक जीवाला सुरक्षित ठेवण्यासाठी त्यानं आपला बळी दिलाय्.'
अण्णांनी त्याला शांत केलंय्. देशासाठी आहुती देणाऱ्यांची गाथा वाचून दाखवली. बाजीरावला देवगण बहाल केलं. महादू चिडलाय्–कळवळलाय्–
'अण्णा, माझं पोरगं गेलं. माज्या तोंडचा घास गेला. दुसऱ्याच्या तोंडचं घास जाऊ नेत म्हून !'
'मारवाड्यांची, गुजरांची घरं शाबूत ऱ्हावीत म्हून !'
'म्या गरिबानं आसंच मरावं म्हून !'
'पोरगं व्हतं, काय वाटत न्हवतं. आता आदार संपला...आता नाव घियाचं रामाचं...आन् जायाचं आसंच...कोन हाये आपलं !'
महादू जोमानं बोलला. त्वेषानं बोलला. संतापानं बोलला. रागानं बोलला. हृदय ओकून बोलला.
लोकांनी तात्पुरती सहानुभूती दाखवलीय अन् पळालेयत आपापल्या घरी–महादूला जगण्यात राम वाटत नाही.
अण्णा पुसेगावकरांनी सांगितलं, बाजीराव स्वातंत्र्य टिकवण्यासाठी बळी गेला.
महादूला खूप राग आलाय.
कुणाचं स्वातंत्र्य ?
'सवतंत्र्य मिळालं गुजरा-मारवाड्यास्नी, गुंडांस्नी, दारुबाजास्नी, काळाबाजारवाल्यास्नी–आमास्नी न्हवं ! आमा गरिबास्नी दगडं फोडायच्या बगार काय मिळालं ? आज बाजारात इकायला ठेवलं तर आमाला कवडीमोलानं कुणी इकत घेनार ऱ्हाय ! आमी कोन ? शेनातले किडे !'
'अरे पण, शेणातले किडे काय शेणातच रहातात काय ?' अण्णा उद्गारलेयत.
'व्हय. आमी शेनातच ऱ्हायचो. शेनातच मरनार. तुमचं हात भरत्याल म्हून तुमी आमाला शिवनार न्हाई !'
अण्णांनी महादूची कशीबशी समजूत काढलीय. बाजीरावच्या मरणाचं महादूला अपार दुःख झालंय. जिवंतपणी मृतावस्थेत जगत आहोत असं त्याला वाटलं.
त्याला दिसतोय, तिरंगा डौलानं फडफडतोय.
हजारो सैनिक परेड करताहेत. ड्रमचा ताल. पावलं पडताहेत एकामागोमाग–
स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ
स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ
गोळ्यांचा भडिमार. घनघोर रणकंदन. गोळीगणीक सैनिक मरताहेत पटापट. सैनिकांच्या शौर्याला परिसीमा नाहीय. एकेक, दहादहा, पंधरापंधरा टिपतोय. एकही गोळी वाया जात नसते. स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ स्सुं ऽ ऽ ऽ स्सुं ऽ ऽ ऽ स्सुं ऽ ऽ ऽ गोळ्या वेगाने जात आहेत. बाजी मशीनगन चालवतोय. मुड्द्यांमागून मुडदे धडाधड कोसळू लागलेयत. शत्रुपक्षाचे लोक धावू लागलेयत. बाजी गोळ्यांचा वर्षाव करतोय. एक गोळी येते अचानक. बाजीच्या छातीचा वेध घेतेय.
बाजी कोसळलाय. बाजी कोसळलाय.
असंख्य बाजी दिसू लागलेयत. असंख्य बाजी कोसळताहेत. एकापाठोपाठ !
गोळीनं काम बजावलंय.
महादू गोळीचा वेध घेतोय.
बाजी ऽ ऽ बाजी ऽ ऽ बाजी ऽ ऽ
महादू सुसाट गोळीच्या वेगानं बाजीला भेटायला गेलेला असतो.
महादूच्या छातीवर बिल्ला आहे.
परमवीरचक्र !
आणि–
महादू चितेवर झोपला आहे.

□ □

**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

**लेखक**
**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य : सात रुपये**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पुस्तके

अनोखा जगप्रवास

# लागेबांधे

अनंत कुंभोजकर

मोठ्यांनी छोटयांसाठी लिहावं हे आपल्या परिचयाचं. किती तरी मोठे लेखक छोटयांसाठी लिहीत असतात. कथा–कादंबरी–नाटक हे साहित्यप्रकार उदंड झालेत. त्यात प्रवासवर्णन हा काहीसा दुर्मिळ साहित्यप्रकार. मराठीत काही थोरामोठयांची प्रवासवर्णनं लक्षात राहण्यासारखी आहेत. ती सारी मोठयांची–म्हणजे प्रतिशयांची.

माझ्यासमोर जे पुस्तक आहे, त्याचं वेगळेपण वरील कारणासाठी आहे. एका सोळा वर्षांच्या खेडयातील मुलाला स्काउट जांबोरीसाठी परदेशी जाण्याचा योग यावा. चांगल्या दहा देशांना आणि त्याने परत येताच त्या प्रवासाची कहाणी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावी. ते पुस्तक आहे, लागेबांधे–बाबासाहेब भांड या तरुणाचं.

१९६९ साली 'युवकमेळाव्यासाठी व स्काउट-जांबोरीसाठी भारतातून निवडलेल्या इतर पाच मुलांत भांडची निवड होते. 'जेथे अद्याप मोटारही पोहचू शकत नाही' अशा गावचा हा मुलगा विमानाचं स्वप्न रंगवू लागतो. नव्हे चक्क कैरो–रोम–लंडन–टोरन्टो–न्यूयॉर्क–टोकियो–हाँगकाँगची फेरी करून येतो.

बालमनाम गुंग करून टाकणारी सारी किमया. खिशात दमडी नाही. तिकिटावर मिळालेले तीन पौंड हीच काय ती पुंजी ! पुढं काय होणार ह्या स्थितीत विमानानं दिल्ली सोडली आणि वाचकांना खिळवून ठेवलं जातं.

लागेबांधे हे फक्त प्रवासाचं रुक्ष टिपण न होता, एका संवेदनशील मनानं उघडे डोळे ठेवून टिपलेल्या प्रामाणिक अनुभवांची नोंद बनलं आहे. हा एक धावता प्रवास आहे. प्रवासात जे दिसलं ते टिपीत जावं प्रतिक्रिया व्यक्त न करता. लेखक कैरो–रोम–अथेन्स–लंडन–न्यूयॉर्क–टोकियो–हाँगकाँगची फेरी करतो. प्रवासात जे मित्रमैत्रिणी भेटतात–गाठीभेटी होतात–स्नेहाची देवाणघेवाण होते. ते सारं कलात्मकपद्धतीनं लागेबांधेत आलं.

सगळं लिखाण जरी आत्मनिष्ठ असलं, जागजागी 'मी' येत असला तरी अहंभावाची जाणीव कुठेही न व्हावी ही लागेबांध्याची जमेची बाजू. रटाळपणा न येता छोटी छोटी वाक्यं, सरळ मांडणी, ओघवती भाषा अन् प्रामाणिक निवेदन म्हणून लागेबांधे वाचनीय बनलं आहे.

लागेबांध्याचे वारस आहेत, कैरोत अचानक भेटलेला सॅमी, रोममधील स्त्री-वार्ताहर इलेन, विमानातील निग्रो एअर होस्टेस, लंडनमधील कुम्बे–श्री. व सौ. प्रसाद, न्यूयॉर्कची भारतीय लक्ष्मी, टोरन्टोचे जोशी, हाँगकाँगचा ली.

मेळाव्याच्या निमित्तानं जगाच्या सगळ्या भागांतून वीस हजार मुलं-मुली एकत्र आलेले. भिन्न देश, भिन्न भाषा-संस्कृतीची पोरं काही दिवस एकत्र येतात. खूप काही शिकण्याचा प्रयत्न करतात स्वतःला विसरून. मेळावा संपतो. उरतात फक्त त्या गोड स्मृती. अशा अनेक प्रसंगांची गुंफण लागेबांधेचा स्थायीभाव बनला आहे. अनेक मित्र-मैत्रिणीत लक्षात राहतात ब्रेंडा-ब्यू–इलेन–शेरी–जॉन–ली काही नावं.

काही वेळेस भांड तटस्थपणे पौर्वात्य-पाश्चिमात्य फरकाबद्दल चिंतन करताना आढळतो. पुस्तकातील कोणतेही पान चाळताना लेखकाच्या स्वतःच्या अशा शैलीची वाचकाला जाणीव होते. वेगवेगळ्या परदेशीय कुटुंबांत वावरताना जो जिव्हाळा अनुभवता आला त्याचं वर्णन मार्मिकपणे आलं आहे. त्याचरोबर अती ऐश्वर्य अन् सुखाच्या तथाकथित कल्पनेनं तेथील कुटुंब संस्थेच्या नाशाचं कारण तो नकळत सांगून जातो. पाश्चिमात्य प्रगत देशांतील जीवनाचं विदारक चित्रही बघायला मिळतं. शाळेतील मुलगी. लग्न झालेली पण मुलाची माता आहे ही अमेरिकन जीवनाची झलक मधेच लेखक नकळत सांगून जातो.

परदेशांतील चक्षुर्वैसत्यम् असं चित्र लागेबांध्यात दिसतं. त्याचबरोबर यंत्राप्रमाणं धावणारी, किडयामुंगीप्रमाणं मरणारी, एल. एस. डी. च्या गोळ्या खाणारी चालू पिढी लेखकानं पाहिली. त्याचं विदारक चित्रही बघायला मिळतं.

लागेबांधेचं लिखाण कंटाळवाणं होऊ नये याची लेखकानं बरीच खबरदारी घेतलेली दिसते. प्रत्यक्ष अनुभूतीला काही ठिकाणी कल्पकतेची नकळत जोड मिळाल्यामुळं प्रवासवर्णन निखालस वाचनीय झालं आहे. त्यामुळं टोरन्टो हॉटेलमधील प्रसंग अन् टोकियोतील सूर्योदयाचा गुलाबी प्रसंग सत्य असूनही कल्पकतेकडे झुकल्यासारखे वाटतात. एका स्काउटच्या प्रवासाची कहाणी; पण सगळ्या प्रवासात स्काउट कुठं दिसला नाहीच. तीच गोष्ट मेळाव्याच्या वर्णनाबद्दल. ते खूपच त्रोटक झालंय !

तरीही लागेबांध्याच्या यशात त्याची विशेष उणीव भासत नाही. लक्षात राहते एका संवेदनशील तरुणाच्या धावत्या प्रवासाच्या कहाणीच्या लागेबांध्याची कहाणी. ◻

**लागेबांधे**
**बाबासाहेब भांड**
**धारा प्रकाशन, औरंगाबाद**
**मूल्य : १० रुपये**

# एक पुस्तक : एक प्रकाशन

## भारतीय चलच्चित्रका इतिहास

पंडित जोशी

तसे चित्रपटांचे आकर्षण प्रत्येकालाच असते. त्यांचा झगमगाट, सप्तरंगात केलेली लाखो रुपयांची उधळमाधळ, तेजाने चमचमणाऱ्या चित्रचंद्रिका आणि बरेच काही. हा अशोककुमार, ती झीनत अमन, बी. आर. इशारा, सत्यजित रे, संगीतकार नौशाद, आर. डी. बर्मन अशा किती तरी नावांच्या आकर्षणाने फिदा झालेले पब्लिक चित्रपट डोक्यावर घेताना आढळून येतील.

आपल्या भारताचा चित्रपटनिर्मितीच्या दृष्टीने पहिला क्रमांक लागतो म्हणतात. म्हणजे आले त्याचे स्टॅटिस्टिक्स ! कोणत्या वर्षी कोणते चित्रपट तयार झाले, किती प्रदर्शित झाले, किती गाजले, कितींनी मार खाल्ला, कुणी कुणी कामे केली, एक ना दोन !

भले भारताचा पहिला नंबर असो वा नसो कोण पडतंय् या लफड्यात ! आपण आपले सिनेमा पाहू या, एंजॉय करू या, बाकी गेलं सगळं उडत ! अशीच आतापर्यंत खूप लोकांची भावना; पण या जबरदस्त माध्यमाकडं वेगळ्या दृष्टीनं पहाणारे काही ( वेडे ) लोकही आहेत. पुण्यातल्या अलका टॉकीजचे आणि फिल्मकल्चरल सेंटरचे अध्यक्ष भास्करराव धारप, दिल्लीचे हमीमुद्दीन महंमद, बंगालचा चिदानंद दासगुप्ता वगैरे काही मोजकी मंडळी या पठडीतली. या अत्यंत भपकेदार विश्वाच्या इतके जवळ असूनही खूपच दूर. जवळ अशा दृष्टीनं की रिपोर्टिंग, मुलाखत, लेख वगैरे संदर्भात हे लोक चित्रपटकलाकार आणि चित्रपट यांच्या अगदी जवळ असतील; पण दूर अशा दृष्टीनं की कधी पॉप्युलॅरिटी आपल्या मागे असावी म्हणून हव्यास नाही, कधी पडद्यावर येण्याची धडपड अथवा अट्टाहास नाही. आपले काम ( लांबूनच ) बरे आणि आपण बरे. काम झाले की दोन हात दूरच !

अशाच एका ( वेड्या ) पैकी एक प्राणी नुकताच पुण्यामध्ये पहायला मिळाला. फिरोझ रंगूनवाला त्याचं नाव. त्याने कुठून चित्रपटाचं वेड घेतलं होतं (कोण जाणे; पण लहानपणापासूनच सिनेमा पाहणे, लक्षात ठेवणे आणि वेळप्रसंगी त्यांच्या नोटस् काढून ठेवणे हाच त्याचा उद्योग. घरच्या लोकांची पर्वा करायची नाही. कुठून तरी चार-दोन पैसे हातात पडले कीं वळलेच स्वारीचे पाय थिएटरकडे. मग पुढे बी. ए. आलं, बी. कॉम आलं आणि चित्रपटांचं आकर्षण तर दिवसेंदिवस वाढतच चाललं होतं. बी. कॉम झाल्यावर पोटापाण्याचा धंदा पत्करायचा ! फारच थोडे लोक नशीबवान असतात की त्यांना आपल्या आवडीप्रमाणं आपला पोटापाण्याचा धंदा निवडण्याची संधी मिळते. रंगूनवालाचं तसंच झालं. सहज म्हणून त्यानं जे. बी. एच. वाडियाकडं शब्द टाकला आणि त्यांच्या वाडिया मुव्हिटोनमधे प्रवेश मिळविला. तिथं त्याने दिग्दर्शन, संकलन, पटकथा वगैरे दालनात उमेदवारी चालू केली; पण चित्रपटरसिक म्हणून चोखंदळ प्रेक्षकाची भूमिका स्वीकारलेलं त्याचं मन चित्रनिर्मितीच्या क्लिष्ट आणि वेळखाऊ दुनियेत रमेना. तेव्हा सहज चाळा म्हणून आपल्या पूर्वी काढलेल्या नोट्स वापरून एकाददुसरं आर्टिकल लिहायला सुरुवात केली. ते छापून आलं मग पुढचं ! असं करत करत त्यानं लवकरच ' स्क्रीन ' या साप्ताहिकात प्रवेश मिळवला आणि लवकरच स्क्रीनचं तो अविभाज्य स्थान होऊन बसला. लवकरच असाही एक काळ आला की जागोजाग आर्टिकल्स लिहिता लिहिता असे एकही नियतकालिक इंग्रजीमधे राहिलं नाही की जिथं रंगूनवालाची वर्णी लागली नाही.

नुसतेच लेख लिहिणं अथवा मुलाखती घेणं हे पुढं पुढं रंगूनवालाला रुचेना ! त्यानं पाहिलं की पत्रकार या नात्यानं आपली जबाबदारी खूप मोठी आहे. साहित्याला जर सखोलता यायला हवी असेल तर स्वतः त्या विषयामधे आपण पक्के असायला हवे.

झालं ! एवढा विचार मनात यायचा अवकाश की स्क्रीनमधली आपली नोकरी सांभाळून त्यानं संशोधनाला आरंभ केला. जुनी बुकलेट्स, फोटो, कागद, कपटे यांचा संग्रह करायला सुरुवात केली. एवढेच नव्हे तर टाइम्स ऑफ इंडियाच्या कचेरीत जा, तिथे जुन्या–पुराण्या अंकांची उलथापालथ कर, कलकत्त्याची वारी करून ये, तिथे अमृतबझार पत्रिकेतले अमृत उपस, मद्रासी अय्यांच्याकडं जाऊन तिथल्या ' दि मेल ' चे अंक नजरेखालून घाल वर गुजरातमधे जा आणि तिथं ' चित्रपट ' चाळ असे उपद्व्याप आपली स्क्रीनमधली नोकरी संभाळून चालू ठेवले. त्या साऱ्यांच्या काळजीपूर्वक नोट्स घेऊन, काही दुर्मिळ जाहिराती, फोटो यांचे छायांकन करून त्यावर स्वतः संशोधन आणि मनन करून स्वतःची पक्की मतं बनवली आणि मग त्याच्या लेखांना एक विलक्षण तेज आलं. एव्हाना पत्रकार म्हणून गणल्या जाणाऱ्या रंगूनवाल्याच्या मागं चित्रपट-इतिहासकार (Film historian) हे विशेषण केव्हा येऊन जडलं हे त्याचं त्यालाच कळेना !

दादासाहेब फाळके हे अगदी सुरुवातीपासून आपल्याकडं भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणून ओळखले जायचे ! ' राजा हरिश्चंद्र ' हा भारतातला पहिला पूर्ण लांबीचा चित्रपट समजला जायचा. तो दादासाहेब फाळक्यांनी काढला म्हणून फाळके ' Father of Indian Films ' म्हणून ओळखले जायचे. आपल्या संशोधनामुळं रंगूनवालानं या सगळ्या समजुतींना धक्का दिला आणि दादासाहेब फाळके हे भारतातले पहिले फिल्ममेकर नसून दुसरेच एक ' दादा 'ना तो मान द्यावा लागेल हे सिद्ध करून दिलं. फाळक्यांचा ' राजा हरिश्चंद्र ' ३ मे, १९१३ रोजी आला तर त्याच्या आधी एक जवळजवळ वर्षभर म्हणजे १८ मे, १९१२ रोजी दादासाहेब तोरणे यांचा ' पुंडलिक ' प्रकाशित झाला होता. तेव्हा भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके नसून दादासाहेब तोरणे आहेत, हा त्याचा पहिला शोध.

### अनेक पुस्तकांचा लेखक

अशा प्रकारे त्याला संशोधनामध्ये खूप नवलाईच्या गोष्टी नजरेस आल्या. त्यांची टिपणं, त्यांची माहिती वगैरे सुसूत्रपणं एकत्रित करण्याचा त्यानं सपाटाच चालू केला. त्याचबरोबर भारतीय चित्रपटावर सुसूत्रपणे वेगवेगळ्या भाषांमधे तयार झालेल्या चित्रपटांची यादीही उपलब्ध नाही हे त्याच्या लक्षात आलं आणि तो अशा प्रकारची यादी तयार करण्याच्या मागं लागला. आपल्याकडे चित्रपटांचो निर्मितिकेंद्रं एकमेकांपासून खूपच लांब; शिवाय भाषेचाही मोठा प्रॉब्लेम. झाल्या रंगूनवालाच्या पुन्हा मद्रास, कलकत्ता, बंगलोर, दिल्ली वाऱ्या सुरू. चार-दोन वर्षांच्या सतत प्रयत्नानंतर त्याची यादी पुस्तकरूपानं प्रसिद्ध झाली 'Indian Film Index' या पुस्तकात फक्त त्याने १८९६ ते १९६९ एवढ्या प्रदीर्घ कालावधीत भारतात तयार झालेल्या चित्रपटांची नावे, त्यांची भाषा, प्रकाशन-साल वगैरे तपशील दिले. त्याचा रिस्पॉन्स कसा काय येतो या भीतीने त्याची किंमत त्याने फक्त चार रुपये ठेवली. गमतीची गोष्ट अशी की त्याच्या ह्या पुस्तकाला भारताच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यातून प्रतिसाद मिळाला. या पुस्तकाचा उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ म्हणून पुस्तकाची प्रस्तावना लिहिताना दिलीपकुमारने उल्लेख करून रंगूनवालाची खूप स्तुती केली. याचाच परिणाम म्हणून की काय त्याने पुढचा ग्रंथ लिहिला, 'Indian Filmography.' त्यामधे १८९६ ते १९३४ पर्यंत झालेल्या सर्व मूकपटांबद्दल आणि १९३१ ते १९६९ पर्यंत तयार झालेल्या हिंदी चित्रपटांबद्दल त्यांचे साल, प्रॉडक्शन कंपनी, दिग्दर्शक, संगीतकार आणि कलाकार या तपशिलाबरोबरच त्यांचे प्रॉडक्शन-सेंटर सुद्धा दिले.

झालं. पडले लोक पुन्हा त्याच्यावर तुटून. भारतातूनच नव्हे तर परदेशांतूनही त्याला खूप मागणी आली. मग...

मग चालला पुन्हा रंगूनवाला अति खोलात. त्याच्या मनाने भारतीय रुपेरी पडद्याचा इतिहास लिहिण्याचं ठरविलं आणि त्याचाच परिणाम म्हणजे त्या (मॅड-मॅनचे) नुकतंच प्रकाशित झालेलं पुस्तक. 'भारतीय चलच्चित्रका इतिहास.'

त्यानं पाहिलं संशोधन, लिखाण वगैरे बाबी स्वतःच सांभाळायला हव्यात; पण प्रकाशक कोण गाठायचा? पहिल्या दोन पुस्तकांना मुंबईचा जे. उदेशी गाठला; पण या वेळी इतिहासाचे मॅन्यूस्क्रिप्ट तयार होते न होते तोच तो धावला सरळ दिल्लीला आणि आपल्या सरकारला या पुस्तकाचं महत्त्व पटवून देऊन समाज कल्याण मंत्रालय आणि केंद्रीय हिंदी निदेशालय यांच्या मदतीनं पुस्तक प्रकाशित केलं.

तसं पाहिलं तर भारतीय चित्रपट इतिहासावरचं रंगूनवालाचं हे पहिलंच पुस्तक नाही. याआधी कृष्णमूर्ती आणि वर्मा यांनी 'Indian Film History' नावानं एक पुस्तक प्रकाशित केलं होतं. त्याचप्रमाणं हिंदीमधे पॉकेट बुक सेरीज्मधे बच्चन श्रीवास्तव यांनी 'भारतीय फिल्मोंकी आत्मकथा' या नावानं हिंदीमधे भारतीय चित्रपटांचा आढावा घेतला होता. पैकी पहिल्या पुस्तकात अवास्तव महत्त्व काही चित्रपटांना दिलं होतं आणि दुसऱ्यामधे माहिती अगदीच उथळ. असेच आणखीही काही फुटकळ प्रयत्न यापूर्वीही झाले होते; पण त्यांचे तपशील, भरवशाची माहिती या दृष्टिकोणातून पहाता त्या पुस्तकांबद्दल फारसे लोकांनी लक्षही दिले नव्हते. शिवाय त्यांच्या खूप लठ्ठ किमतीमुळेही ती पुस्तकं पुष्कळशी सामान्य वाचकांपासून दूरच राहिली होती.

हे सारं लक्षात घेऊन जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपलं पुस्तक पोचलं जावं म्हणून रंगूनवालानं ते पुस्तक एक तर हिंदीमधे लिहिलं आणि दुसरं म्हणजे त्याची किंमत फक्त १२-५० रुपये ठेवली. 'जसं घडलं तसं लिहिलं' या नात्यानं तिऱ्हाइताची भूमिका पत्करून स्वतःची मतं कुठेही न दडवता फक्त काळाच्या संदर्भात काय काय घडलं याचं चित्र पुस्तकद्वारा आपल्यापुढं उभं केलं.

वाचकाला हिंदीमधले तांत्रिक शब्द क्लिष्ट वाटतील म्हणून पुस्तकाच्या शेवटी शब्दावलि देऊन त्यानं त्या शब्दांचे इंग्लिश अन्वयार्थ दिले. वाचकांच्या मनात गोंधळ उडू नये म्हणून दहा दहा वर्षांच्या कालावधीत विभागून त्यांना 'लघु फिल्मोंका दशक', 'रूपक फिल्मोंका जन्म', 'टॉकीका उदय और विकास' वगैरे आकर्षक शीर्षके दिली.

पुस्तकाचं आगळं आकर्षण म्हणून त्यातल्या छायाचित्रांचा उल्लेख करता येईल. भारतीय चित्रपटांचे मूळपुरुष दवेदादा उर्फ भाटवडेकर (आपल्या दाजी भाटवडेकरांचे आजोबा) यांनी असंख्य छोट्या छोट्या फिल्म घेतल्या होत्या. त्या ज्या कॅमेऱ्यावर घेतल्या, त्या कॅमेऱ्यापासून ते तोरणे, फाळके पहिला बोलपट निर्माण करणारे अर्देशीर इराणी यांची छायाचित्रं, तसेच ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व असणाऱ्या भारतीय चित्रपटांचे प्रातिनिधिक फोटोही त्यात टाकलेत. आपली करिअर जे. बी. एच्. वाडिया यांच्याकडे चालू केली म्हणून की काय पण पुस्तकाच्या कव्हरवर वाडियांच्या 'राजनर्तकी' (१९४१) या चित्रपटातले साधना बोस आणि पृथ्वीराज यांचं चित्र दिसून येतं. अर्थात् ऑफ सेट प्रिंटिंगवरची ही चित्रं ग्लॉसी पेपरवर टाकली असती तर जास्त उठाव आला असता.

### प्रकाशनसमारंभ

या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ पुण्यामधे नुकताच फिल्म कल्चरल सेंटर आणि चित्रांजली फिल्म सोसायटी या दोन संस्थांनी आयोजित केला होता.

संध्याकाळची वेळ. पुण्यातल्या पत्रकारमंडळींना खास आमंत्रण देऊन रंगूनवालांच्याबरोबर गप्पांचा कार्यक्रमही ठरवला होता; पण ठरल्या वेळेपेक्षा जवळजवळ तासभर उशीर झाल्यामुळे ही सर्व पत्रकारमंडळी खूप अस्वस्थ दिसत होती; पण आपल्याच पत्रकारबंधूचा कार्यक्रम असल्यानं ही सर्व मंडळी कार्यक्रम गोड मानून घेत होती. शेवटी आली एकदाची रंगूनवालाची स्वारी. तो आल्यावर कळलं की तो सध्या बिमल रॉयवर पुस्तक लिहीत असल्यानं तो भारतीय राष्ट्रीय फिल्मागारात बिमल रॉयचा एक चित्रपट पहात होता. तसं त्यानं या पूर्वी स्व. गुरुदत्तावरही एक पुस्तक लिहिलं आहे.

समारंभाची वेळ आली. फिल्म कल्चरल सेंटरचे अध्यक्ष भास्करराव धारप आपल्या स्वतःच्या पुस्तकप्रकाशनाचा कार्यक्रम परगावी असल्यानं गैरहजर होते. तेव्हा चित्रांजलीचे अध्यक्ष दत्ता धर्माधिकारी, भारतीय राष्ट्रीय फिल्मागारचे प्रमुख पी. के. नायर, स्वतः रंगूनवाला यांच्याबरोबरच चित्रांजलीचे सहचिटणीस किणीकर एका वृद्ध स्त्रीला पण स्टेजवर घेऊन आले. उपस्थित लोक आणि पत्रकारमंडळी आपापसात कुजबुजत होती. ही स्त्री कोण असावी, रंगूनवालाची आई (!) तसं असेल तर ती चक्क नऊवारी लुगडे नेसली होती आणि रंगूनवाला तर पार्शी! पुस्तकाचं प्रकाशन कुणाच्या हस्ते करणार हा प्रश्न पत्रकारमंडळींनी यापूर्वी विचारला नसावा म्हणून त्यांनाही यावद्दल कल्पना नव्हती.

चित्रांजलीच्या शशिकांत किणीकरांचे भाषण झाले आणि त्यानंतर लगेच नायर यांचेहि आपली नॅशनल फिल्म अर्काइव्हबद्दल रेडिमेड असलेली नेहमीची रेकॉर्ड वाजवून भाषण संपविण्याच्या आधी रंगूनवालाच्या एकाकी आणि सतत प्रयत्नांबद्दल त्यांचे अभिनंदन करायला मात्र ते विसरले नाहीत. मग ती बाई बोलायला उठली; पण त्याआधी माईक-कडे धावले चित्रांजलीचे किणीकर. त्या बाईचा थोडक्यात परिचय करून देताना त्यांनी सांगितले ती बाई म्हणजे कमलाबाई गोखले. भारतीय चित्रपटांत काम केलेली पहिली-वहिली स्त्री. दादासाहेब फाळके यांच्या 'भस्मासुर मोहिनी 'मधे त्यांनी १९१४ साली भूमिका केली होती.

कमलाबाईंनी आपल्या दादासाहेबांच्या-बरोबरच्या काही हृद्य आठवणी थोडक्यात सांगितल्या आणि भारतीय चित्रपटसृष्टीचा वाढता व्याप लक्षात घेता रंगूनवालाला भरपूर आशीर्वाद देण्याआधी अशा प्रकारचे चांगले प्रयत्न चहूकडून आणि वरचेवर व्हावेत असे मत प्रदर्शित केले.

रंगूनवालाने त्याला माहिती मिळविण्या-साठी किती कष्ट पडले हे वर्णन करून आजच्या चित्रपटनियतकालिकांवर टीकेची झोड उठवली. कलाकरांच्या खासगी आयु-ष्यातल्या गोष्टींवर निष्कारण भर न देता त्यांचे चित्रपटावरील दर्शन हे आपले प्रमुख ध्येय असावे असे सांगून आपल्याकडली चित्र-पट-नियतकालिके खूप चीप व्हायला लाग-लीत असं मत प्रदर्शित केलं.

चित्रांजलीचे अध्यक्ष दत्ता धर्माधिकारी यांनी आभारप्रदर्शन केल्यावर उपस्थितांना 'Glimpses of Indian Films' ही भारतीय चित्रपटांची ५० वर्षांची वाटचाल दाखवणारी डॉक्युमेंटरी आणि सत्यजित रे यांची 'समाधि' ही फिल्म दाखविण्यात आली.

समारंभानंतर थोडी कुजबूज होत होती. ती म्हणजे रंगूनवाला सध्या मराठी चित्र-पटांवर संशोधन करीत असून त्यांचं लवकरच एक पुस्तक प्रकाशित करणार आहे. मला तरी त्याच्या या साऱ्या उपद्व्यापांबद्दल बॉंबे टॉकीजच्या 'बंधन' (१९४०) या चित्र-पटातल्या गाण्याचा उल्लेख करून म्हणावे लागेल, 'रुकना तेरा काम नही, चलना तेरी शान, चल चल रे नौजवान...' □

[ छायाचित्रे : पृष्ठ ३६ वर ]

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**११-१०-७५ ते १७-१०-७५**

**मेष** : उद्योगात प्रगती

खरे म्हणजे मंगळ तिसरा आल्यापासूनच तुमचे सारे तंत्र बदलले आहे. त्याचा साम-र्थ्याचे वरदानच तुम्हाला लाभले आहे. नोकरी असो की स्वतंत्र उद्योग असो हा मंगळ तुमच्या साऱ्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी तुम्हाला मदत केल्याखेरीज राहाणार नाही. या वेळी तुमच्या मनातील अनेक हेतू पूर्ण होण्याच्या दृष्टीने मार्ग साप-डेल व तशी मदत मिळेल. स्थावराची प्राप्ती होण्याची शक्यता आहे. भूमिहीन लोकांना या वेळी जमीन मिळेल. तुमच्या मनात अनेक दिवस प्लॉट घेण्याचे घोळत होते ना? तो सुसंधी या आठवड्यात तुम्हाला मिळणार आहे. घराचा प्रश्न तात्पुरता तरी सुटेल. परिस्थितीप्रमाणे घर, खोली अगर बंगला मिळू शकेल. नोकरीच्या दृष्टीने नव्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. रेव्हेन्यू खात्यातील नोकरांना कामाचा फार बोजा पडेल. इंजिनियर्स, शेतीपदवीधर व वाणिज्य पदवीधर यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी पडेल व त्यांना सरकारी मदत मिळेल. गुणांची पूजा होईल. चालू नोकरीत आर्थिक व्यवहार जपून करा. मंगळवार ते शुक्रवार महत्त्वाची कामे होतील. महिलांना नोकरीत महत्त्वाची कामगिरी करावी लागेल. स्वतंत्र उद्योगात चलती राहील. विद्यार्थी-विद्यार्थि-नींना प्रसन्नता लाभेल.

**वृषभ** : लाभ दृष्टिपथात येईल

तसे पाहिले तर तुमचे ग्रहमान आता सुधा-रले आहे. केतू बारावा झाला तरी त्यामुळे तुम्हाला लगेच काही प्रतिकूल घडेल असे मानायला हरकत नाही. या आठवड्यात एखादा महत्त्वाचा विजय तुम्ही मिळवणार आहात. तुमचा स्वभाव चंचल आहे; पण जिद्द लढवून त्यात तुम्ही यशस्वी होणार आहात. उद्योग, नोकरी, व्यवसाय, व्यापार यात सुधारणेचे नवे युग सुरू होईल. आर्थिक अडचणीवर मात करण्याचे नवे मार्ग दृष्टि-पथात येतील. व्यवसायात नव्या नव्या योजना आखून त्याची अमलबजावणी करण्याइतके स्वास्थ्य या आठवड्यापासून तुम्हाला निश्चितच मिळू शकेल. रविवारी तुम्ही ठरवलेल्या एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होईल व ती फायद्याची ठरेल. सोमवार ते बुधवार नोकरीत काही संघर्षाचे व काही मानाचे योग येतील. चालू नोकरीत मतभेद टाळून सहकार्याची भूमिका ठेवा. बेकारांचा त्रास वाचेल. नोकरीत प्राधान्य मिळेल. व्यापारात खरेपणाने वागा. महिलांना नव्या वस्तू, दागदागिने मिळू शकतील. माहेरची मदत मिळेल. नोकरदार महिलांना काम फार पडेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींना कलाक्षेत्रात गुण दाखवण्याची संधी मिळेल.

**मिथुन** : सामर्थ्याचा प्रत्यय

बाराव्या केतूच्या त्रासातून तुमची आता मुक्तता झाली आहे. आता तुम्ही कुरकुर करावी असे काही प्रतिकूल राहिलेले नाही. हा केतू तुमचा आर्थिक लाभ अचानक करून देणार आहे. कुणाकडे कर्ज मागितले असेल किंवा ते मिळवण्याचे दुसरे कोणते मार्ग अनु-सरले असतील तर त्यात अपेक्षित यश येईल व तुमच्या योजना यशस्वी होतील. तुम्ही वकील असाल तर तुम्हाला प्रतिष्ठेच्या केसेस मिळणार आहेत. इन्कमटॅक्सचे अधिकारी असतील तर त्यांना वरदानच मिळेल. आर्थिक उन्नती हे या वेळच्या ग्रहांचे समर आहे. मंगळाने तुमचे वर्चस्व वाढवले आहे. नोकरीच्या क्षेत्रात तुमचा दरारा निर्माण होईल. कोणत्याही कामात यश व सिद्धी प्राप्त होईल. तुम्ही स्वतः भेटून कोणतेही काम करा. मध्यस्थामार्फत नको. चालू नोकरीत बढती व प्रमोशन मिळेल. महत्त्वाच्या कामावर तुमची नेमणूक होईल. शेतीपदवीधर, पोलीस यांना नोकरीत प्राधान्य मिळेल. बदलीचे प्रयत्न यशस्वी होतील. राजकारणात चलती राहील. महिलांना सार्वजनिक कामात मान मिळेल. नोकरीत कायम होता येईल. विद्यार्थ्यांना भांडणाची ऊर्मी येईल. त्यांनी मोह टाळावा.

**कर्क** : संभाव्य बदल

शनीमुळे तुमचे सामर्थ्य वाढले असले तरी आता शनीजवळ मंगळाने ठाण मांडले आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मंगळ हा शह देणारा तामसी शक्तीचा ग्रह आहे हे ध्यानी घ्या. या आठवड्यात एवढी काळजी तुम्ही घेतली तर हा काळ तसा वाईट नाही. तुमचे इंटरव्ह्यू यशस्वी होतील. कुणाला भेटावयाचे असेल तर त्याला भेटता येईल. ठरवलेल्या योजना पार पाडण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहकार्य मिळू शकेल. राजकारणा-तील एखादी वजनदार व्यक्ती तुमच्या

सान्निध्यात येऊन तुमचा फायदा करून देईल. तुम्ही जर एखादी महत्त्वाची उद्योगप्रधान योजना आखली असेल तर ती सरकारी पातळीवर पास होऊन तुमचे काम यशस्वी होईल. सरकारी नोकरीत तुम्ही जर वरिष्ठ जागेवर काम करीत असाल तर त्यात मोह टाळा. कुणाचेही दडपण मनावर येऊ देऊ नका. तुमच्या अवतीभवती काय चालू आहे याकडे डोळचांत तेल घालून जपा. बेकारांचा मार्ग मोठा काटेरी होणार आहे. तरी पण प्रयत्नाला योग्य दिशा मिळेल. अपेक्षित गाठीभेटी होतील. महिलांचे मनोगत तडीस जातील. त्यांचा कौटुंबिक प्रश्न समजुतीने सुटेल. नोकरीत सहानुभूती मिळेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पैसे उधळणे टाळावे.

### सिंह : मोठे यश मिळेल

धूर्तपणा व मुत्सद्देगिरी हे तुमचे दोन महत्त्वाचे गुण आहेत व त्यांचा फायदा एका महत्त्वाच्या कामात तुमच्या पदरी पडल्याचा आनंद या आठवड्यात तुम्हाला मिळणार आहे. तुमचा द्वेष करणारी व तुमच्या नावे खडे फोडणारी माणसे तुमच्या अवतीभोवतीच वावरत असतात. त्यांचे डावपेच या वेळी त्यांच्यावर उलटवण्यात तुम्ही यशस्वी होणार आहात. राजकारणात तुम्ही इतिहासजमा झाल्याची आवई ज्यांनी उठवली असेल त्यांना तुमचे गुणगान गावयाची पाळी येणार आहे. नोकरीच्या दृष्टीने ज्या मालकांनी अगर तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तुम्हाला नेस्तनाबूत करण्याचा विडा उचललेल्यांच्या डोळचांत झणझणीत अंजन पडणार आहे. आर्थिक परिस्थिती जमाखर्चाचीच राहील. पैसे मिळतील आणि तसेच ते खर्च होतील. बेकारांना काम अगर नोकरी मिळू शकेल; पण त्यांना फार त्रास घ्यावा लागणार आहे. चालू उद्योग-व्यवसाय जेमतेम चालेल. अडचणी येणार नाहीत; पण प्रगतीची पावले पुढे पडणार नाहीत. प्रवासात अडथळे येतील. मात्र राजकारणात तुमचे मोठेच कौतुक होणार आहे. मोठे यश तुमच्या पदरी पडेल. आर्थिक बाजू दुबळी राहणार नाही. प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. महिलांना राजकारणात मोठेपणा मिळेल. राजकारणात त्यांना प्रवेशही मिळेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींचे मनोरथ पुरे होतील.


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये


### कन्या : नोकरीत यश

मंगळासारखा एक सामर्थ्यसंपन्न आणि कर्तबगारीचा कारक ग्रह दशमस्थानी असणे ही असामान्य योगायोगाचीच गोष्ट आहे. नोकरी, व्यवसाय, व्यापार-उदीम-प्रशासकीय निर्णय इत्यादींच्या बाबतीत हा मंगळ हटकून असामान्य असे कार्य घडवतो. या वेळी असेच कार्य तुमच्या हातून पार पडणार आहे. अनेक यशाचे इमले तुम्ही चढून जाणार आहात. तुमच्या शब्दाला महत्त्व प्राप्त होणार असून तुमचे महत्त्वही वाढणार आहे. नोकरीत तुमच्या कर्तृत्वाचे नवे पैलू प्रकाशात येतील व त्याचा तुमच्या वरिष्ठांवर तसेच खाजगी नोकरीत मालकांवर प्रभाव पडेल. वाङमयीन अशा अनेक कल्पना गेले काही दिवस तुमच्या मनात घोळत होत्या त्यांना मूर्त स्वरूप या वेळी येईल. साहित्यिक, राजकारणी, उद्योगपती, सार्वजनिक कार्यकर्ते यांच्याबरोबर तुमचे नवे संबंध जुळून येणार असून आगामी काळाच्या दृष्टीने त्यांचा उपयोगही होणार आहे. रविवार घाईगर्दीचा जाणार असला तरी महत्त्वाची बोलणी यशस्वी होतील. प्रवासाचा अचानक योग येण्याचा संभव आहे. नोकरीत मनोरथ पूर्ण होतील. आजवर ज्यांना नोकरी मिळाली नसेल त्यांना आता नोकरी मिळेल. शेतीचा व्यवसाय फायद्याचा ठरावा. खते, लोखंडी फर्निचर, उंची कापड, कडधान्ये यांचा व्यापार फायद्याचा ठरेल. वकिली व्यवसायाला उत्तेजन व अनुकूल क्षेत्र मिळेल. महिलांचे मनोरथ पुरे होतील. उद्योगात चलती राहील. विद्यार्थी-विद्यार्थिनींना वाङ्मयात प्रसिद्धीचा योग आहे.

### तूळ : नोकरीत महत्त्व वाढेल

शनी-मंगळांना नावे ठेवण्यात अनेकांना आनंद होत असतो; पण अंतरिक्षातील हेच ग्रह असे आहेत की ते असामान्य कार्य घडवू शकतात. सध्या तुम्हाला भाग्यातील मंगळाचे वरदानच लाभले आहे. तुम्ही बोलावे व दळ हालावे अशी ही मंगळाची कीर्ती आहे. कलाक्षेत्रात तुमच्या नावाला फार महत्त्व येणार आहे. तुमच्या नावावरच गर्दी जमेल इतके तुमचे नाव या आठवड्यात गाजणार आहे. राहू चंद्रावर आला आहे. ती वाईट घटना काही अनपेक्षित घटना घडवणार आहे. नोकरीत आता त्रास नाही. मालक खूष राहातील. वृत्तपत्र, मुद्रण, नाटचसंस्था, आकाशवाणी, चित्रपट-स्टुडिओ इत्यादी ठिकाणच्या नोकरांना खूष होण्यासारखी पगारवाढ मिळेल. या राशीच्या बेकारांच्या डोक्याची कटकट आता संपणार आहे. त्यांना नोकरी अगर उद्योगासाठी कर्ज, मदत असे काही तरी मिळेल. परदेशप्रवासाचा योग आहे; पण अडचणीही आहेत. विवाहेच्छू लोकांना अजून काही काळ थांबायला हवे. समस्या सुटण्याचे मार्ग सापडतील; पण त्रास पडेल. लेखी करार व आश्वासने यांपासून दूर राहणे. महिलांच्या उद्योगांना व कलेला प्रोत्साहन मिळेल. उद्योगात थोडा नफाही होईल. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या महत्त्वाकांक्षा उत्तेजित होतील; पण त्यासाठी त्यांना फार श्रम करावे लागतील.

### वृश्चिक : परिस्थिती सुधारेल

मंगळासारखा ग्रह आठवा असणे ही तुम्ही भीतिदायक गोष्ट समजाल; पण तो तुमचा राशिस्वामी आहे. त्यामुळे तो तुमचे काही वाईट करणार नाही. उलट तुमची आर्थिक परिस्थिती आता सुधारणार हे पक्के ध्यानी ठेवा. अनपेक्षित अर्थलाभ ही या वेळची महत्त्वाची स्थिती आहे. स्थावराच्या खरेदी-विक्रीत लाभ, व्यापारात माल कमी व मागणी जास्त या तत्त्वानुसार फायदा, लॉटरीत नशिबाचे सोने होणे, रेसमध्ये एकदम पैसा मिळणे असे काही तरी घडणार आहे. स्थावराबाबतचे वाद तुमच्या हिताप्रमाणे निकाली निघेल. या आठवडयात शेतीचा धंदा तुमच्या दृष्टीने फायद्याचा ठरेल. शेतीमालाची खरेदी-विक्री, खते, औषधे, तेल, नारळ, कन्फेक्शनरी हा व्यापार फायदेशीर ठरेल. नातेवाईक व मित्र यांच्या सहकार्याने तुम्ही एखादा नवा धंदा सुरू करू शकाल. नोकरीच्या क्षेत्रात खाजगी अगर सरकारी, तुम्हाला कष्ट फार पडतील. वनवास आता संपलेला आहे हे नक्की समजा. या आठवड्यात अनेकांच्या नोकऱ्या

कायम होतील. रविवार, सोमवार, गुरुवार हे दिवस शुभारंभ करायला चांगले आहेत. महिलांना भांडणापासून अलिप्त रहायला हवे. रक्तदाब वाढेल, डोकेदुखीचा त्रास होईल असे काही करू नका. नोकरीच्या दृष्टीने मात्र त्यांना सहानुभूती मिळेल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही चळवळीत भाग घेऊ नये. त्रास होईल.

**धनु : संयमाने वागा**

सातवा मंगळ आणि आठवा शनि म्हणजे तशी गंभीर बाब आहे; पण ईश्वरी उपासना, इष्टदेवतेची मनोभावे भक्ती तुम्हाला यातून सहज बाहेर काढू शकेल. या वेळी गरज आहे ती संयमाने वागण्याची. कोणी बोलो, कोणी निंदो आपले काम की आपण या पद्धतीने जर तुम्ही वागलात तर तुम्हाला हतबल होण्याचे काहीच कारण नाही. उपासना ही मनोबळ वाढवण्याचा, आत्मसामर्थ्य राखण्याचा एक प्रभावी मार्ग आहे हे ध्यानी घेऊन तुम्ही या आठवडयात वागल्यास प्रतिकूलतेतूनही काही अनुकूल निघू शकेल. शनिवार ते बुधवार व शुक्रवार हे दिवस ध्यानी ठेवा. महत्त्वाच्या व्यक्तीची भेट, इष्टमित्र व सहकारी यांची सहानुभूती असे काही तरी या वेळी घडू शकेल. एखादी राजकीय व्यक्ति किंवा लोकप्रिय व्यक्ति तुमच्या ओळखीची होईल व त्यामुळे तुमचे जीवनमान सुधारेल. मागे केलेल्या कामाची फळे आता तुमच्या पदरात पडतील. मधून मधून तुमच्या मनात थैमान घालणारी निराशा आता उरणार नाही. मन प्रसन्न राहिले नाही तरी रस वाटेल. महिलांना थोडाफार मानसिक त्रास होणार आहे. एखादा जुना आजार उफाळून येईल अशी भीति वाटेल. विद्यार्थी–विद्यार्थिनींना कशाच बाबतीत आस्था वाटणार नाही. बेफिकीरपणा वाढेल.

**मकर : सहकाऱ्याचा विरह**

शनि हा राशिस्वामी तर मंगळ हा तुमचा मित्र आहे. हे दोन्ही ग्रह सध्या तरी तुमच्या उत्कर्षाचे कंकण हाती बांधून भ्रमण करीत आहेत. राजकारणात शत्रूचा मित्र व मित्राचा शत्रू असे प्रकार होत असतात. तुम्ही उत्तम प्रशासक आहात, तसेच उत्तम राजकारणीदेखील आहात. त्याचा प्रत्यय या आठवड्यातच येऊ लागणार आहे. विरोधासाठी विरोध हे तत्त्व धरून ज्यांनी गेले अनेक दिवस तुम्हाला विरोध केला त्यांना या वेळी तुम्ही अक्षरशः थक्क करून सोडणार आहात. कारण तुमचे सामर्थ्य वाढणार असून सामर्थ्यवान बनूनदेखील तुम्ही या विरोधकांचा विरोध प्रेमाने मोडून काढण्यात यशस्वी ठरणार आहात. तुम्ही जर लेखक, कलावंत, आर्किटेक्ट वगैरे असाल तर एखाद्या स्पर्धेत तुम्ही अवश्य भाग घ्या. नोकरीत मानापमानाच्या भलत्या कल्पना मनात न आणता हाताखालच्या नोकरांबरोबर संयमाने व काही बाबतीत तडजोड करूनच वागा. शेतीखाते, रेव्हेन्यूखाते या खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढणार असून परिस्थिती हाताळण्यात कसोटी लागणार आहे. मंगळवार ते गुरुवार बेकारांना आर्थिक मदत किंवा नोकरी मिळू शकेल. राजकारणात एखाद्या जवळच्या मित्राचा विरह सहन करावा लागेल. महिलांना ग्रहांची अनुकूलता आहे. संसारात नेतृत्व व मानही मिळेल. विद्यार्थीवर्गाला औद्योगिक कारखान्यात काही काम करण्याची व शिकण्याची संधी मिळेल.

**कुंभ : अनुकूल स्थित्यंतर**

चौथा केतू व चौथा मंगळ यांनी तुमच्या मनाची स्थिती विचित्र करून टाकली होती. भावनेचा कोंडमारा तुम्ही फार काळ सहन केला. तुमच्या आशाआकांक्षांना पालवी फुटावी व लाभ हाताशी येण्याअगोदरच त्याच्यावर वीज पडावी तसा त्या आशाआकांक्षांचा चुराडा व्हावा असे अनेक दिवस घडत आहे; पण मित्रहो, प्रतिकूल परिस्थितीच्या चरकातून तुम्ही बाहेर पडणार असून तुमच्या प्रतिष्ठेचा, उत्कर्षाचा, कर्तबगारीचे योग्य चीज करणारा काळ सुरू होत आहे हे मला आनंदाने मुद्दाम सुचवावेसे वाटते. राजकारणात व सत्ताकारणातही तुम्ही भारीच अपमान सहन केला आहे; पण आता अशी पाळी तुमच्यावर येणार नाही. तुम्ही मुत्सद्देगिरीने व संधीचा योग्य लाभ उठवून टाकलेली पावले अचूक ठरणार आहेत. वरिष्ठांबरोबरची भांडणे मतभेद मिटून सहानुभूतीचे व मर्जीचे राजकारण सुरू होईल. या वेळी कोणत्याही पदवीधरांना उच्चपदाच्या नोकरीसाठी इंटरव्ह्यू द्यायचा असेल किंवा त्यासाठी प्रयत्न करायचा असेल तर त्याला अनुकूलता आहे. व्यापारीबंधूंना आता यापुढे त्रास होणार नाही. परदेश–प्रवासाचा उत्तम योग आहे. त्यासाठी तुम्ही केलेल्या प्रयत्नांना यश येईल. आर्थिक स्थिती आता सुधारणार आहे. खरेदी-विक्रीचे व्यवहार फायदा देतील. नवी वस्तू मिळेल. महिलांना इच्छेप्रमाणे दागिना घेता येईल. मनोरथ पूर्ण होतील. विद्यार्थ्यांची निसर्गसहल निघणार आहे.

**मीन : अडचणीतून मार्ग**

पाचव्या शनीच्या हाती जरी तुमच्या हिताचे व कल्याणाचे दोर असले तरी चौथ्या मंगळाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण सुखस्थान या मंगळाने अडवले असून त्यामुळे तुमचे मानसिक स्वास्थ्य बिघडवण्याचे उद्योग हा मंगळ करणार आहे. राशिस्वामी गुरु तुम्हाला अनुकूल असल्यामुळे तुमचा तोल जाणार नाही; पण मानापमानाचे भलतेच वेड तुमच्या डोक्यात शिरणार असून त्याचा परिणाम भयंकर तीव्र होण्यावर होईल म्हणून गुरुवारचा उपास करा व रोज गुरुचरित्र वाचीत जा. त्यामुळे नियंत्रण राहील; पण एवढा हा प्रतिकूल परिणाम सोडला तर हा आठवडा प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिपथात आणील. पत्रकार व वरिष्ठ जागेवरील अधिकारी यांना चटकन विदेशी प्रवासाचा योग येईल. उपासनामार्गात अडथळे आले तरी ती पूर्ण होईल. नोकरीची परिस्थिती सुधारेल. चालू काम तुम्हाला नको असेल तर त्यात बदल करू शकता. मात्र भांडणाचा पवित्रा न घेता विचारविनिमयाने ते काम करून घेता येईल. संशोधकांना नवा मार्ग सापडेल. सरकारी सहाय्य मिळेल. धार्मिक कार्यात सुसूत्रता येईल. महिलांना आरोग्याची काळजी घ्यायला हवी. भावनाविवश स्त्रियांनी जास्त जपावे. विद्यार्थ्यांनी निराशेच्या आहारी जाऊ नये. त्यांचे मनोरथ पूर्ण झाले नाहीत तरी आशेला स्थान राहील. □ □


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI (GAYA)

## ययाति : पृष्ठ ५५ वरून

तिच्या वाटचाला येणारी दुःखे अकारण आणि अपात्री येतात; पण ती सोसतानाहि प्रीतीवरली तिची श्रद्धा उडत नाही वा तिच्या वृत्तीत कोठेही कडवटपणा उरत नाही. तिचे योगसाधन पाहिल्यावर Upon such sacrifices, my Cordelia the Gods themselves throw incense... असे शेक्सपियरच्या लियरप्रमाणे म्हणावेसे वाटते. तिच्या योगसाधनेमुळे यतीसारख्या कर्मठ तपस्व्यालादेखील माणुसकीचे पाझर फुटले आणि देवयानीलादेखील प्रीतीचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी तिला शरण जावे लागले. देवयानी, शर्मिष्ठा आणि ययाति यांच्या प्रेमकथेचा सांगाडा तपासला तर त्यात केवळ हजारो वेळा उगाळलेला नेहमीचाच प्रेमाचा त्रिकोण दिसेल, पण भाष्यकार खांडेकरांच्या लेखणीतून या त्रिकोणातहि पीळदार अनुभव उतरलेला ठायी ठायी आढळतो. संसारात पति-पत्नींना काय हवे असते, कशाची गरज असते, कुठे सावरून–सांभाळून घ्यायचे असते, परस्परांच्या भावनांना कसे जपायचे, विकारांना कसा आवर घालायचा, तडजोड म्हणजे काय, मनामनांचे मीलन म्हणजे काय, ते कसे प्रकट होते, प्रीतीचे नाजुक पुष्प कोमेजून जाऊ नये म्हणून कोणती दक्षता घ्यावी लागते, शरीरसुख आणि सहजीवन यांची सांगड कशी घालावी लागते इ. अनेक गहन सूक्ष्म प्रत्ययकारी समस्यांना स्पर्श करीत करीत हा त्रिकोण लेखकाने सजीव केला आहे. त्यामुळेच या कादंबरीतला दुसरा आणि तिसरा भाग कमालीचा हृदयंगम उतरलेला आहे. ययाति-देवयानी वा शर्मिष्ठा ही माणसेच आहेत, म्हणून त्यांना लहान-मोठ्या मर्यादा आहेत; पण त्यातील निखालस दुष्ट कोणीहि नाही आणि तरीसुद्धा परस्परांच्या सुख-दुःखांना ती कारणीभूत होतात. दैवदुर्विलास आणि मनुष्यमात्राचे अज्ञान हाच दुःखाचा मूलस्रोत आहे अशी त्यामुळेच मनाची खात्री होत जाते. जगातल्या श्रेष्ठ कलाकारांच्या शोकान्तिकेत व्यक्त होणारे हे भीषण सत्य ययातीतही अनेक अंगांनी प्रकट होताना आढळते, म्हणूनच ययाति हे एक महाकाव्य आहे, असे म्हणावेसे वाटते.

### तीन तपस्वी

यति, शुक्राचार्य आणि कच या तीन तपस्व्यांचे चित्रण या कादंबरीच्या आशयात निराळीच भर घालते. पित्याच्या शापाने भयग्रस्त झालेला यति कडू फळे खातो, काटेरी शय्येवर झोपतो, गुहेत राहतो आणि स्त्रियांचा द्वेष करतो. यतीचे हे चित्र पाहत असताना आजच्या भारतीय समाजातल्या 'आचार्य' पंथीय एखाद्या तपस्व्याची आठवण सहजतेने होते. सर्वसामान्य समाजातच नव्हे तर स्वतःलाहि न पेलणारे वैराग्याचे आदर्श उभे करण्याच्या धडपडीत मोक्षाला आणि संसारसुखाला आचवलेले हे आधुनिक तपस्वी अज्ञजनांचा बुद्धिभेद कसा करतात, याचे खांडेकरांनी यतीच्या रूपाने मोठे मार्मिक चित्र उभे केले आहे. संजीवनी विद्येसाठी उग्र तपस्या करणारे शीघ्रकोपी शुक्राचार्य हे जणू बॉम्ब निर्माण करणाऱ्या आजच्या शास्त्रज्ञांचे पूर्वज आहेत. विश्वाच्या जीवनाशी खेळ खेळण्याची शक्ती सिद्धीच्या रूपाने प्राप्त होऊन देखील या महापंडिताला जीवनाचा अर्थ कधीच उमगला नाही. शक्ती हे साधन आहे, साध्य नव्हे याची जाणीव सुटलेले शुक्राचार्यांसारखे तपस्वीदेखील अखेर दानवांच्या हातांतले बाहुले होऊन विश्वाच्या प्रलयाला कारणीभूत होतात. असले पांडित्य चांगदेवाच्या तपश्चर्येप्रमाणे माणुसकीच्या प्रत्ययांना कोरे करकरीतच ठेवते. देवयानीवर ययातीने केलेल्या अन्यायाचा सूड घेण्याची बुद्धी आणि सिद्धी शुक्राचार्यांपाशी होती; पण तिला सुखी करण्याचा महामंत्र काही ते तिला देऊ शकले नाहीत. अखेर धाय मोकलून रडणाऱ्या कन्येकडे पाठ फिरवून तपस्येच्या गुहेतच वैतागाने या महापंडिताला पळ काढणे भाग पडले. यति आणि शुक्राचार्य या दोन तपस्व्यांच्या पार्श्वभूमीवर खांडेकरांनी रेखाटलेले कचदेवाचे चित्र मोठे अर्थपूर्ण आणि हृदयंगम उतरले आहे.

कचदेखील तपस्वीच आहे. शुक्राचार्यांप्रमाणे तो संजीवनी विद्येची साधना करतो आणि यतीप्रमाणे तो स्त्रीप्रेमाला वर्ज्य मानतो; पण त्याचे हेतू, त्याची साधना आणि त्याच्या वृत्ती किती तरी भिन्न आहेत. संजीवनीला तो साधन मानतो आणि देवकार्यासाठी ही सिद्धी तो राबवू पाहतो. युद्धाचा त्याला मनापासून उबग आहे; पण प्राप्तकर्तव्यापासून तो पळून जाऊ इच्छित नाही. कर्तव्यासाठी सर्वस्वाहून प्रिय अशा देवयानीचा तो त्याग करतो; पण तो स्त्रीद्वेष्टा होत नाही. जीवनावर त्याची गाढ भक्ती आहे; पण उपभोगातच जीवनाची कृतार्थता तो मानीत नाही. त्याची तपश्चर्या अहंकारापासून उपजत नाही वा पळपुटेपणातून अवतरत नाही. मृत्यूला तो भीत नाही; पण मृत्यूसाठी तो अधीरही होत नाही. त्याला फुले आवडतात; पण ती झाडावर डोलताना पाहून त्याचे मन तृप्त होते. देवयानीवरील त्याची प्रीती तिचे दोष पत्करण्याइतकी डोळस आणि उदार आहे. तिचा त्याग करावा लागला तरी त्याच्या मनात कुठे खेद वा खंत नाही. त्याला आपल्या अपुरेपणाची जाणीव आहे; म्हणूनच शर्मिष्ठेच्या प्रीतियोगापाशी त्याचे मन विनम्र होते. त्यामुळेच कचाच्या तपस्येला एक आगळे माधुर्य आणि रमणीयता प्राप्त झाली आहे. ययातीला कचासारखा तत्त्वज्ञ कवी मित्र म्हणून बहाल करण्यात आणि कादंबरीत त्याचा चातुर्याने उपयोग करून घेण्यात खांडेकरांनी श्रेष्ठ दर्जाची प्रतिभा दर्शविली आहे यात शंका नाही.

आशय आणि ती प्रकट करणाऱ्या व्यक्तिरेखा यांना सांधणाऱ्या प्रमुख घटना महाभारतातूनच खांडेकरांना उपलब्ध झालेल्या आहेत; परंतु सर्व लहान-थोर प्रसंगांची गुंफण आणि त्यांना आशयाच्या संदर्भात दिलेला वैशिष्ट्यपूर्ण अर्थ यामुळे कादंबरीच्या सौंदर्यातच नव्हे तर सामर्थ्यातहि निश्चितच भर पडली आहे.

### कलाचातुरी

ययाति-देवयानी, ययाति-शर्मिष्ठा यांच्या भेटीचे पहिले प्रसंग, शर्मिष्ठेकडे ययातीचे मन झुकण्यापूर्वी देवयानीच्या संसारात त्याच्या कोमल भावनांची झालेली परवड नहुषाच्या शापाने आणि शुक्राचार्यांच्या भीतीने ययातीचा होणारा थरकाप, भय आणि वैफल्य विस्मरण्यासाठी त्याने मांडलेला प्रलय, वार्धक्याच्या स्पर्शाने शापित ययातीची झालेली केविलवाणी तडफड, पूरूच्या तेजस्वी त्यागाने त्याच्या मनाला झालेली उपरती आणि अखेर शांत मनाने मृत्यूचे त्याने केलेले स्वागत इ. सर्वच लहानमोठ्या घटना खांडेकरांनी कमालीच्या कौशल्याने कथासूत्रात गुंफल्या आहेत. त्यातले नाट्य, रसवत्ता आणि त्यातून प्रगट होणारे जीवनदर्शन ही केवळ अवर्णनीय आहेत. अद्भुतता, रहस्य, योगायोग या तत्त्वांकडे फडके, खांडेकरांचा मनापासून ओढा. सामाजिक कादंबऱ्यांतून त्यामुळेच त्यांच्या चित्रणाला अनेक मर्यादा निर्माण झाल्या आहेत. या कादंबरीतहि यति-ययातिची भेट, देवयानी-ययाती भेट, शर्मिष्ठेला यतीने कड्यावरून वाचवणे, ययातीच्या मृत्यूच्या वेळी नेमके कचदेवाचे आगमन होणे–असले योगायोग आहेतच; पण कादंबरीच्या मूळ पौराणिक रूपाशी ते विसंवादी नाहीत. निदान कथावस्तूशी ते विसंवादीरीतीने तरी अवतरत नाहीत; पण खांडेकरांच्या कलाचातुर्याचे विशेष मर्म प्रकट होते ते त्यांनी अनेक ठिकाणी योजलेल्या कल्पनाचित्रात. ही कल्पनाचित्रे (Images) त्यांच्या एरवीच्या अलंकारिक शैलीपेक्षा निराळी पडतात. ती आशयाशी, रसवत्तेशी एकजीव होऊन उचंबळतात, म्हणूनच ती गतिमान (Dynamic) आणि जिवंत वाटतात. उदाहरणार्थ ययाति कादंबरीत त्यांनी ठिकठिकाणी योजलेले घोड्याचेच रूपक पाहावे. काळ, आत्मा, मन आणि मनोविकार इतक्या विविध अर्थांनी ही वैचित्र्यपूर्ण घोड्याची कल्पना अनेक ठिकाणी चित्ररूपाने त्यांच्या निरूपणात अवतरते. ययातीच्या मनातले द्वंद्व चित्रित करताना दोन मदोन्मत्त हत्तींची टक्कर भयभीत होऊन पाहणाऱ्या एका बालकाची त्यांनी दिलेली प्रदीर्घ उपमा, देवयानीच्या

निष्प्रेम संसारात ययातीच्या एकलेपणाची व्यथा सांगत असताना निर्मनुष्य ओसाड द्वीपाची त्यांनी रेखाटलेली कल्पना वा ययातीने मद्याच्या पेल्यात आपले सर्वस्व बुडविण्याचा गदारोळ चालवला असताना त्याच्या अंतश्चक्षूंना दिसलेल्या दरीत कोसळणाऱ्या रथाचे त्यांनी रंगवलेले रूपक–लेखकाच्या कल्पकतेच्या असाधारण बळाची साक्ष पटवतात.

त्याहीपेक्षा निरूपणाच्या ओघात ठिकठिकाणी खांडेकरांच्या लेखणीतून उतरलेले सुभाषितासारखे उद्गार भाष्यकार खांडेकरांची थोरवी पटविल्याशिवाय राहत नाहीत. खांडेकरांच्या एरवीच्या लेखनातही अर्धसत्यात्मक, चमत्कृतिपूर्ण वाक्यप्रयोग अवतरतात; पण मी उल्लेखित असलेल्या उद्गारांचे सामर्थ्य यापेक्षा निराळ्या जातीचे आहे. उदाहरणार्थ पुढील काही उतारेच पाहावेत.

(१) 'माणूस शरीरावर प्रेम करतो, त्या प्रेमाला अंत नसतो; पण शरीर काही त्याच्यावर असे प्रेम करीत नाही. प्रसंगी ते त्याचे वैर साधते...'

(२) 'युवराज ! त्या शापाला भ्यायला कशाला हवं ? खरं सांगू तुला–या जगात जन्माला येणारा प्रत्येक माणूस शापित असतो. कुणाला पूर्वजन्मीचं कर्म भोवतं, कुणाला आई-बापांच्या दोषांची फळं चाखावी लागतात, कुणी स्वभावदोषामुळे दुःखी होतो, कुणाला परिस्थितीच्या शृंखलात बद्ध होऊन प्रवास करावा लागतो.'

'म्हणजे जीवन एक शापच आहे म्हणायचा ?'

'छे, जीवन हा अनेक शापांनी युक्त असलेला वर आहे.'

'मग मानवी जीवनाला हेतु काय ?'

'या शापांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करणं...'

(३) संसार हा असा श्रेष्ठ आणि पवित्र यज्ञ आहे. सहस्र अश्वमेधांचं पुण्य त्यात सामावलेलं आहे. मात्र हा संसारयज्ञ सफळ व्हावा म्हणून त्यात पतिपत्नींना जो अगदी पहिली आहुति द्यावी लागते ती आपआपल्या अहंकाराची...

यासारखे असंख्य उतारे या कादंबरीतून काढून दाखविता येतील. ययातीला 'महाकाव्य' असे संबोधावेसे वाटते ते त्यात ठिकठिकाणी विखुरलेल्या भाष्यकार खांडेकरांच्या विचारधनामुळेच.

## आणि मर्यादा

मात्र ययातीचे रूपसौंदर्य आणि सामर्थ्य न्याहाळत असताना रसिकमनात निर्माण होणारे असमाधान तितकेच तीव्र आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे. ही कादंबरी वाचीत असताना (खरे तर खांडेकरांच्या सर्वच कादंबऱ्या वाचीत असताना) एक जाणीव, एक प्रत्यय वाचकांना–सामान्य वाचकांनाहि उत्कटतेने येतो. खांडेकर प्रभावी कल्पकशैलीचे आणि तीव्र बुद्धीचे, तसेच गाढ सहानुभूतीचे आणि परिणत प्रज्ञेचे भाष्यकार आहेत, टीकाकार आहेत; पण हाडाचे ते काही कलाकार नव्हेत. चित्रणाच्या ठिणाणी ते विश्लेषण करू लागतात, त्यामुळे प्रसंगाची रंगत त्यांना केवळ कष्टसाध्य अशीच आहे. प्रसंग आणि व्यक्तिरेखा उभी करण्याचे कसबच त्यांच्या लेखणीत बेताचे आहे की काय अशी शंका येते. त्यांची विवेचकशक्ति समस्येचा अचूक वेध घेते, मीमांसा करते, निदान करते; त्यांची कल्पकता, घटनाप्रसंगांची गुंफण आणि व्यक्तिरेखांचे आराखडे मोठ्या कौशल्याने आखून देते–आणि मग कुठे तरी खांडेकर कमी पडू लागतात. जे सहजगत्या चित्रणातून आविष्कृत व्हावे त्यावर लांबच लांब, पण प्रभावी शैलीने नटलेली, सजलेली व्याख्याने, विवेचने सुरू लागतात. ते अशा प्रसंगी अलंकारांची कोटीबाजपणाची बरसात करतात आणि सुभाषितवजा उद्गारांनी आणि खटकेबाज संवादांनी कशाची तरी उणीव झाकू पाहतात. प्रसंगाची रंगत अनेक प्रकारच्या लहानमोठ्या तपशिलांतून उभी राहत असते. या तपशिलांचा त्यांना मनस्वी कंटाळा आहे. परिणामतः थोडक्यात प्रसंग सांगून मोकळे व्हावे आणि मग त्यावर मनःपूत भाष्य करावे याची त्यांना मनापासून हौस आहे. खांडेकरांच्या कादंबरीत पत्रे, डायरी, निवेदने, आत्मकथन यांचा सढळ हाताने वापर केलेला असतो याचे कारण तरी हेच दिसते. कादंबरीपेक्षा प्रस्तावनेतच त्यांची वृत्ति अधिक रममाण होते याचेही कारण हेच असावे. क्रौंचवध, अश्रू आणि ययाति या कादंबऱ्यांची मांडणी आत्मकथनपर प्रकरणांतून करण्यात निरूपणाची त्यांची नावड अगदी स्पष्ट होते. आरंभी तंत्रात्मक प्रयोग म्हणून त्यांनी स्वीकारलेली ही पद्धत, त्यांच्या प्रतिभाबलाची मर्यादाच प्रकट करू लागली आहे. 'निरूपणाची नावड' असल्यामुळे हाती उत्कट आणि थोर कथावस्तु गवसूनही खांडेकर तिला शंभर टक्के न्याय देऊ शकत नाहीत. ययातीच्या चित्रणात हा अनुभव पदोपदी येतो. कथावस्तूशी लेखकाची होणारी भावनात्मक तन्मयता खांडेकरांना शंभर टक्के साध्य असावी असेहि वाटत नाही. ययातीच्या भोगलालसेचे, अधःपतनाचे, पश्चात्तापाचे आणि परिवर्तनाचे त्यांनी केलेले विवरण आणि चित्रण अनेक ठिकाणी बौद्धिक विश्लेषणासारखे वाटते. ययातीची कामकथा रंगवताना त्यांनी आळवलेला शृंगाररस अगदी बेचव, अळणी आणि सोवळा वाटतो. खांडेकरांच्या प्रकृतीतच या रसाला स्थान बेताचे आहे हे काही या उणोवेचे कारण होऊ शकत नाही. ययातीची कामकथा फडक्यांच्या, माडखोलकरांच्या वा भाव्यांच्या हाती गेली असती तर ती अधिक रंगतीनेच नव्हे तर सूक्ष्मातिसूक्ष्म मनोव्यापारांचे चित्रण करीत अवतरली असती यात शंका नाही; पण खांडेकरांची अलिप्तता आणि जाग वरील तिन्ही कादंबरीकारांपाशी नाही; पण कादंबरीलेखनाला ही रंगत जर आवश्यक असेल–आणि ती आहे असे मला वाटते–तर ययातीच्या थोरवीचे गुणगान करताना more of a promise, than an achievement अशी तिची मर्यादाहि आखून घ्यावी लागेल.

या मर्यादेमुळेच ययातीमधील दुय्यम पात्रांच्या चित्रणांत मामुलीपणा, उपरेपणा आणि म्हणून निर्जीवपणा उतरल्यासारखा वाटतो. कादंबरीतली प्रमुख पात्रे लेखकाचे अवधान इतके ओढून घेतात की, त्यामुळेच दुय्यम पात्रांच्या चित्रणातील तोल आणि लय संपूर्णपणे बिघडून जाते. त्यांची मुकुलिका, कलिका, तारका, माधवी, मंदार, माधव ही नुसती लुसलुशीत गोड नांवे वाटतात आणि त्यांचे स्वभावविशेष म्हणजे घाईघाईने जरुरीसाठी गरजेपुरते ओढलेले काळे-पांढरे फराटे दिसतात. यदू आणि पुरु ययातीचे पुत्र. यापैकी यदूच्या स्वभावचित्राला या कहाणीत मुळीच महत्त्व नाही; पण निदान पुरूची व्यक्तिरेखा तरी अधिक ठळकदार उमटणे जरूर होते. पित्याचे वार्धक्य पुरूने स्वीकारणे हा देखील पुरूच्या मनोधारणेतील एक अत्यंत उत्कट अनुभव; पण या अनुभवाची एकहि कड कादंबरीत उमटत नाही. खुंटीवर संवळ अडकवावे तसे पुरूवर वार्धक्य अडकवले जाते आणि परत काढले जाते. वाचकाच्या मनात पुरु माणूस म्हणून नीटसा ठसतहि नाही. अशा वेळी एक शंका अशीहि मनाला चाटून जाते की, कादंबरीचा शेवटचा भाग घाईघाईने किंचित कंटाळून तर पुरा करण्यात आलेला नाही ना ?

घाईने घडलेल्या घडामोडी कथेतील स्वाभाविकतेच्या ओघाला बाध आणतात याचा खांडेकरांना अनेकदा विसर पडल्यासारखा वाटतो. उदाहरणार्थ या कादंबरीतील पात्रांची होणारी परिवर्तने पाहावीत. 'हृदयपरिवर्तन' ही खांडेकरी विश्वातली–बहुधा कोल्हटकरांच्या अद्भुतरम्य सृष्टीतून वारसाने आलेली–एक लाडकी कल्पना. ययातीचे परिवर्तन होते, देवयानीचे परिवर्तन होते, यतीचे परिवर्तन देखील होते. ययातीचे परिवर्तन ज्या पद्धतीने, परिस्थितीने आणि गतीने होते त्यात काही एक अपरिहार्यता आहे, अटळता आहे; पण देवयानीच्या परिवर्तनात फक्त काव्यगत न्यायबुद्धीच प्रत्ययास येते. शर्मिष्ठेची योगसाधना आणि पुरूचा त्याग यांच्या प्रयत्नांनी देवयानीला उपरती होणे अस्वाभाविक मुळीच नाही. अस्वाभाविक आहे ती तीन पानांतली घाई. देवयानीचे घाईचे परिवर्तन निदान तर्कबुद्धीला पटण्यासारखे तरी आहे; पण कचाच्या उपदेशामृताने यतीने बदलणे आणि प्रेयसी म्हणून ययातीच्या मनात घोळ...

राहणाऱ्या अलकेचे पान-दीड पानातच बहिणीत रूपांतर होणे हे परिवर्तन निव्वळ खोट्या उदात्तीकरणासाठीच उपजले असावे याची खात्री पटते. मनुष्यमात्राप्रमाणेच थोर कलाकृतींनाहि उणीवा आणि मर्यादा या असावयाच्याच. या मर्यादांच्या लक्ष्मणरेषांतहि ययातीची थोरवी उठून दिसते, म्हणूनच त्यांचा उल्लेख करावयाचा.

### ययाति–एक प्रयोग

ययातीच्या निर्मितीने खांडेकरांनी तरुण कादंबरीकारांपुढे एक नवा आदर्शच नव्हे तर एक प्रयोगहि ठेवलेला आहे. प्रत्येक नवा प्रयोग यशस्वी होवो न होवो, तो कलाकृतीच्या पायांतल्या जीर्ण शृंखला तोडीत असतो आणि कलाकारापुढे नवनवी क्षितिजे निर्माण करीत असतो. ययातीचे महत्त्व या दृष्टीनेहि अनन्यसाधारण आहे. पौराणिक कादंबरीचा उपेक्षित परिसर ययातीच्या निर्मितीमुळे नव्या कादंबरीकारांच्या नव्या प्रयत्नांनी गजबजू लागेल, तर 'ययाति'चे अवतारकार्य सफळ झाल्यासारखे होईल. □

[ 'माणूस' जुलै १९६१ अंकावरून पुनर्मुद्रित ]

## सत्तर दिवस.... पृष्ठ २२ वरून

लागली आणि एक हेलिकॉप्टर जमिनीला चिकटलं.

तीन मुलं तिकडे धावली. रॉय हार्ले फारच अशक्त झाला असल्यामुळे बॉबी फ्रँकॉइसनं त्याला आधार दिला. पंख भिरभिरत असल्यामुळे कपडे उडत होते; पण मित्रांच्या साहाय्यानं तिघं हेलिकॉप्टरमधे एकदाचे शिरले.

ते उडल्यावर दुसरं खाली आलं. त्याच्याही जागा भरल्या आणि ते आकाशात झेपावलं. तिसऱ्यात झेर्बिनो सूटकेससह शिरला. अत्यंत सहजपणे त्यांनी पर्वत ओलांडला आणि परतीची दिशा धरली. काचेतून ॲझुफी नदी दिसत होती आणि असंख्य हिरवे पट्टे. लॉस मेटनीजपर्यंत ते सलग पसरले होते.

हेलिकॉप्टरमधून उतरल्यावर आधीच्या आठजणांसारखीच मागून आलेली मुलं गवतावर लोळू लागली. खिदळत, किंचाळत आणि एकमेकांना मिठ्या मारत. सर्वांनी मोठ्या आवाजात देवाचे आभार मानले. झाडं आणि फुलांच्या दर्शनामुळे मिथॉलच्या तोंडातून शब्द फुटेनात. युरुग्वेला परतल्यावर महिनेन् महिने बागांचं नयनमनोहर दृश्य बघण्यात काढायचे असं त्यानं ठरवून टाकलं.

चारजणांची तुकडी अद्याप फेअरचाइल्डजवळच थांबली होती. त्यांना आणण्यासाठी गेर्सियाचं हेलिकॉप्टर निघालं. तोपर्यंत मुलांवर जरुरीचे प्राथमिक उपचार करण्यात आले होते. आठीजण प्रवास करायला योग्य शारीरिक स्थितीत होते, असं डॉक्टरचं मत पडलं. सहलीला आल्यासारखी मुलं मजेत होती. मोठ्या संकटाला तोंड देऊन ते नुकतेच परतले असतील यावर कोणाचाच विश्वास बसला नसता. काहीजणांनी जवळच असलेल्या झऱ्यात स्नान उरकलं. फिटो आणि झेर्बिनो घोड्यावरून रपेट मारायला गेले.

अर्ध्या तासानंतर गेर्सिया चारजणांना घेऊन परतला. सर्वजण सॅन फर्नांदोकडे निघाले. तिथल्या कँपवर पोचण्याचा अवकाश, फिटो दिसताच त्याचे आईवडील त्याच्याकडे धावले. इतक्या दिवसांच्या चिंतेची अखेर झाली होती. त्यांच्या आनंदाला सीमाच नव्हती. मागून झेर्बिनो आणि बॉबीचे आईवडीलही आले. सगळी मुलं जणू काही थडग्यातून परतली होती.

रॉयची अवस्था बिकट होती. त्याची सारी हाडं बाहेर आली होती. डोळे खोल गेलेले. हातापायांच्या काड्या. तो मानसिक दृष्ट्या खचल्याचं त्याच्या डोळ्यांवरून स्पष्ट दिसत होतं.

मुलं आणि पालकांची अविस्मरणीय पुनर्भेट झाल्यावर आठजणांना काळजीपूर्वक तपासणीसाठी हॉस्पिटलमधे रवाना करण्यात आलं. २३ डिसेंबरला असा निर्णय घेण्यात आला की मुलांना खरी मनःशांती मिळण्यासाठी ख्रिस्मसच्या दिवशी सर्व पालकांसह मेजवानी दिली पाहिजे. लगेच, पुन्हा हेलिकॉप्टरमधे बसून नंतरची आठ मुलं सँटियागोमधल्या जनरल हॉस्पिटलमधे दाखल होण्यासाठी निघाली. □

### : ६ :

तोपर्यंत, पहिल्या आठ जणांनी सेंट जॉनमधील हॉस्पिटलमधे एक्काहत्तरावी रात्र मऊ बिछान्यात घालवली होती. सुखाची सुद्धा एकदम सवय होत नाही. डॅनियलला तर बर्फाचा कडा कोसळल्याचं स्वप्न पडल्यामुळे तो दचकून जागा झाला; पण लगेच अंगावरच्या ब्लँकेटमुळे भानावर आला. नंतर काही मनासारखी झोप त्याला पुन्हा लागली नाही.

इन्शार्तेला पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाल्यावरच जाग आली. त्याला प्रसन्न झोप लागली होती. इतरही मुलं बाहेर व्हरांड्यात येऊन खुर्च्यांवर बसली. समोर अँडीजच्या पायथ्याला असलेल्या लहान लहान टेकड्या दिसत होत्या.

आठ वाजता फादर अँड्रीज कॅसेट टेप रेकॉर्डर घेऊन आला. मुलांचं बोलणं तो मुद्रित करून घेऊ लागला. 'आम्हाला जगण्याची तीव्र इच्छा होती,' मँगिनो म्हणाला, 'ईश्वरावर नितांत श्रद्धा. आमची एकी वाखाणण्याजोगी होती. आम्ही कोणालाही निराश होऊ दिलं नाही. केवळ आत्मविश्वासाचे बळावर आम्ही बचावलो. आमच्यात आमूलाग्र बदल घडावा म्हणूनच देवानं तो अनुभव घ्यायला लावला. मी पूर्वी होतो त्यापेक्षा आता खूपच बदललेलो आहे......ईश्वराला मनःपूर्वक धन्यवाद!'

'आम्ही जगाला श्रद्धेचं महत्त्व पटवू,' कार्लिटस पेझ म्हणाला. 'आमचा अनुभव दुःखद असला, अनेक प्रिय मित्र आम्ही गमावले, तरी आयुष्यात प्रचंड शिक्षण तिथेच मिळालं. आता मी आगगाडीनंच परत जाईन, विमानातून नाही. सांघिक एकी पर्वतामधेही टिकल्यामुळेच आम्ही वाचलो. रग्बी खेळाचे ते उपकारच म्हणावे लागतील. आमच्या प्रार्थनेला अखेर फळ आलं.'

साडेदहा वाजता वार्ताहर–परिषद भरली. आदल्या दिवसापासून वार्ताहर उत्सुकतेनं त्याचीच वाट पाहात होते; पण त्यांना आत प्रवेश मिळाला नव्हता. गावतल्या व्यापाऱ्यांनी आठ मुलांना कपडे भेट म्हणून दिले होते. फक्त मँगिनो आणि इन्शार्ते बिछान्यात पडून राहिले. बाकीच्यांना बाहेर यायला परवानगी मिळाली. त्यांचे फोटो काढण्यात आले. परिषद लवकरच आटोपली आणि त्यात फारशी प्रश्नोत्तरं झालीच नाहीत. 'इतके दिवस काय खाल्लं?' या प्रश्नाला त्यांनी खोटं उत्तर दिलं. 'मेंडोझात भरपूर विकत घेतलेलं चीज आणि पर्वतावर उगवणाऱ्या खुरट्या वनस्पती खाऊन आम्ही वेळ भागवली!' ते म्हणाले.

अकराच्या सुमारास हॉस्पिटललगतच्या चर्चमधे विशपनं सर्वांसाठी प्रार्थना म्हटली. बचावलेली मुलं सर्वांत पुढच्या रांगेत चाकांच्या खुर्च्यांवर बसली होती. ईश्वरावरील प्रेम आणि कृतज्ञता त्यांच्या चेहऱ्यांवरून ओसंडताना दिसत होती. याच दिवसाची ते वाट पाहत होते. सत्तर दिवसांत एकही क्षण त्यांची देवावरची श्रद्धा ढासळली नव्हती. म्हणूनच जगण्यासाठी झगडताना ते यशस्वी होऊ शकले.

हा समारंभ उरकल्यावर आठीजण सँटियागोला जेवण करून जाणार होते. तिथे 'शेरेटन सॅन क्रिस्टोबल हॉटेल'मधे सोळा मुलांना ख्रिस्मसनिमित्त जंगी मेजवानी देण्यात येणार होती. अर्थात सर्व पालकांसह.

सॅन फर्नांदोमधल्या अनेक लोकांनी त्यांना जेवायचं निमंत्रण दिलं होतं; पण कॅनेसा, पेरॅडी आपल्या नातलगांसह रेस्टॉरंटमधेच गेले. नंतर पेरॅडो त्याच्या मेव्हण्यांच्या शेव्हरलेट गाडीतून नव्वद मैलांवर असलेल्या सँटियागोकडे निघाला. त्याच्या चेहऱ्यावर अँडीजमधल्या दुर्दैवी अनुभवाची सूक्ष्म छटादेखील शिल्लक नव्हती. [ क्रमशः ]

# सत्तर दिवस



लॉस मेटनीजकडे निघालेले
कॅनेसा आणि पॅरॅडो

शेरेटन् सॅन, क्रिस्टोबल"
हॉटेलमध्ये
ख्रिसमसची
जंगी मेजवानी






फेअरचाइल्डमधल्या
मृतांचे
पर्वतावरील
स्मृतीचिन्ह



पुण्याच्या फिल्म अर्काईव्हज्चे क्युरेट पी. के. नायर भाषण करीत असताना. शेजारी 'भारतीय चल चित्रका इतिहास' चे लेखक फिरोज रंगूनवा



भारतीय चित्रपटात काम केलेली पहिली स्त्री, कमलाबाई गोखले अध्यक्षीय भाषण करताना बाजूला चित्रांजलीचे अध्यक्ष दत्ता धर्माधिकारी – आणि सहचिटणीस शशिकांत किणीकर